१६६५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १३४९६

# संत आणि साहित्य

प्रकाशन क्रमांक : २४५

ग. … न्दिर
… ई ४

REFBK-0011480

मूल्य तीन रुपये

# अत्रे आणि साहित्य



आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

परचुरे

प्रल्हाद केशव अत्रे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 39255 वि:
क्रमांक नों: दि:

# संत आणि साहित्य

REFBK-0011480

ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर
गिरगांव, मुंबई ४

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
**विष्णु गजानन परचुरे**
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ, क्रमांक २
गिरगांव, मुंबअी ४

© १९६१, प्रल्हाद केशव अत्रे

आवृत्ति : पहिली
१३ ऑगस्ट १९६१

मुखपृष्ठ सजावट :
**रघुवीर मुळगांवकर**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबअी ४

अनुक्रम ... क्रमांक ... नों. दि. ...


| | |
|---|---|
| म्हण, सारें हें मंगल आहे | |
| न धरी वित्त करीं मी! | ५ |
| ज्ञानदेव आणि चांगदेव | ८ |
| गांधीजी आणि रामनाम | १२ |
| मूर्तिपूजा | १६ |
| अरे, ऐसे गेले कोट्यानुकोटी! | २० |
| पवित्र तें कुळ, पावन तो देश | २४ |
| देवाचिया चाडें आळवावें देवा | २८ |
| गीतेचें बीज ईशवास्यांतच! | ३२ |
| आम्ही कसले संत? | ३६ |
| वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें | ४१ |
| विनोबांचें 'स्थितप्रज्ञ-दर्शन' | ४६ |
| ज्ञानेश्वर काय नुसतेच कवि होते? | ५० |
| ज्ञानियांचा राजा गुरु महाराज | ५९ |
| इंद्रायणीच्या वाळवंटामध्यें | ७० |
| श्रीगाडगेबाबांची कीर्तन-गंगा! | ७९ |
| विनोबांची गीताई नि प्रवचनें | ८७ |
| मी बदललों आहें काय? | ९९ |
| साहित्य नि सेवा ह्यांची फाळणी नको | १०७ |
| महाराष्ट्राचा बंडखोर लोककवि | ११७ |
| धन्य देहू गांव | १२५ |
| ईशावास्योपनिषद् | १३१ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# म्हण, सारें हें मंगल आहे!

'माझ्या मना, म्हण एकदां कीं, हें सर्व मंगल आहे. सुंदर आहे. कोमल आहे. निर्मल आहे. आणि हो तूं तसा!' ह्या संत विनोबांच्या पवित्र प्रार्थनेनें या नव्या उपक्रमाला प्रारंभ करतों.

ईश्वर मंगल आहे. सुंदर आहे. त्यानें केलेलें सर्वच मंगल आणि सुंदर आहे. मंगलापासून मंगलच निर्माण होतें. सुंदरापासून सुंदराचाच जन्म होतो. ह्या जगांत अमंगल कांहीं नाहीं. असुंदर कांहीं नाहीं. ईशावास्यमिदम् सर्वम्। सर्व जीवन ईश्वरानें भरलेलें आहे. वस्तुवस्तूमध्यें 'सुंदर तें ध्यान' उभें आहे. वाऱ्यांत थरथरणारें हिरवेंगार पातें, बांधावर डोलणारें चिमुकलें फूल, ज्याच्यापुढें सम्राटाचें वैभव तुच्छ आहे—, हिरवळींवरून बागडणारें रंगीबेरंगी फुलपांखरूं, मातींतून रांगणारा मृगाचा तो लालभडक किडा, या साऱ्या ईश्वराच्या खुणा होत.

कुणी म्हणतें, जगांत कांहीं गोष्टी जड असतात. कांहीं चेतन असतात. हा नुसता भ्रम आहे. जगांत कांहींच जड नाहीं. सारेंच चेतन आहे. जें जड भासतें तें चेतनच असतें. चैतन्य त्यांत झोपलेलें असतें. वेळ आली

म्हणजे तें आपोआप जागें होतें. पाऊस पडला म्हणजे मातींत सुद्धां चेतना निर्माण होते. इवले इवले जीव वळवळूं लागतात. बियांमधून अंकुर बाहेर येतात. जडाचें चेतन होणें आणि चेतनाचें जड होणें ही घडामोड सृष्टींत एकसारखी चालूच असते. हा सर्व त्या शक्तीचाच खेळ आहे, नाहीं का?

वेदांती माणसाला हें सारें जाणवतें. वेदांत हें तत्त्वज्ञान नव्हे. ती उपासना आहे. सर्व विश्वामधून उचंबळणारें ईशतत्त्व त्याला दिसतें. भारतीय संस्कृति ह्याच एका वृत्तीवर आधारलेली आहे. ती तुळशीच्या रोपापासून तों सूर्यचंद्रापर्यंत सर्वांची पूजा करते. कबीराचा मुलगा कमाल हातांत विळा घेऊन गवत कापायला गेला. पण तें त्याला मान हालवून म्हणालें, 'नको रे मला कापूंस!' कमालनें विळा फेकून दिला आणि गवताचा मुका घेतला. ईश्वराचें हृदय त्याला गवतांत दिसलें.

आणि मूर्ख माणूस विचारतो कीं, 'ईश्वर कुठें आहे? मला तो दाखवा!' अरे, तो तुझ्यांतच बसला आहे. तुझ्या डोळ्यांतून बघतंय कोण? तुझ्या कानांतून ऐकतंय कोण? तुझ्या तोंडांतून बोलतंय कोण? तुझ्या पायांतून चालतंय कोण? तूं होय रे? किती वेडा आहेस! तुकोबा म्हणतात,

**देहीं असोनिया देव। वृथा फिरतां निर्दैव॥**
**देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं॥**
**नाभीं मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरीं॥**
**साखरेचें मूळ ऊंस। तैसा देहीं देव दिसे॥**
**दूधीं असतां नवनीत। नेणें तयाचें मथित॥**
**तुका सांगे मूढजना। देहीं देव कां पहा ना॥**

'नवा करार' सांगतो, 'आपण जिवंत देवाचें मंदिर आहों. देवानें असें म्हटलें कीं, मी त्यांच्यामध्यें निवास करीन आणि चालेन!'

चमत्कारावांचून जगाला देवाची ओळख पटत नाहीं. कुणी हातांतून बुक्का काढला, तीर्थ काढलें किंवा खडीसाखरेचा खडा काढला कीं, लोकांच्या माना आपोआप त्याच्यापुढें वांकतात. त्या चमत्कारांत त्यांना ईश्वर दिसतो.

पण आपण चालतीं, बोलतीं, वाढतीं माणसें ईश्वराचे चमत्कार आहोंत हें मात्र त्याला कळत नाहीं.

ईश्वर आपल्याबाहेर आहे, तो मूर्तींत आहे, देवळांत आहे, तीर्थांत आहे, हें एकच वेड माणसांच्या डोक्यांत शिरून बसलें आहे. त्यानें त्याच्या जीवनाचें मातेरें झालें आहे. हें वेड त्याच्या डोक्यामधून कसें निघणार? एक मुल्ला मोठमोठ्यानें ओरडून देवाची प्रार्थना करीत होता. कबीरानें त्याला विचारलें, 'कां उगाच घसा फोडतोस? तुझा अल्ला काय बहिरा आहे होय रे?'

ईश्वराला बघण्याचा, ईश्वराला शोधण्याचा अन् ईश्वराला प्रसन्न करण्याचा माणसाला कोण नाद लागून राहिला आहे? कोणी नाक धरून तासचे तास बसतें आहे, कोणी देवाच्या नांवानें टाहो फोडतें आहे, कोणी नदीच्या पाण्यांत बुचकळ्या मारतें आहे, कोणी घरदार सोडून रानावनांत भटकतें आहे! शेंकडों लोक आपापलीं कामेंधामें सोडून कुठल्या कुठें लांब यात्रेला जातात अन् रोगराईनें किंवा अपघातानें किड्यामुंगीसारखे मरून जातात. देव का डोळ्यांनीं दिसण्यासारखी वस्तु आहे?

महात्मा फुले म्हणतात, 'माध्यान्हीचा सूर्य डोळ्यांना बघतां येत नाहीं. मग अशा अनंत सूर्यांना आणि चंद्रांना निर्माण करणारा ईश्वर माणसाला कसा बघतां येईल?' मला ईश्वर भेटला, मला ईश्वर दिसला असें जे म्हणतात ते अज्ञ जनांचा बुद्धिभेद करतात. गाडगेबाबा म्हणतात, 'देवदर्शनानें आणि गंगास्नानानें पापें जातात असें जे सांगतात ते धर्माचा काळाबाजार करतात.'

'भूतीं भगवद्भाव। जीव अवघे देव॥' हें विसरून लोक खोट्या देवाच्या आणि धर्माच्या मागें लागले आहेत. जिवंत माणसांना पायाखालीं तुडवायचें आणि दगडामातीच्या मूर्ती डोक्यावर घेऊन नाचायचें, ही धर्माची शुद्ध विटंबना होय. डॉ. आंबेडकर परवां म्हणाले, "ज्या राष्ट्राचा धर्म सडला आहे, त्याला भविष्यकाळ नाहीं!' देवाधर्माच्या विकृत विचारांनीं आणि आचारांनीं आज भारतीय जीवन अंतर्बाह्य सडून गेलें आहे. 'जें जें भेटे

भूत । तें तें जाणिजे भगवंत ॥' या मंगल आणि पवित्र धर्मांची ओळख ह्या देशांतील यच्चयावत् लोकांना ज्या दिवशीं होईल तो सुदिन!

म्हणून विश्वात्मक देवाकडे ज्ञानोबांनीं जो प्रसाद मागितला तोच आम्ही मागतों. जगांतल्या दुष्टांचा दुष्टपणा नष्ट होवो. सत्कर्मांची आवड त्यांच्या ठायीं निर्माण होवो. 'भूतां परस्पर पडो, मैत्र जीवाचे!' पापाचा काळोख सरो. विश्वांत स्वधर्मसूर्याचा उदय होवो. आणि 'जो जें वांछील तो तें लाहो प्राणिजात.'

संतांच्या अभंगवाणीनें जीवनांतल्या सर्व मांगल्याचा नि सौंदर्याचा आम्हांला साक्षात्कार घडो. 'धन्य दिवस आजि झाला सोनियाचा, पिकली हे वाचा रामनामें!'

तुकाराम २१-३-१९५४

# न धरी वित्त करीं मी!

'हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्' असें 'ईशावास्यां'त म्हटलें आहे. सोन्याच्या झांकणानें सत्य झांकलेलें असतें. हें झांकण काढून टाकल्यावांचून सत्याचें दर्शन होऊं शकत नाहीं. सत्य म्हणजेच परमेश्वर. सोन्याचा म्हणजे वित्ताचा मोह माणसानें आपल्या-आयुष्यामधून काढून टाकल्यावांचून त्याला परमेश्वर भेटत नाहीं. हा विचार ह्या देशामध्यें फार जुना आहे. वित्त म्हणजे केवळ पैसाच नव्हे. आपल्या-जवळ जें जें मौल्यवान असेल तें. वित्ताचा मोह जोंपर्यंत आहे तोंपर्यंत चित्ताची शुद्धि होऊं शकत नाहीं. वित्त दिल्यानें चित्त शुद्ध होतें. हें माझें आहे हा मोहच आयुष्यांतून काढून टाकावयाला हवा. सर्व ईश्वराचें आहे. त्याच्या नांवानें त्याग करून जीवन जगावयाला हवें. 'तेन त्यक्तेन भुंजीथाः।' देव आणि राक्षस हे भेद मूलतः वित्तामुळें निर्माण झाले. विनोबा म्हणतात, 'जो देतो तो देव आणि राखतो तो राक्षस.' देव सारखे देत असतात आणि राक्षस सारखे घेत असतात.

माणसांच्या जगांत ही देवघेव सारखी चाललेली असते. 'देव' पेक्षां

'घेव' च जास्त चालते. त्यामुळेंच आर्थिक विषमता उत्पन्न झाली आहे आणि त्याचे अनंत दुष्परिणाम मानवतेला भोगावे लागत आहेत. ज्यांच्या जवळ नाहीं त्यांना द्या.

श्री शंकराचार्यांनीं देखील सांगून ठेवलेलें आहे कीं, 'देयं दीनजनाय च वित्तम्।' दीनांना वित्त द्या आणि सज्जनांना चित्त द्या.

'दरिद्रान् भर कौंतेय, मा प्रयच्छेश्वरे धनम्।' असें जुनें संस्कृत वचन आहे. ज्यांच्याजवळ आहे त्यांना देऊं नका. ज्यांच्याजवळ नाहीं त्यांना द्या. तुकोबांनीं देखील तेंच सांगितलें. 'दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।' कन्या, पुत्र आणि दासदासी ह्यांत फरकच मानूं नका. चित्ताचे भेद नष्ट करा ही या भारतांतली फार जुनी कल्पना आहे.

विनोबांचा ज्ञानयज्ञाचा विचार यांतूनच निर्माण झाला आहे. सृष्टि-संस्थेची सेवा करून साम्यावस्था प्रस्थापित करणें हाच प्राचीन काळीं यज्ञाचा हेतु होता. विनोबा हे साम्ययोगी आहेत. समता हें त्यांचें ध्येय आहे. दान हें एक साधन आहे. त्यांना 'मम'तेचें क्षेत्र विशाल करावयाचें आहे. सर्वांना हें 'मम' म्हणजे माझें आहे असें म्हणतां आलें पाहिजे. म्हणजे व्यक्तीनें आपलें 'मम'त्व सोडलें पाहिजे. लहान 'मम' गेल्या-वांचून मोठा 'मम' येणार नाहीं.

पूर्वीं यज्ञांत आहुति देतांना म्हणावें लागत असे, 'इन्द्राय इदं न मम।' 'वरुणाय इदं न मम।' तसेंच आतां म्हणायला पाहिजे. 'समा-जाय इदं न मम।' 'राष्ट्राय इदं न मम।' असें म्हटलें तरच सर्व लक्ष्मी समाजरूपी नारायणाची होईल, असें विनोबा सांगतात. दान म्हणजे देऊन टाकावयाचें अन् मोकळें व्हावयाचें असें नाहीं. आजपर्यंत लोक दान देऊन मुक्त होत होते. विनोबा सांगतात तें दान असें नाहीं. ह्या दानानें माणसें बांधलीं जाणार आहेत. नुसतीच जमीन किंवा संपत्ति देऊन भागणार नाहीं. बुद्धि, शक्ति, वेळ ह्या सर्व गोष्टीच द्याव्या लागतील.

ज्यांच्याजवळ पुष्कळ आहे त्यांनीं द्यावयाचें आणि ज्यांच्याजवळ थोडें आहे त्यांनीं द्यावयाचें नाहीं असें नव्हे. ज्याच्यापाशीं लंगोटी असते

त्याला त्या लंगोटींतहि आसक्ति असते. ह्या आसक्तीवर विनोबांचा कटाक्ष आहे.

दानाचा हेतु चित्तशुद्धि. चित्तशुद्धीमधून विचारपरिवर्तन आणि विचार-परिवर्तनामधून समाजक्रांति. असा हा प्रचंड कार्यक्रम आहे. भूदानयज्ञाचें पहिलें पाऊल विनोबांनीं तेलंगणांत टाकलें. आतां संपत्तिदानाचें दुसरें पाऊल त्यांनीं भगवान् बुद्धाच्या विहारभूमींत उचललें आहे. त्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, 'मी वामन होऊन आलों आहें. पहिल्या पावलाच्या रूपानें मीं भूमिदान मागितलें. दुसऱ्या पावलानें मी संपत्तिदान मागत आहें. तिसऱ्याची वाट बघा. वामनाचें तें तिसरें पाऊल ज्या वेळीं तुम्ही तुमच्या मस्तकावर धारण कराल, त्यावेळीं तुम्ही सर्व दरिद्रनारायणाच्या सेवेसाठीं गरीब बनलेले असाल; आणि हें जग त्या वेळीं तुमचें अनुयायी बनेल !'

'न धरी वित्त करीं मी !' हा संपत्तिदानाचा महान् संकल्प विनोबांनीं आज सोडलेला आहे. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, 'पैशाचा छेद किंवा आपल्या जीवनाचा छेद अशी आपली प्रतिज्ञा पाहिजे !' भूदानापेक्षांहि संपत्तिदानाची ही कल्पना अवघड आहे. जगांत आजवर हा विचार कुणालाहि सुचला नाहीं. कुणी म्हणेल, हें कसें शक्य आहे ? विनोबा म्हणतात, 'कां शक्य नाहीं ? विश्वास पाहिजे. लोक प्राणदान द्यायला तयार होतात. मग संपत्तिदान कां अशक्य व्हावें ?' भारताला सत्यधर्माचें दर्शन घडविण्या-साठीं 'हिरण्मय पात्र' दूर करण्याचा विनोबांचा हा अचाट प्रयोग आहे.

तुकाराम : २७-३-१९५४

# ज्ञानदेव आणि चांगदेव

चांगदेव हे एक महान् योगी पुरुष होऊन गेले. ते योगबलानें चौदाशें वर्षें जगले होते असें म्हणतात. ते तापीच्या तीरीं राहात. ज्ञानेश्वरांच्या सामर्थ्याच्या कांहीं गोष्टी त्यांच्या कानावर गेल्या. तेव्हां त्यांना भेटण्याची उत्कंठा साहजिकच त्यांच्या मनामध्यें उपजली. पण प्रत्यक्ष दर्शनाआधीं त्यांना पत्र लिहून अंदाज घेतलेला बरा असें वाटून ते पत्र लिहावयाला बसले. पण ज्ञानेश्वरांना आशीर्वाद लिहावा कीं नमस्कार लिहावा हें त्यांना कळेना. तेव्हां कागदावर कांहींच न लिहितां तसाच तो कोरा कागद त्यांनीं ज्ञानेश्वरांकडे पाठवून दिला. त्याला ज्ञानेश्वरांनीं पासष्ट ओव्यांचें एक पत्र पाठवून दिलें. हें 'चांगदेव-पासष्टि' म्हणून प्रसिद्धच आहे. हें उत्तर वाचून ज्ञानदेवांना भेटावयास चांगदेव एवढे उत्सुक झाले कीं, ते सापाचा चाबूक अन् वाघाचा घोडा करून त्यांना भेटावयास गेले. त्यावेळीं ज्ञानदेवादि भावंडें भिंतीवर बसलीं होतीं. त्यांनीं भिंतीला चालावयास आज्ञा दिली. त्याबरोबर ती भिंत चालूं लागली. तें पाहून चांगदेवाचा गर्वपरिहार झाला. ते ज्ञानेश्वरांना शरण गेले आणि त्यांचे

शिष्य झाले. पुढें मुक्ताबाईंनीं त्यांच्यावर अनुग्रह केला आणि त्यांना आत्मरूपाची प्राप्ति करून दिली.

ह्या मूळ गोष्टीमधल्या चमत्कारावर विश्वास ठेवण्याची जरुरी नाहीं. पण 'चांगदेव-पासष्टि' हा एक ज्ञानेश्वरांच्या बुद्धीचा महान् चमत्कार आहे यांत कांहीं शंका नाहीं. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे अमर ग्रंथ लिहून जीवनांत कृतार्थता निर्माण झाल्यानंतर चांगदेवांच्या निमित्तानें आणि निवृत्तिनाथांच्या कृपेनें 'स्वानुभवाचें रसाळ खाजें'च ज्ञानदेवांनीं मराठी भाषिकांच्या हातावर ठेवलेलें आहे. विनोबा म्हणतात, 'चांगदेवांच्या कोऱ्या पत्राला ज्ञानदेवांनीं दिलेलें हें उत्तर अजरामर आहे. हें खाजगी असलें तरी कुणीहि वाचावयाला हरकत नाहीं. वाचून फारसें कळावयाचें नाहीं आणि जेवढें कळेल तेवढ्यांतहि कल्याण होऊन जाईल.'

विनोबांनीं मूळच्या पासष्ट ओंव्यांमधल्या पंचवीस ओंव्या कमी करून 'चांगदेव चाळिशी' तयार केली. ते म्हणाले, 'माझ्या अधू डोळ्यांना ही चाळिशी उपयोगी पडेल.' विनोबांमुळें 'ईशावास्योपनिषदा'कडे जसें माझें लक्ष गेलें तसें तें 'चांगदेव-पासष्टी' कडेहि वळलें. विनोबांचे हे माझ्यावर फार उपकार आहेत. गेले कांहीं दिवस मी ती सतत वाचतों आहें. पुन्हा पुन्हा वाचतों आहें. लहान असल्यानें ती चटकन् वाचून होते. पण तिचा भावार्थ ध्यानीं यावयाला पुष्कळ वर्षें चिंतन करावयाला हवें. अधिकारी पुरुषांनींच त्यामधील रहस्यें उलगडून सांगावयाला हवींत.

ह्या 'चांगदेव–पासष्टी'ला मी मराठी भाषेमधलें 'उपनिषद्' म्हणतों. उपनिषदांतल्या सर्व कसोट्यांना तें उत्कृष्टपणें उतरेल. एवढेंच नव्हे तर पुष्कळशा प्रसिद्ध उपनिषदांनाहि तें मागें सारील. हें लिहितांना ज्ञानेश्वरांनीं भाषासामर्थ्याची पराकाष्ठा केलेली आहे. एकेका शब्दांत अर्थाचें अनंत भांडार ठांसून भरलेलें आहे. विश्वाचें सर्व रहस्य ह्यांत त्यांनीं सांगितलें आहे. आत्मज्ञानानें तुडुंब भरलेला हा एक दिव्य कलशच आहे म्हणानात!

विविध रूपांत आपणाला भासमान होणारें हें जें विश्व आहे तें परमात्म्यानेंच घेतलेलें एक सोंग आहे. आपण गुप्त राहून तो हा सगळा खेळ

करतो आहे. तो प्रकट झाला म्हणजे हा खेळ संपलाच. पण परमात्म्याचें हें नाट्य असलें म्हणून त्याचें मूळ रूप कांहीं त्यामधून डोकावल्याखेरीज राहात नाहीं. किरणांचा शेला चंद्रानें आपल्या अंगावर पांघरला म्हणून काय तो दिसत नाहीं? वस्त्राच्या आपण कितीहि घड्या घातल्या तरी त्याचा मूळचा एकरूप वस्त्रपणा नाहींसा थोडाच होतो? त्याप्रमाणें विश्वरूपानें स्फुरणारी स्फूर्ति मूळांत एकच आहे. पाणी उचंबळूं लागलें म्हणजे फेस येतो. त्याप्रमाणें तो परमात्मा आपल्या ठायीं आपणच उचंबळूं लागला म्हणजे दृश्य जगत् निर्माण होतें—आणि मग द्रष्टेपणाचें नातें तो आपल्याकडे घेतो.

अशा रीतीनें द्रष्टा म्हणजे पहाणारा, दृश्य म्हणजे ज्याला आपण पहातों तें आणि दर्शन म्हणजे पहाण्याची क्रिया अशी 'त्रिपुटी' उत्पन्न होते. तीन पदार्थ नसतांना ते तीन वेगवेगळे वाटूं लागतात. हा तीनपणा म्हणजे निव्वळ भास आहे. मूळांत एकपणाच खरा आहे. आपण आरशांत पाहिलें म्हणजे आपल्याला आपलें तोंड नाहीं का दिसत? खरें पाहतां आपलें तोंड आहे तेथेंच असतें. तें आरशांत थोडेंच निर्माण होतें? पण आरशामुळें दृश्य आणि द्रष्टा असा विनाकारण भेद निर्माण होऊन आपली फसवणूक मात्र होते. परमात्मा आपला आपल्यालाच पहाण्याचा खेळ खेळत असतो.

वाद्यांत ध्वनि आणि काष्ठांत अग्नि जसा अमूर्त स्वरूपांत सिद्ध असतो तसा परमात्मा सर्व ठिकाणीं स्वयंसिद्धच आहे. तो दिसत नाहीं. त्याला जाणतां येत नाहीं. यामुळें कांहीं न बोलणें हेंच त्याच्याबद्दल खरें बोलणें आहे. 'मौनेंचि बोलिजे.'

कांहीं न होऊन जो असतो, जो कांहींहि निर्माण न होतां पहात असतो आणि भोक्ता–भोग्य संबंधावांचून आपलाच भोग आपले ठिकाणीं निरंतर भोगीत असतो, असा तो सत्, चित् आणि आनंदरूप परमात्मा आहे. परमात्म्याच्या स्वरूपाचें शब्दामध्यें यापेक्षां अधिक वर्णन करण्याचा यशस्वी प्रयत्न ज्ञानदेवाखेरीज कोणी केला असेल असें वाटत नाहीं.

नंतर ज्ञानदेव चांगदेवाला म्हणतात, 'कापुराचा कण जसा कापुरापेक्षां भिन्न असत नाहीं तसा तूं परमात्म्याचा अंश त्याच्यासारखाच आहेस. तूं मी

एकच आहोंत. दोघेहि ईश्वराचे पुत्र. तुला मी भेटायचें म्हणजे मलाच मी पहाण्यासारखें आहे. शब्दानें शब्द ऐकावा, स्वादानें स्वाद चाखावा किंवा उजेडानें उजेड पहावा तसें तें आहे. उलट देहस्वरूपांत आपण उभयतां भेटलों तर मूळच्या मनोमय ऐक्यांत बिघाड होईल कीं काय अशी मला भीति वाटते. तुझ्या यथार्थ स्वरूपाचें दर्शन मला घेतां येणार नाहीं. तसा मीं प्रयत्न केला तर माझा मीपणा मला संभाळतां येणार नाहीं. मिठाच्या खड्याला पाण्याची खोली कशी सांगतां येणार?' अशा तऱ्हेनें 'मौनाच्या अक्षरांनीं' म्हणजे शब्दांच्या मिषानें निःशब्द आत्मस्वरूपाचें वर्णन करून चांगदेव आणि आपण एकच आहोंत असें ज्ञानदेवांनीं ह्या पत्रांत सिद्ध केलें आहे.

**एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे**
**दोन्ही डोळस आरिसे**
**परस्पर पाहतां कैसे**
**मुकले भेदा**

दोघेहि ज्ञानीच पुरुष. स्वच्छ आरशांसारखे एकमेकांसमोर आले. दोघांनीं एकमेकांना पाहिलें आणि पाहून कांहींच पाहिलें नाहीं. अशा रीतीनें निद्रेलाहि निद्रा आणणारी आणि जागृतीला गिळून टाकणारी अशी जी अतिजागृत ज्ञानानुभवाची स्थिति आहे ती प्राप्त व्हावी एवढ्यासाठीं ज्ञानदेवांनीं 'चांगदेव-पासष्टि' लिहिली. आत्मबोधाचा हा अलौकिक आरसा आहे. त्यांत प्रत्येकानें आपलें रूप पहावें आणि कल्याण करून घ्यावें.

तुकाराम : ३-४-१९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 59355 वि: 1.नि.वां.५
क्रमांक 9375 नों: दि: 30.1.94

# गांधीजी आणि रामनाम

रामनाम हा हिंदुसमाजाला प्राप्त झालेला एक महान् मंत्र आहे. रामनामावर त्याचें जेवढें प्रेम आहे, तेवढें दुसऱ्या कशावरहि नाहीं. रामनामाची महती सर्वच संतांनीं गायिलेली आहे. पण रामनाम आचरणांत आणण्याचा गांधीजींसारखा प्रयत्न कोणीच केला नसेल. आधुनिक काळांतील रामनामाचे महान् पुरस्कर्ते असाच गांधीजींचा उल्लेख करावा लागेल.

अगदीं बालपणापासूनच गांधीजींच्या जीवनांत राम शिरला. वयाच्या पंधराव्या वर्षीं त्यांनीं चोरी केला. ती वडिलांपाशीं त्यांनीं कबूल केली. वडिलांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. त्या अश्रूंनीं त्यांचें हृदय भेदून टाकलें. 'आयुष्यांत पहिल्यानें रामबाण मला त्यावेळीं लागला!' असें गांधीजींनीं 'आत्मकथें'त लिहिलें आहें. 'रामबाण वाग्यां रे होय ते जाणे.'

विलायतेंत असतां एका परस्त्रीचें त्यांना आकर्षण वाटलें. पण ऐन वेळीं रामानें आपल्याला वांचविलें असें ते म्हणतात. तेव्हांपासून 'निर्बलके बल

राम' अशी त्यांची मनोमन श्रद्धा बसली. रामनामावरची त्यांची ही श्रद्धा पुढें एवढी वाढली कीं, त्यांचें सर्व जीवनच तिनें व्यापून टाकलें. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत रामनाम हें एक प्रभावी सामर्थ्य आहे असा त्यांना साक्षात्कार झाला; आणि रामनामाचें त्यांनीं निश्चित शास्त्रच रचिलें.

गांधीजी एके ठिकाणीं म्हणतात, 'योग मला माहीत नाहीं. रामनाम हाच माझा योग. त्याची शिकवण मला लहानपणीं मिळाली. माझ्या मानसिक आकाशांत त्यानें विशाल रूप धारण केलें. ह्या सूर्यानें अतिशय घोर अंधाराच्या वेळीं मला प्रकाश दाखविला.'

गांधीजींचा राम म्हणजे दशरथाचा पुत्र 'राम' नव्हे. त्या रामाला ज्या 'रामा'चें नांव देण्यांत आलें तो. सर्वांच्या अंतर्यामीं असणारा आत्माराम. निर्गुण रामाचा पहिला उपासक कबीर होता. निर्गुण निराकाराच्या पलीकडचें जें परब्रह्म, त्याला कबीर राम म्हणतो. 'निर्गुण राम जय हु रे भाई.' गांधीजीहि निर्गुण रामाचेच भक्त होते.

रामनाम हें एक आत्मशोधन आहे असें गांधी म्हणत. म्हणून रामनाम ही केवळ मौखिक क्रिया होऊं नये असें त्यांचें सांगणें असे. रामनाम हा कांहीं नुसता शब्द नाहीं. तो एक अत्यंत सूक्ष्म आणि परिपूर्ण विचार आहे. केवळ तोंडानें रामनाम उच्चारून कांहीं होणार नाहीं. रामनाम समजून उमजून जपलें पाहिजे. जीवन राममय झालें पाहिजे. तथापि रामनामाचा नुसता शाब्दिक जप करणारांनाहि गांधीजींनीं धीर दिला आहे. ते म्हणतात, 'रामनामाचा निरंतर जप चालू राहिला तर एक दिवस तें तुमच्या कंठामधून हृदयांत उतरल्याखेरीज राहाणार नाहीं.' गांधीजींनीं रामनामाचा व्यावहारिक जीवनाशीं संबंध जोडून दाखविला आहे. रोगमुक्तीवर आणि विकारमुक्तीवर रामनामासारखें रामबाण औषध नाहीं असा त्यांचा अनुभव होता.

दोनतीनदां त्यांच्या शरिरांत व्याधि उत्पन्न झाल्या. 'रामनामांत माझा विश्वास कच्चा असल्यामुळें मला त्या झाल्या' असें त्यांबद्दल त्यांनीं म्हटलें आहे. रामनामाच्या पवित्र मंत्राचा उपयोग कोणत्याहि फळाच्या आशेनें

करावयाचा नाहीं. कोणतीहि वासना किंवा कामना मनांत धरावयाची नाहीं. नाहींतर रामनामाचें रूपांतर रावणनामांत व्हावयाचें.

रामनाम हा चित्तशुद्धीचा मंत्र आहे. चित्त शुद्ध आणि निर्विकार राहिलें तर देहहि निरोगी राहातो हा गांधीजींच्या रामनामशास्त्रांतला महत्त्वाचा सिद्धान्त आहे. रामनाम ही जीवनाचें परिवर्तन करणारी किमया आहे. म्हणून रामभक्तानें निसर्गाच्या नियमांनुसार वागलें पाहिजे. शुद्ध, युक्त आणि मित आहार, प्रसंगीं अल्पाहार आणि निराहार, देहाची, वाणीची आणि मनाची शुद्धता, निसर्गाचें सेवन, योग्य परिश्रम, प्राणिमात्राची सेवा आणि शुद्ध चित्तानें परमेश्वराचें चिंतन हा रामनामाचा उपचार गांधीजींनीं सांगून ठेवला आहे.

त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'तुमच्या विचारावर तुमचा ताबा नसेल, अरुंद अंधाऱ्या खोलींत सर्व दारें खिडक्या बंद करून निजण्यांत तुम्हांला कांहीं हरकत वाटत नसेल, तुम्ही घाण हवा घेत असाल किंवा घाण पाणी पीत असाल तर मी म्हणेन कीं, तुमचें रामनाम घेणें व्यर्थ आहे !'

रामनामाला अंधश्रद्धेचें रूप कोणी देऊं नये. अंधश्रद्धा म्हणजे नास्तिकता. या नास्तिकतेचा हिंदुधर्माला फार मोठा रोग जडलेला आहे. रामनाम हा जादूटोणा नव्हे. जीवनांत अगणित लाभ देणारें तें एक गणिताचें सूत्र आहे, असें गांधीजी सांगतात. रामनाम हें भयमुक्तीचें अमोघ शस्त्र आहे हा शोध नौखालीच्या यात्रेंत गांधीजींनीं लावला. ज्यांच्या जीवनांत निर्भयता नाहीं त्यांना मनुष्य कसें म्हणावयाचें? मुसलमानांच्या अत्त्याचारांनीं भयभीत होऊन नौखालींत हिंदु स्त्रीपुरुष जेव्हां आपलीं घरेंदारें सोडून पळूं लागले तेव्हां गांधीजी त्यांना म्हणाले, 'तुमची भीति दूर करणारी अशी एक जादूची वस्तु आहे. ती म्हणजे रामनामाचा अमोघ मंत्र. तुम्ही म्हणाल, रामनामावर आमचा विश्वास नाहीं. त्याला आम्ही जाणत नाहीं. परंतु मी तुम्हांला सांगतों, त्याच्याशिवाय तुम्ही एक श्वास देखील घेऊं शकत नाहीं. रामनामाला भिऊन वागाल तर तुम्हांला जगामध्यें इतर कोणाला भिण्याची गरज राहाणार नाहीं. ईश्वरावर जर तुमची श्रद्धा असेल, तर कोणाची छाती

आहे तुमच्या स्त्रियांच्या आणि मुलींच्या अब्रूला हात लावण्याची ? संकटाशीं सामना करण्याऐवजीं त्यापासून दूर पळणें म्हणजे मनुष्याची मनुष्यावर, ईश्वरावर आणि स्वतःवर असणारी श्रद्धा नाकबूल करण्यासारखें आहे. आपल्या श्रद्धेचें असें दिवाळें काढण्यापेक्षां मनुष्यानें पाण्यांत जीव देणें चांगलें !'

'रघुपति राघव राजाराम, पतितपावन सीताराम' ह्या महामंत्राचा घोष साऱ्या पूर्वबंगालमध्यें गांधीजींनीं गर्जविला आणि हजारों भयभीत आणि व्यथित अंतःकरणांमध्यें धैर्य आणि समाधान निर्माण केलें. अशा रीतीनें रोगमुक्ति, विकारमुक्ति आणि भयमुक्ति ह्या त्रिविध मुक्ति रामनामानें साध्य होतात. हें रामनामशास्त्र गांधीजींनीं आपल्या महान् जीवनांत प्रत्यक्ष आचरून दाखविलें, ह्यापेक्षां रामनामाच्या प्रभावाचा आणखी पुरावा तो काय द्यावा ?

गांधीजींनीं आपलें सारें जीवन राममय केलें आणि रामनामाचा उच्चार करीतच त्यांनीं या जीवनाचा निरोप घेतला. तुलसीदासजी म्हणतात, 'रामनाम मणिदीप धरू जीह देहली द्वार!' आंत आणि बाहेर उजेड टाकणारा रामनाम हा देहाच्या उंबरठ्यावर ठेवलेला रत्नदीप आहे. ह्या रामनामाच्या प्रकाशानें सर्वांचीं मनें आणि जीवनें उजळोत !

तुकाराम : १०-४-१९५४

# मूर्तिपूजा

खरें पाहतां, मूर्तिपूजा हें कांहीं हिंदुधर्माचें तत्त्व नव्हे. मूर्ति आणि मंदिरें हीं गेल्या हजार दीड हजार वर्षांतलीं आहेत. त्यापूर्वी मूर्तींची पूजा येथें नव्हती. बौद्ध धर्माच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठीं मूर्तिपूजा निघाली. पण तिचा अतिरेक एवढा झाला कीं, तीं हिंदुधर्माचें आतां लक्षणच होऊन बसली. एवढेंच नव्हे तर तो हिंदुधर्मावरील एक मोठा आक्षेपहि झालेला आहे.

परधर्मीय लोक हिंदूंना मूर्तिपूजक म्हणून हिणवितात हें सर्वांना माहीतच आहे. ईश्वर सर्वत्र भरला आहे असें आपण मानतों. वेदान्त जड आणि चेतन ह्यांत भेद करीत नाहीं. जड वस्तु अचेतन नसतात. त्यांत चैतन्य झोपलेलें असतें एवढेंच. जडाचें चेतन होणें आणि चेतनाचें जड होणें ही घडामोड या पृथ्वींत अहर्निश चालू आहे. सर्व वस्तूंतील चैतन्य आपण ओळखलेलें आहे, म्हणून कोणत्याहि वस्तूची पूजा ही ईश्वराचीच पूजा ठरते. मग दगडाची वा मूर्तीची पूजा केली म्हणून बिघडलें कोठें ?

पण ह्या दृष्टीनें मूर्तीची पूजा कोणीच करीत नाहीं. मूर्तिपूजेचा नेमका

याच्या उलट परिणाम होतो. ह्या मूर्तीमध्येंच केवळ देव आहे, ह्या मंदिरामध्येंच फक्त देव राहातो, बाहेर नाहीं, अशी मूर्तिपूजकांची भावना होऊन बसते. त्यामुळें धोका उत्पन्न होतो. कितीतरी साधुसंतांनीं ह्याजविरुद्ध आपला आवाज उठवलेला आहे. 'सबमें रम रहिया प्रभु एकै, पेख पेख नानक बिहँसाई.' नानक म्हणतो, 'सर्व दुनियेंत ईश्वर भरलेला आहे. त्याला ओळखून आत्मानंदाचा अनुभव घ्यावा.' कबीरानें चार हातांची देवाची मूर्ति पाहिली. तो म्हणाला, 'बस्? देवाला फक्त चारच हात? माझ्या देवाला तर अनंत हात आहेत!' दुसऱ्या ठिकाणीं कबीरानें स्पष्टच सांगितलें आहे कीं, 'देव मंदिरांत नाहीं कीं मशिदींत नाहीं. देव तुमच्याजवळ आहे.'

तुकोबांनीं मूर्तिपूजेचा निषेधहि केला आहे आणि तिचें रहस्यहि सांगितलें आहे. 'केला पाषाणाचा विष्णु। परि पाषाण नव्हे विष्णु। विष्णुपूजा विष्णुसि अर्पे। पाषाण राहे पाषाणरूपें!' विनोबांनींहि ह्या विषयावर पुष्कळच लिहिलें आहे. ते म्हणतात, 'परमेश्वर सर्वत्र भरला असूनहि तो विशिष्ट मूर्तीतच प्रकट होणें शक्य आहे. वातावरणांत वीज सदैव भरलेलीच असते. पण विशिष्ट स्थानीं ती विशिष्ट रीतीनेंच प्रकट होते. जिथें आमची भावना असते, तिथेंच ईश्वर प्रकट होतो. तेव्हां मूर्तिपूजा हा कांहीं परमेश्वराच्या व्यापकतेचा निषेध नाहीं.'

स्वामी दयानंद एकदां एका देवळांत गेले. तेव्हां देवाच्या मूर्तीवर उंदीर खेळत असतांना त्यांनीं पाहिलें. तेव्हां त्यांच्या मनांत सहज विचार आला कीं, 'ज्याच्यावर उंदीर खेळत आहेत तो कसला आला आहे देव?' आणि त्यानंतर ते परमेश्वराच्या विश्वव्यापक स्वरूपाच्या चिंतनांत मग्न झाले. ह्या गोष्टीचा उल्लेख करून ,एकदां विनोबा म्हणाले, 'देवाच्या अंगावर उंदीर खेळतांना बघून दयानंदांना त्या मूर्तीमधल्या देवपणाची शंका आली. पण मला नसती आली. उलट ज्याच्या अंगावर उंदीर निर्धास्तपणें खेळत आहेत तो परमेश्वरच असला पाहिजे असें मी म्हटलें असतें. उंदरांनीं देवाच्या अंगावर खेळूं नये तर काय मांजराच्या अंगावर खेळावें?'

विनोबांनीं दुसऱ्या एका प्रसंगीं बोलतांना असें म्हटलें आहे कीं, "योग-सूत्रामध्यें ईश्वराची 'रागद्वेषादिरहित पुरुषविशेष' अशी व्याख्या केली आहे. मूर्तिपूजा हा निरहंकारी आणि निर्विकार बनण्याचा माणसाचा प्रयत्न आहे. दगडाच्या मूर्तीसमोर डोकें वांकवून माणूस निरहंकार होण्याचा प्रयत्न करीत असतो. मूर्तीमध्यें भगवंताची कल्पना करून माणसानें आपला विकासच केलेला आहे. मूर्ती जर नसत्या तर माणसांनीं जगांतील सर्व फुलें आपल्याच डोक्यावर वाहून घेतलीं असतीं. आपल्या वासना देवाला समर्पण करून टाकण्याची ही एक युक्ति आहे."

समर्थ रामदास म्हणतात, 'देवाचें वैभव वाढवावें.' आम्ही दरिद्री, तो महान्. आम्ही त्याचें वैभव कसें वाढवणार ? केवळ सेवेनें आणि चित्तशुद्धीनें. ईश्वराच्या भक्तीखेरीज बुद्धि शुद्ध करण्याचें ह्या जगांत दुसरें कोणतें प्रभावी साधन आहे? शंकराचार्य एवढे मोठे ज्ञानी. अद्वैताची त्यांनीं गर्जना केली. पण मलबारहून हिमालयाकडे जातांना वाटेंत त्यांना जीं मोटमोठीं मंदिरें दिसलीं त्यांवर त्यांनीं स्तोत्रें रचिलीं. दगडाच्या मूर्ति माणसांनीं केलेल्या आहेत, त्यांत परमेश्वर नाहीं, हें काय त्यांना माहीत नव्हतें ? पण त्या पाहिल्याबरोबर त्यांचें मस्तक नम्रच झालें.

चित्त शुद्ध करण्याचें मूर्तिपूजा हें साधन आहे. पण मूर्तिपूजेला आज देशांत जें विचित्र स्वरूप आलें आहे, त्यानें चित्त शुद्ध होणें तर दूरच राहिलें, पण तें जास्तींत जास्त दुबळें, पांगळें आणि आंधळें मात्र झालेलें आहे. आंब्याच्या झाडावर जशीं बांडगुळें उगवतात, तशीं मूर्तिपूजेवर अंधश्रद्धेचीं एवढीं बांडगुळें उगवून बसलेलीं आहेत कीं, त्यामुळें मूर्तिपूजेचें सर्व पावित्र्य आणि मांगल्य नष्ट झालेलें आहे.

गाडगेबाबा तर कोणत्याहि देवळांत पाय ठेवीत नाहींत, किंवा मूर्तीचें दर्शन घेत नाहींत. पंढरपूरला कोणी तरी बाबांना म्हणालें, 'बाबा, देवळांत चला कीं!' बाबांनीं विचारलें, 'काय हाय रे देवळांत ?' 'वा! बाबा, देवळांत विठोबा आहे ना!' त्या माणसानें सांगितलें. बाबा म्हणाले, 'अन् तिथें त्यो काय करतोय ?' 'कमरेवर हात ठेवून उभा आहे ना तो!'

माणूस म्हणाला. तेव्हां तोंड वेडेंवांकडें करून बाबा म्हणाले, 'अरे, अरे, अरे, कमरेवर हात ठेवून कां उभा हाय त्यो? त्याला म्हनावं हातांत खराटा अन् पाटी घे अन् बाहेर ये. बाहेर तुझ्या भक्तांनीं एवढी घान करूनशान ठेवली हाये, ती म्हनावं काढून टाक.'

बाबांच्या ह्या गोष्टींत केवढें रहस्य भरलेलें आहे! माणसांना तत्त्व दिसत नाहीं. तीं शब्दांत आणि आकारांत अडकून पडतात. म्हणूनच विनोबांनीं एका ठिकाणीं म्हटलेलें आहे कीं, 'गणपतीची मूर्ति दहा दिवस पुजून ती शेवटीं पाण्यांत बुडवायची ह्यांत फार मोठा संदेश भरलेला आहे.' मूर्तीची पूजा करावी पण तिच्यांत अडकून पडूं नये. शेवटीं ती बुडवायचीच आहे हें ध्यानीं धरावें. त्याशिवाय सत्याची कशी ओळख होणार? मूर्ति निर्माण करणें सोपें आहे. तिची पूजा करणें तर त्याहूनहि सोपें आहे. पण ती बुडविणें किती कठीण आहे!

तुकाराम : १७-४-१९५४

# अरे, ऐसे गेले कोट्यानुकोटी !

गाडगे बाबांची एक गोष्ट सांगतों. जेव्हां जेव्हां मी ती सांगतों तेव्हां तेव्हां माझें हृदय भरून येतें आणि ऐकणाराचे डोळे डबडबतात. फार विलक्षण गोष्ट आहे ही. गाडगेबाबांना एक पुत्र होता. त्याचें नांव गोविंदा. जन्मापासून गोविंदाचे फार हाल झाले. बाबांचें तर घरादाराकडे लक्षच नाहीं. मग गोविंदाकडे कोण बघणार? गोविंदा नऊदहा वर्षांचा झाला तेव्हां कांहीं भक्त मंडळी बाबांना म्हणाली, 'बाबा, गोविंदाला शाळेंत घाला कीं !' बाबा म्हणाले, 'कुठल्या?' मंडळी म्हणाली, 'पुण्याला शिवाजी मराठा स्कूल आहे, तिथें !' बाबा म्हणाले, 'वा, वा, आपल्या शिवाजी महाराजांची शाळा का? जरूर घाला अं !'

त्याप्रमाणें गोविंदाची रवानगी पुण्याच्या शिवाजी मराठा स्कूलमध्यें झाली. शाळेला जोडून एक मोफत वसतिगृह होतें. त्याच्यांत गोविंदाच्या जेवण्याखाण्याची सोय भक्त मंडळींनीं केली आणि अशा रीतीनें गोविंदाचें शिक्षण सुरू झालें.

एकदां बाबा पुण्याला गेले. तेव्हां त्यांना गोविंदाची आठवण झाली.

ते म्हणाले, 'अरे, आपला गोविंदा हाये ना हितं शाळेमंदी? चला आपण बघून येऊं!' बाबा वसतिगृहांत गेले तेव्हां मुलें जेवायला बसलीं होतीं. त्यांच्या रांगेंत गोविंदा मुकाट्यानें जेवत होता. गोविंदाला पहातांच बाबा ओरडले, 'आं, हितं तूं जेवतोस व्हय रं? ऊठ–ऊठ!'

बाबांची शिस्त भारी कडक. गोविंदा हातांतला घांस टाकून तसाच उठला. बाबा म्हणाले, 'घे एक भांडें अन् फडकें अन् मग माग चार घरें माधुकरी. अशी इद्या शिकायची असते व्हय रे?' त्या दिवसापासून गोविंदा चार घरें माधुकरी मागूं लागला.

गाडगेबाबांची आई सखूबाई म्हणून होती. तिला वाटलें कीं आपल्या डोळ्यादेखत नातवाचें लगीन व्हावें. ती बाबांना म्हणाली, 'गोविंदाचें लगीन ठरवितें.' बाबा म्हणाले, 'वा, वा, फार चांगलं. लगीन करायाच हवं!' त्याप्रमाणें आजीनें नातवाचें लगीन ठरवलें.

मुंबईला वरळीला लग्नाचा समारंभ झाला. बाबांच्या एकुलत्या एक मुलाचें लग्न. मग भक्तमंडळींच्या उत्साहाचें काय वर्णन करायला हवें? मोठमोठे श्रीमंत नि धनिक लोक त्या मंडळींत. त्यांनीं लग्नाचा टोलेजंग बेत रचला. असा मांडव बांधूं अन् अशा जेवणावळी घालूं नि अशी वरात काढूं, अशा त्यांनीं योजना रचल्या. इतक्यांत बाबांचा फेरा आला. त्यांनीं ते सारे बेत धुडकावून लावले.

नवरानवरीला लग्नाच्या सकाळीं थंडगार पाण्यानें आंघोळ घालण्यांत आली. लग्न लावल्यावर मडक्यांतून त्यांना झुणकाभाकर खाऊं घालण्यांत आली. नवरानवरीला श्रीमंतांनीं मोठमोठे आहेर आणले होते. बाबांच्या मुलाचें लग्न बघायला मुंबईतले पांच पंचवीस हजार भिकारी जमले होते. बाबांनीं आहेरवाल्यांना विचारायचें, 'काय शेटजी, काय आणलंय्?' 'जरीचा रुमाल—' शेटजीनें अदबीनें हंसून सांगायचें. बाबांनीं तो जरीचा रुमाल हातांत घ्यायचा अन् एखाद्या भिकाऱ्याला हांक मारायचे, 'ए, इकडं ये, हा घे—' आणि त्याला तो जरीचा रुमाल देऊन टाकायचे! अशा रीतीनें मोठमोठ्या लोकांनीं आणलेल्या किंमती आणि भरजरी आहेरांची बाबांनीं

थोड्याच वेळांत वासलात लावून टाकली. सारे भिकारी बाबांच्या नांवानें गर्जू लागले. शेट–सावकारांचे डोळे फोटो काढण्यासारखे झाले.

रात्रीं नवरानवरीची वरात निघायची होती. फुलांनीं शृंगारलेल्या मोटारी घेऊन बाबांचे कांहीं भक्त आले होते. पण बाबांनीं नवरानवरीसाठीं एक बैलाचा खटारा तयार करून ठेवला होता. त्यांत नवरानवरी बसलीं. त्यांच्या मागें भिकाऱ्यांचा घोळका लागून राहिला. अन् बाबांच्या जयजयकारांत वरात निघाली. त्यांच्या घोषानें सारी वरळी दणाणली. फुलांनीं शृंगारलेल्या मोटारी तोंड वासून जागच्या जागीं थिजून बसल्या. असा बाबांनीं आपल्या पुत्राच्या लग्नाचा सोहळा साजरा केला.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं गोविंदाला पुणें येथें एक वेडें कुत्रें चावलें. त्यावर योग्य वेळीं जो उपचार व्हावयाला पाहिजे होता तो कांहीं झाला नाहीं. त्यामुळें गोविंदाला अकालीं मृत्यु आला. त्यावेळीं बाबा कोंकणांत होते. पुण्याहून मुलाच्या मरणाची तार गेली. पोस्टमास्तर बाबांचा भक्त होता. त्यानें तार वाचल्यावर त्याची कंबरच खचली.

बाबांचें त्यावेळीं गांवांत कीर्तन चालू होतें. कीर्तन ऐन रंगांत आलें होतें. 'गोपाळा। गोपाळा। देवकीनंदन गोपाळा॥' असा भजनाचा मारे गजर चालू होता. इतक्यांत हातांत तार घेऊन स्वतः पोस्टमास्तर भजनाच्या ठिकाणीं येऊन हजर झाले. पण तारेंतला मजकूर बाबांना सांगण्याची कांहीं त्यांना छाती होईना. ते आपले बाबांच्या मागें येऊन गुपचुप उभे राहिले.

कांहीं वेळानें बाबांनीं त्यांना पाहिलें. बाबांची आणि त्यांची दृष्टादृष्ट होतांच पोस्टमास्तरांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. बाबांनीं त्यांना विचारलें, 'काय झालें मास्तर?'

मास्तरांच्या तोंडून अक्षरहि फुटेना. कांहीं वेळानें मनाचा हिय्या करून मास्तर म्हणाले, 'बाबा, आपले गोविंदराव गेले हो!' त्याबरोबर बाबा एक क्षणमात्र स्तब्ध राहिले आणि एकदम उद्गारले, 'अरे, ऐसे गेले कोट्यानुकोटी, रडूं काय तेथें एकाचे साठीं? बोला, गोपाळा! गोपाळा! देवकीनंदन गोपाळा!!' भजनाचा जयघोष पुन्हा सर्वत्र निनादला आणि

ईश्वराच्या नामांत एकुलत्या एक पुत्राच्या मृत्यूचें दुःख बुडवून बाबा मोकळे झाले.

सुखदुःखाच्या भोंवऱ्यांत मोठमोठीं माणसें असहायपणें गिरक्या खात असतात. त्यामधून बाहेर पडावयाला असामान्य सामर्थ्य लागतें. महापुरुषाच्या अंतःकरणाला सुखदुःखादि विकार मुळीं स्पर्शच करूं शकत नाहींत. आपलें 'ममत्व' त्यांनीं मारून टाकलेलें असतें.

आपलें स्वतःचें या जगांत काय आहे? सारें त्याचें आहे. तो देतो अन् तो नेतो, ही त्यांची वृत्ति असते. एकुलत्या एका पुत्राच्या मरणाचें हालाहल शांतपणें गिळून टाकणाऱ्या बाबांच्या अंगीं शंकराचें सामर्थ्य आहे, म्हणूनच लक्षावधि लोकांचीं मस्तकें त्यांच्यापुढें नम्र होतात आणि त्यांच्या वाणींतलें अमृत पिण्यास लोक सदैव हपापलेले असतात.

तुकाराम : २४-४-१९५४

# पवित्र तें कुळ, पावन तो देश

तुकोबांचा हा अभंग मला फार आवडतो. ‘पवित्र तें कुळ, पावन तो देश। जेथें हरिचे दास जन्मा येती॥’ ह्या अभंगांत जातिधर्माच्या विरुद्ध तुकोबांनीं कडक आवाज काढलेला आहे. आजच्या काळांत हा विचार महामोलाचा आहे.

चातुर्वर्ण्याची व्यवस्था जेव्हां झाली, तेव्हां हा वर्ण श्रेष्ठ आणि तो वर्ण कनिष्ठ अशी भावना नव्हती. नसेल. पण चातुर्वर्ण्यांतून कालांतरानें वर्णाभिमानाचें आणि वर्णद्वेषाचें विष निर्माण झालें यांत कांहीं शंका नाहीं; आणि ह्या विषानें भारतांतील सर्व जीवन शतकानुशतकें दूषित करून टाकलेलें आहे. तुकोबांच्या काळांत वर्णाभिमानाची तीव्रता कांहीं कमी नव्हती. त्याची झळ त्यांनाहि पुष्कळच सोसावी लागवी. म्हणूनच त्यांना गर्जून सांगावें सागलें कीं, पावित्र्य हें कुळावर वा देशावर अवलंबून नसतें. ज्या कुळांत किंवा ज्या देशांत हरीचे दास जन्माला येतात, तें कुळ पवित्र. तो देश क्षेत्राप्रमाणें पावन!

एवढेंच सांगून तुकोबा थांबले नाहींत. त्यांनीं मोठ्या जिव्हाळ्यानें

आव्हान दिलें, 'वर्ण अभिमानें कोण झाले पावन। ऐसे द्या सांगून मजलागीं ॥' अरे, ह्या वर्णांचा आणि जातीचा अभिमान धरून जगांत कोणी कधीं पावन झालें आहे का? झालें असेल तर सांगा मला त्याचें नांव. उगाच काय गप्पा मारतां आहांत? नाहीं तर मी तुम्हांला अगदीं नांवनिशी देऊन माझें म्हणणें सिद्ध करून दाखवतों बघा.

अंत्यज म्हणजे तुम्ही हीन जाति समजतां ना? मग मी सांगतों, 'अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनें। तयांचीं पुराणें भाट झालीं ॥' आतां बोला. कोणत्याहि जातींत का माणूस जन्माला येईना! ईश्वराची भक्ति हेंच ज्याचें कर्मधर्म झालें, त्याच्या पावित्र्यानें तिन्ही लोक पावन होतात. 'कर्मधर्म त्यांचें झाला नारायण। त्यांचेनि पावन तिन्ही लोक ॥'

तुळाधाराची जात वैश्य होती. गोरा कुंभार होता. रोहिदास हा चांभार. कबीर मोमीन. लतिफ मुसलमान. सेना न्हावी. कान्होपात्र वेश्या. दादु हा पिंजारी. चोखामेळा महार. पण ह्यांपैकीं कोणाचीहि जात ईश्वरप्राप्तीच्या आड येऊं शकली नाहीं. 'त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी।' जनी नामयाची बोलूनचालून दासी. पण देवाच्या दरबारांत तिचा भाव केवढा? देव तिच्याबरोबर जेवायचा. म्हणून सांगतों, 'यातायातीं धर्म नाहीं विष्णुदासा। निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥'

हरिचे दास जातीचा धर्म मानीत नाहींत, हा वेदशास्त्रांचा अभिप्राय आहे. क्षुद्र माणसें उगाच आपल्या जातीचा बडिवार करतात, आणि दुसऱ्या जातीला कमी लेखतात. हा म्हणे ब्राह्मण आणि तो म्हणे महार. जन्मजात जातीमध्यें कमीपणा काय आहे आणि मोठेपणा तरी काय आहे? उत्तम त्या याती। देवा शरण अनन्य गति ॥ जे अनन्य भावानें देवाला शरण जातात ते संत उत्तम जातीचे आहेत, असें म्हणणें योग्य होईल. खरा मोठेपणा किंवा खरें पावित्र्य फक्त त्यांच्या ठिकाणीं आहे. एका देवाखेरीज अन्य ठिकाणीं त्यांचें चित्त मुळींच आश्रय घेत नाहीं. देवाशिवाय ते कशाचेंहि महत्त्व मानीत नाहींत. त्यामुळें हें उत्तम, तें मध्यम, तें कनिष्ठ, असा भेदाभेद ते करीत नाहींत.

देवावर ज्यांचा विश्वास नाहीं, त्यांच्या डोक्यांत श्रेष्ठकनिष्ठपणाचे विचार येतात. किंबहुना, वर्णभेदावर विश्वास ठेवणाऱ्या माणसाला ईश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं असेंच म्हणावयाला हवें. प्रत्येक माणूस हा देवाची मूर्ति आहे. तुकोबा दुसऱ्या अभंगांत म्हणतात, 'उत्तम चांडाळ नरनारी बाळ। अवघेची सकळ चतुर्भुज ॥ अवघा विठ्ठल तेथें दुजा नाहीं। भरला अंतर्बाहीं सदोदित ॥' माणूस उत्तम असो, चांडाळ असो, स्त्री असो, पुरुष असो वा मूल असो. सर्व देवस्वरूप आहेत. सर्वांच्या अंतर्बाहीं विठ्ठल भरलेला आहे. 'तुका म्हणे नाहीं वर्ण अभिमान। अवघे जीवनमुक्त लोक ॥'

वर्णांचा अभिमान ही मोक्षाच्या वाटेवरची फार मोठी धोंड आहे. ती मनांतून आधीं काढून टाकली पाहिजे. आपल्याला कुणबी केलें याबद्दल तुकोबांनीं देवाचे आभार मानले आहेत. आपण उच्च वर्णांचे असतों, पंडित असतों तर नुसत्या दंभानेंच बसल्याजागीं मेलों असतों, आणि आपलें फार नुकसान झालें असतें असें ते म्हणतात. 'गर्व होतो ताठा। जातो यमपंथें वाटा ॥ तुका म्हणे थोरपणें। नरक होती अभिमानें ॥' गर्व किंवा अभिमान ह्या गोष्टी वाईटच. पण वर्णाचा अभिमान सर्वांत घातुक! त्या मार्गानें माणूस सरळ नरकांतच जातो. म्हणून 'यातायातीं धर्म' विष्णुदासांनीं अमान्यच ठरवला आहे. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर–पूजनाचें ॥ तुका म्हणे एक एका देहाचे अवयव। सुखदुःख जीव भोग पावे ॥'

भेदाभेदाची भावना हा एक अमंगळ भ्रम आहे. कोणाचाहि द्वेष करावयाचा नाहीं किंवा मत्सर करावयाचा नाहीं, हाच सर्वेश्वरपूजनाचा एक मार्ग आहे. सर्वांभूतीं समता आणि सर्वांबद्दल ममता हा ईश्वरप्राप्तीचा एकच मंत्र आहे. संतांचा धर्म हा शुद्ध प्रेमधर्म आहे. तेथें भेदाभेद, यातायाती, शिवाशीव ही भाषा कोठून असणार? 'संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ ॥' संतांच्या सृष्टींत प्रेमाशिवाय कांहींच पिकत नाहीं. प्रेमाखेरीज तेथें कांहींच प्रकाशत नाहीं. प्रेमाशिवाय तेथें कांहीं वर्षत नाहीं; आणि

प्रेमाचा भेद मुळीं दिसूंच शकत नाहीं. ह्या दृष्टीनें प्रेम आंधळें आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं.

पण प्रेमांत स्वार्थाची भावना असतां कामा नये. ममतेंत 'ममत्व' नसावें. हा माझा मुलगा आहे, हा माझ्या जातीचा माणूस आहे, हा माझ्या गांवचा रहिवासी आहे म्हणून मी इतरांपेक्षां त्याच्यावर अधिक प्रेम करावें, अशी वृत्ति नसावी. 'दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ॥' आपल्या पोटच्या पोरावर जसें आपण प्रेम करतों, त्याच-प्रमाणें आपण आपल्या दासावर आणि दासीवर प्रेम करावें, ह्यांतच खरा साधुपणा आणि देवपणा आहे.

केवळ वर्णभेदाच्याच नव्हे तर वर्गभेदाच्या नि अर्थभेदाच्या मर्यादाहि तुकोबांनीं झुगारून दिलेल्या आहेत. सर्व विश्व ईश्वर आहे. 'विश्व देव सत्यत्वें' असा तुकोबांचा अनुभव होता. म्हणून कोणताहि भेदभाव मनांत न बाळगतां सर्वांच्या उद्धाराचा मार्ग त्यांनीं सारख्याच तळमळीनें दाखवून ठेवलेला आहे.

**या रे या रे लहानथोर**
**याति भलते नारीनर**
**करावा विचार**
**नलगे चिंता कोणासी!**

तुकाराम : १-५-१९५४

## देवाचिया चाडें आळवावें देवा

देव म्हणजे माणसाला एक मोठी युक्तीच सांपडली आहे. त्याला जें कांहीं पाहिजे असेल तें देवापाशीं आहे अशी त्यानें आपली समजूत करून घेतली आहे. देवाचें नांव घेतलें, देवाची पूजा केली, देवाला दक्षिणा दिली, देवाला नैवेद्य दाखवला, देवाला नवस केला, देवापुढें धरणें धरलें, म्हणजे आपल्याला हवें तें देव मुकाट्यानें आपल्यापुढें आणून टाकतो अशी माणसानें खूणगांठ बांधून ठेविली आहे. म्हणून जगाच्या आरंभापासून तों आतांपर्यंत माणसें देवाचा अगदीं पिच्छा धरून आहेत. आपल्याला जें पाहिजे असेल त्यासाठीं आपण स्वतः कांहींहि प्रयत्न करायला नको. त्याची आपल्यावर मुळींच जबाबदारी नाहीं. देता देवविता सगळा देव आहे. असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी. आपलें काम एवढेंच! आपण फक्त देवाच्या पाठीमागें लागावयाचें! बस्!! त्याला भंडावून सोडावयाचें! मग देवाची काय बिशाद् लागली आहे आपल्याला नाहीं म्हणावयाची?

हा माणसांनीं जो आपल्या अकलेनें ठोकताळा बसवून ठेवला आहे,

त्याला तुकोबांनीं फार चांगला उतारा दिला आहे. एकदां काय झालें, एक विद्वान ब्राह्मण पंढरीला गेला आणि विठोबाशीं धरणें धरून बसला. 'देवा, मी विद्वान् आहें. सर्व शास्त्रें पढलेला आहें. तेव्हां आतां मला ताबडतोब मोक्ष देऊन टाक बघूं. मोक्षप्राप्तीला माझ्यासारखा लायक माणूस कोणीच नाहीं!'

देवाला पडली पंचाईत. ब्राह्मणाला एकदम मोक्ष कसा देऊन टाकावयाचा? देवाला ज्ञानोबांची आठवण झाली. कारण 'ज्ञानियांचा राजा गुरुमहाराज' असा ज्ञानदेवांचा अधिकार. तेव्हां तेच ह्या ब्राह्मणाला मोक्षाचा योग्य रस्ता दाखवितील, असा देवानें विचार करून त्या ब्राह्मणाला सांगितलें कीं, 'तुम्ही असें करा. आळंदीला जा. तुम्हांला जें पाहिजे तें आमचे ज्ञानोबा देतील.'

ब्राह्मण उठला. पंढरीहून थेट आळंदीला गेला अन् ज्ञानोबांच्या समाधी-पुढें जाऊन त्यानें धरणें धरलें. 'ज्ञानोबा माउली, पांडुरंगानें आम्हांला तुमच्याकडे पाठविलें आहे. तेव्हां आम्हांला मोक्ष मिळवून देण्याची झटपट व्यवस्था करून टाका.'

ज्ञानोबांनीं ब्राह्मणाला तत्काळ सांगितलें, 'तुम्ही इथें नका वेळ घालवूं. तुम्ही देहूला जाऊन तुकोबांना भेटा. तुमच्या मोक्षाची सगळीं व्यवस्था ते करतील!' ब्राह्मण उठला अन् त्याच पावलीं देहूला गेला. चार कोसांचा तर रस्ता.

तुकोबा पांडुरंगावर आपल्या भक्तीचीं अभंगफुलें उधळीत बसले होते. 'तूं माउलीहून मवाळ। चंद्राहून शीतळ॥ पाणियाहून पातळ। कल्लोळ प्रेमाचा॥' ब्राह्मणानें त्यांना हटकलें. तुकोबांनीं डोळे उघडले. हंसून विचारलें, 'कां येणें केलें?'

ब्राह्मणानें सगळा इतिहास सांगितला. 'आम्ही आधीं पंढरीला विठोबाकडे गेलों. त्यांनीं आमची ज्ञानोबांकडे रवानगी केली. अन् ज्ञानोबांनीं आम्हांला तुमच्याकडे पाठविलें.'

तें ऐकून तुकोबांच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वाहूं लागलें. ते

विठोबाला म्हणाले, 'पंढरीशा पतितपावना। एक विज्ञापना पायापाशीं ॥ अनाथा जीवांचा तूं काज-कैवारी। ऐसी चराचरीं ब्रीदावली ॥' अंतरींचीं सर्व गुजें जाणणारा तूं. सर्वांची आळी पुरवून अभय देणारा तूं. ह्या धरणेकऱ्याचें मी काय समाधान करणार? 'आतां तुझी लाज तुज देवा।' अन् ज्ञानोबा मायबापा! हें धरणें तुम्ही माझ्याकडे कशाला धाडून दिलेंत? 'काय ज्ञानेश्वरीं उणें। तिहीं पाठविलें धरणें?॥' मी काय तुमच्यापेक्षां शहाणा आहें? तुम्हीच्च मला बोलायला शिकवलंत. तुम्ही माझ्याकडे या धरणेकऱ्याला पाठवून मला हा मोठेपणा दिलात अन् माझी उपाधी वाढवलीत. 'मज पामरा हें काय थोरपण। पायींची वहाण पायीं बरी ॥' असो. तुम्ही बोलूनचालून माझे स्वामी. माझे धणी. तुमचें वचन मला पाळलेंच पाहिजे.'

असें मनोगत करून ते ब्राह्मणाला म्हणाले, 'अहो, तुम्ही एवढे विद्वान पंडित. देवाकडे मोक्ष मागावयाला गेलांत. पण देवानें काय आपल्याजवळ मोक्षाचें गाठोडें बांधून ठेवलें आहे होय? 'नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोडें। आणूनि निराळें द्यावें हातीं ॥'

ब्राह्मणानें रागावून विचारलें, 'देवापाशीं मोक्षाचें गाठोडें नाहीं तर तें आहे कुणापाशीं?'

तुकोबा म्हणाले, 'अहो, तुमच्यापाशीं. इंद्रियांचा जय साधूनियां मन। निर्विषय करण असे तेथें ॥ इंद्रियांवर आणि मनावर जोंपर्यंत तुम्ही जय मिळविला नाहींत तोंपर्यंत तुम्हांला मोक्ष कसा मिळेल? मोक्ष म्हणजे काय तुमच्या मनाबाहेर आणि शरिराबाहेर असलेली गोष्ट आहे काय? अन् देव तरी तुमच्यापासून दूर थोडाच आहे? 'नाहीं जावें यावें दुरुनी लागत। आहे साक्षीभूत अंतरींचा ॥' तुम्ही मनाला साक्षी ठेवून करुणा भाका. तुमच्यासारख्या विद्यावंतांनीं देवापुढें धरणें धरून त्याला संकटांत टाकणें बरें नाहीं.'

ब्राह्मण उखडला. तो म्हणाला, 'अहो, मीच काय पण सारें जग देवाच्या पाठीमागें हात धुवून लागलें आहे. कुणी तप करतंय्, कुणी

तीर्थाटण करतंय्, कुणी यज्ञयाग करताहेत, कुणी दानधर्म करताहेत, कुणी उपास करताहेत, कुणी पारणीं करताहेत, त्यापेक्षां मी फार बरा. मी आतांपर्यंत ग्रंथांचेंच तेवढें अध्ययन केलें आहे.'

तुकोबा म्हणाले, 'या ग्रंथांच्या भरीं पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही नुसती तोंडपिटी आहे. तपतीर्थाटणें आणि यज्ञयाग हे नुसते काबाडकष्ट आहेत. उपास-पारणीं ही शुद्ध आटापिटी आहे. ह्यांतून कांहींएक निष्पन्न होणार नाहीं. माणसानें सत्कर्म करीत राहिलें तर शेवटीं फळ मिळतें.'

ब्राह्मण विचारांत पडला. शेवटीं तो म्हणाला, 'म्हणजे मग तुमचें म्हणणें असें आहे कीं, देवाकडे जाऊन आम्ही कांहीं मागूंच नये! मग देवाची उपासना तरी आपण कशाला करावयाची?'

तेव्हां तुकोबा म्हणाले, 'योग्य प्रश्न विचारलात. त्याचें उत्तर सांगतों. 'देवाचिया चाडें आळवावें देवा!' देवापासून कांहीं मिळवावयाचें म्हणून देवाला आळवावयाचें नाहीं तर केवळ देवाच्या प्रेमानें देवाची भक्ति करावयाची.'

अशा तऱ्हेनें धरणेकरी ब्राह्मणाला तुकोबांनीं अकरा अभंगांमध्यें उपदेश केला. पण ह्या सर्व उपदेशाचा गाभा हा. 'देवाचिया चाडें आळवावें देवा!' भक्तीचें हें रहस्य ज्या दिवशीं लोकांना कळेल तो सुदिन.

कर्मठपणा म्हणजे देवाची भक्ति अशीच सर्वांची समजूत आहे. पण हे सगळे काबाडकष्ट आहेत. तुका म्हणे नको काबाडाचे भरी। पडो सार धरीं हेंचि एक. मन जिंकल्यानें आणि सत्कर्म करीत राहिल्यानेंच मोक्ष मिळतो. देवाची भक्ति केवळ देवाच्याच प्रेमानें करावी. तिच्या पोटीं दुसरा कांहींहि हेतु असूं नये. 'देवाचिया चाडें आळवावें देवा ॥'

तुकाराम : ८-५-५४

## गीतेचें बीज ईशावास्यातच !

वेद हे हिंदुधर्माचे मूलभूत ग्रंथ होत. त्यांच्या मध्येंच संहिता, ब्राह्मणें आणि उपनिषदें ह्यांचा समावेश होतो. यज्ञयागादि कर्मांचा नि पारमार्थिक ज्ञानाचा उगम या तिन्हीमधून होतो. तथापि उपनिषदांत फक्त ज्ञानकांडाचाच अंतर्भाव होतो. म्हणून सर्व भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया उपनिषदेंच होत असें म्हणावयास हरकत नाहीं. मानवी जीवनाकडे पहाण्याची भारतीयांची दृष्टि कोणती आहे हें समजावून घ्यावयाचें असल्यास उपनिषदांचाच अभ्यास केला पाहिजे, आणि त्यांचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. उपनिषदांचा अगदीं स्वतंत्र दृष्टीनें विचार केला तरी रचनेच्या आणि विवेचनाच्या दृष्टीनें तीं इतकीं मौलिक आणि आकर्षक आहेत कीं तीं कितीहि वेळां वाचलीं तरी मनाची तृप्ति होत नाहीं.

पाश्चात्य तत्त्वज्ञानी शौपनहार याला तर उपनिषदांनीं वेडच लावलें होतें. रोज झोंपीं जाण्यापूर्वीं तो एक उपनिषद् वाचीत असे. उपनिषदांची एकंदर संख्या दोनशेंच्या वर आहे. परंपरेनें तीं एकशेंआठ मानलीं जातात. लोकमान्य टिळकांनीं 'गीतारहस्यां'त सत्तावीस उपनिषदांचीं नांवें दिलेलीं

अनुक्रम 37.344 दि. १९
क्रमांक 93054 ........ नों: दि:3.

आहेत. तथापि त्यांपैकीं फक्त बारा उपनिषदेंच वेदांमध्यें आढळतात. उपनिषदें हीं वेदांच्या अंतीं म्हणजे शेवटीं येतात म्हणून त्यांना 'वेदान्त' असें म्हणतात.

हें जरी खरें असलें तरी उपनिषदें हें वैदिक तत्त्वज्ञानाचें सारसर्वस्व आहे या दृष्टीनें त्यांना 'वेदान्त' असें संबोधिलें जातें. 'उपनिषद्' या शब्दांचा अर्थ निरनिराळ्या भाष्यकारांनीं निरनिराळा दिलेला आहे. शंकराचार्यांच्या मतें उपनिषदें अविद्येचा नाश करतात आणि आत्म्याला ब्रह्माकडे नेतात.

पण व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तर 'उपनिषद्' म्हणजे गुरूच्या जवळ (उप) जाऊन भक्तीनें बसणें असा अर्थ होतो. विनोबा म्हणतात, 'जेव्हां मनुष्य बलवान् होतो तेव्हां तो उठून उभा राहातो. उठून उभा राहिला म्हणजे तो गुरूची सेवा करतो. मग तो गुरूच्या जवळ जाऊन बसतो. गुरूचें जीवन निरखतो. त्यांचें व्याख्यान ऐकतो, मनन करतो, जाणतो, आणि तदनुसार कृति करतो. त्यांतून त्याला विज्ञान म्हणजे अपरोक्ष अनुभूति लाभते. तीच 'उपनिषद्' होय.

उपनिषदांचें ज्ञान हें सर्वसामान्य लोकांसाठीं नसून तें शिष्यांना गुप्तपणें दिलें जात असल्यानें 'उपनिषदें' म्हणजे रहस्यविद्या असाहि अर्थ त्यांना प्राप्त झाला आहे. सर्व उपनिषदांमध्यें 'ईशावास्य' हें अतीव सुंदर उपनिषद् आहे असें मानलें जातें. जगांतील महान् तत्त्वज्ञान्यांच्या मनावर ह्या एका उपनिषदानें सर्वांत जास्त परिणाम केलेला आढळतो. विनोबा त्याला शिरोमणि उपनिषद् म्हणतात. वेदांचें सर्व रहस्य जणुं त्यांतच आलेलें आहे. पारमार्थिक जीवनाचा परिपूर्ण आराखडाच त्यांत थोडक्यांत मांडलेला आहे. त्या दृष्टीनें तें एक पूर्ण उपनिषद् आहे. सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, हिंदुधर्माचा परम पवित्र ग्रंथ जो 'भगवद्गीता' त्या गीतेचें बीज ह्या ईशावास्यांत सांपडतें.

गीतेचे जसे अठरा अध्याय आहेत तसे ईशावास्याचे फक्त अठराच मंत्र आहेत. गीता आणि ईशावास्य ह्यांच्यांतील वैचारिक साम्य विनोबांनीं तर स्पष्टच करून दाखविलें आहे. तें सगळें इथें देतां येणार नाहीं. कर्मयोग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत.
अनुक्रम .......... वि: ........

हें गीतेचें रहस्य आहे असें आपण मानतों. या कर्मयोगाचा स्पष्ट पुरस्कार गीतेच्या पूर्वी 'ईशावास्यां' त केलेला प्रथम आढळून येईल. 'कुर्वन्नेवेह कर्माणि, जिजीविषेत् शतं समाः' इहलोकीं कर्में करीत करीतच शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरावी असें 'ईशावास्य' सांगतें. अन्याचशा उपनिषदांचा ओढा सामान्यतः कर्मसंन्यासाकडे आहे. पण आमरणान्त कर्में करीत राहाण्याचा उपदेश 'ईशावास्योपनिषदा'नें केला आहे हें लक्षांत ठेवावें.

संन्यास किंवा वैराग्य ह्या कांहीं अभावात्मक कल्पना नव्हत. संन्यास म्हणजे कर्मत्याग नव्हे. त्याग आणि कर्म ह्यांची उत्कृष्ट सांगड ईशावास्यानें पहिल्याच दोन मंत्रांमध्यें घालून दिली आहे. जगांतलें हें सर्व जीवन ईश्वरानें भरलेलें आहे म्हणून ईश्वराच्या नांवानें त्यागून तूं त्याचा यथाप्राप्त उपभोग घेत जा. कोणाच्याहि धनाविषयीं वासना राखूं नकोस. पण त्याचबरोबर इहलोकीं कर्में करीत करीतच शंभर वर्षें जगण्याची तूं इच्छा धर असें 'ईशावास्य' म्हणतें. फळाची आशा न धरतां तूं सतत निष्काम-बुद्धीनें लोकसेवा करीत रहा हा गीतेमधला मध्यवर्ती विचार ईशावास्याच्या पहिल्या दोन मंत्रांमधूनच उत्क्रान्त झालेला आहे, यांत काय शंका ?

ज्याचा आत्मा योगयुक्त झाला त्याची दृष्टि सर्वत्र सम होऊन सर्व भूतांच्या ठायीं आपण आणि आपल्या ठायीं सर्व भूतें आहेत असें त्याला दिसूं लागतें असें सर्वभूतात्मैक्याचें किंवा साम्यबुद्धीचें तत्त्व गीतेच्या सहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. आणि मौजेची गोष्ट ही आहे कीं, नेमकें हेंच तत्त्व 'ईशावास्या' च्या सहाव्या मंत्रांत सांगिततलेलें आहे. 'जो निरंतर आत्म्यांतच सगळीं भूतें आणि सगळ्या भूतांत आत्मा पहातो, तो मग कोणालाहि आणि कशालाहि कंटाळत नाहीं.' आत्मौपम्य दृष्टीनें म्हणजे सर्वांशीं सारखेपणानें वागावें हा गीतेचा संदेश प्रथम ईशावास्यांत प्रकट झालेला आहे.

मृत्युलोकींचा प्रपंच नीट चालवणें किंवा त्यांतून चांगल्या रीतीनें पार पडणें यास गीतेंत 'लोकसंग्रह' असें नांव दिलेलें आहे. मोक्ष मिळविणें हें मनुष्याचें कर्तव्य खरें. पण त्याबरोबरच त्यानें लोकसंग्रह करणें अवश्य

असल्यामुळें ज्ञानी पुरुषानें हें लोकसंग्रहकारक कर्म सोडूं नये असा गीतेचा सिद्धान्त आहे. नेमका हाच सिद्धान्त 'ईशावास्या'च्या नवव्या व अकराव्या मंत्रांत सांगितलेला आहे. नुसती अविद्या म्हणजे कर्म सेवन करणारे पुरुष अंधकारांत शिरतात आणि नुसत्या विद्येंत म्हणजे ब्रह्मज्ञानांत गढून जाणारे पुरुष जास्त अंधकारांत पडतात. म्हणून विद्या (ज्ञान) आणि अविद्या (कर्म) हीं दोन्ही एकमेकासह ज्यानें जाणिलीं तो अविद्येनें म्हणजे कर्मानें मृत्यु म्हणजे नाशिवंत मायासृष्टीचा प्रपंच चांगल्या तऱ्हेनें तरून जाऊन विद्येनें म्हणजे ब्रह्मज्ञानानें अमृतत्व प्राप्त करून घेतो. ज्ञान व कर्म या दोन्हींचा एककालीन समुच्चय ईशावास्यांत प्रतिपादिलेला आहे हें त्याचें वैशिष्ट्य आहे.

मानवी जीवनांतील सर्व कठीण समस्या अत्यंत सुबोधपणें सोडविण्याचा 'ईशावास्य' हा एक अपूर्व आणि प्रचण्ड प्रयत्न आहे. 'सुवर्णमय पात्रानें सत्याचें मुख झांकलेलें आहे. हे विश्वपोषक प्रभो, सत्यधर्माचा मी उपासक, माझ्या दर्शनासाठीं तूं तें उघडें कर,' या पंधराव्या मंत्रांत 'ईशावास्या'चें सार आलेलें आहे. त्याचा जेवढा विस्तार करावा तेवढा थोडाच आहे. विनोबांच्या प्रेरणेनें 'ईशावास्या' कडे माझी दृष्टि वळली—आणि मी तें मुखोद्गत करून टाकलें. ही महान् संजीवनी सर्वांनीं सेवावी नि पचवावी ही इच्छा.

तुकाराम : १५-५-१९५४

# आम्ही कसले संत ?

'तुकाराम' साप्ताहिक काढल्यापासून आमच्या आयुष्यांत एक मोठी मौज निर्माण झाली आहे. लोकांना वाटतें कीं, आमच्यांत बदल झाला आहे. आमचें परिवर्तन झालें आहे. आम्ही संत झालों आहोंत. आमच्या नांवामागची 'आचार्य' ही उपाधि कित्येकांना कमी वाटूं लागली आहे. म्हणूनच कीं काय तिच्यांत 'हरिभक्तिपरायण' आणि 'महाराज' या विशेषणांची कांहीं भाविक पत्रलेखक भर घालूं लागले आहेत. सुदैवानें आमची विनोदबुद्धि वाजवीपेक्षां थोडीशी जास्तच तल्लख असल्यानें आम्हांला माहीत असलेलें आमचें प्रत्यक्ष जीवन आणि भोळ्या लोकांनीं आमच्याबद्दल करून घेतलेली समजूत ह्यामधली विसंगति आम्हांला विशेष तीव्रतेनें जाणवते. ह्या देशांतले लोक किती थोडक्यानें फसतात हें येथें जाणवल्यावांचून राहात नाहीं.

ह्यांत त्यांचा काय दोष आहे ? विचार करण्याची त्यांना मुळीं संवयच नाहीं. सारे अंधश्रद्धेचे उपासक. केसांत किंवा कपड्यांत बदल झाला तरी अंगीं साधुत्व प्रकट झाल्याचा प्रत्यय जेथें लोकांना येतो, तेथें आमच्या-

सारखा व्यावसायिक संपादक संतांची पावनवाणी आठवड्याचे आठवड्याला नुसती तोंडानें उच्चारूं लागला, तर त्याच्या समग्र जीवनामध्यें एकदम संतपण प्रादुर्भूत झाल्याचा श्रद्धाळू वाचकांना कां भास होऊं नये बरें?

म्हणून आमच्यावर प्रेम करणाऱ्या ह्या सर्व वाचकांना अगदीं हात जोडून आम्हांला एवढेंच विनवावयाचें आहे कीं, संतांच्या अंगांवर शोभणारीं हीं भूषणें त्यांनीं आमच्यावर वाहूं नयेत. त्यानें आम्हांला सर्वांत जास्त दुःख होतें. ह्याशिवाय आमच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहूं लागणाऱ्यांचा आणखी एक प्रकार आहे. तो असा.

परवां आम्ही पुण्याला गेलों होतों. तेथें आम्हांला एक मित्र भेटला. सनातनी वृत्तीचा आहे तो. 'तुकाराम' साप्ताहिक सुरू केल्याबद्दल आमचें त्यानें मनःपूर्वक अभिनंदन केलें. तो म्हणाला, 'तुमच्यांत परिवर्तन झालें ही फार चांगली गोष्ट झाली.' आम्ही एकदम दचकून त्याच्याकडे पहातच राहिलों. आम्ही म्हणालों, 'पूर्वीं मी कोणी तरी भयंकर पापी होतों आणि 'तुकाराम' पत्र काढल्यापासून मी मोठा पुण्यवान् झालों अशाच जणुं कांहीं स्वरानें तुम्ही बोलतांहांत कीं हो!' तेव्हां तो म्हणाला, 'म्हणजे तुमच्या जीवनांत परिवर्तन झालें ही आमची समजूत खोटीच तर?' तेव्हां मी म्हणालों, 'तें काय समजायचें तें तुम्ही समजा. मी आहें तसाच आहें. पूर्वीं वाईट होतों ही जशी तुमची समजूत खोटी, त्याप्रमाणें आतां अधिक चांगला झालों हीहि तुमची कल्पना चुकीची!'

हें माझें उत्तर ऐकून मशारनिल्हे मित्र सर्दच झाला. वेडेंवांकडें तोंड करून तो म्हणाला, 'मग तुमचें पत्र वाचण्यांत काय अर्थ आहे?' तेव्हां मी म्हणालों, 'तें मी कसें सांगूं? तो तुमचा प्रश्न आहे.' लोक ढोंगाला नाकें मुरडतात खरे, पण त्यांना ढोंगच हवें असतें. स्वतःचे दोष लपवून गुणांचा गवगवा करणें हें सर्वांत सोपें आहे. पण तुकोबांचें नांव तोंडानें उच्चारणाऱ्या माणसानें निदान एवढें तरी ढोंग करूं नये, नाहीं का? 'तुका म्हणे अवघें सोंग। तेथें कैचा पांडुरंग॥' ज्याची ईश्वरावर श्रद्धा आहे तो तरी निदान अशा ढोंगाला बळी पडणार नाहीं.

संत व्हायचें म्हणजे सोपी का गोष्ट आहे? संतांच्या नांवाचें पत्र काढून का कोणी संत होतें?

नव्हती ते संत करितां कवित्व
संतांचे ते आप्त नव्हती संत

नव्हती ते संत धरितां भोपळा
पांघरति वाकळा नव्हती संत

नव्हती ते संत करितां कीर्तन
सांगतां पुराण नव्हती संत

नव्हती ते संत वेदाच्या पठणें
कर्म आचरणें नव्हती संत.

नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें
भस्म उधळणें नव्हती संत

तुका म्हणे नाहीं निरसिला देहें
तोंवरी अवघे हे सांसारिक.

अभंग करणारे संत नव्हत. पुराणप्रवचनें सांगणारे संत नव्हत. वेदांचें पठन करणारे संत नव्हत. अंगाला भस्म चोपडणारे किंवा माळामुद्रा धारण करणारेहि पण संत नव्हत. देहाची आसक्ति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत कोणी संत नव्हत. सारे सांसारिकच. हा तुकोबांचा दाखला जर आमच्या डोळ्यासमोर आहे तर संताच्या पदवीचा अपघातानें सुद्धां आम्ही आम्हां स्वतःला कसा स्पर्श करून देऊं?

भूतांची दया हें भांडवल संता आपुली ममता नाहीं देहीं॥

देह निरसायचा म्हणजे मी–मला–माझें ही 'मी'ची बाराखडीच जीवनांतून काढून टाकावयाची. ह्यालाच तुकोबा म्हणतात,

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा
तो जाला सोहळा अनुपम्य
फिटलें सुतक जन्ममरणाचें
मी माझ्या संकोचें दुरीं जालों.

स्वतःच्या देहाच्या लहानशा कोशांतून संत बाहेर पडतात. त्यामुळें ते जगाचे होतात. मग जगाच्या कल्याणासाठीं जगणें एवढेंच कार्य त्यांना उरतें. 'तुका म्हणे आतां। उरलों उपकारापुरता॥' संतांच्या अंगांत मोहरी-एवढा सुद्धां दोष असतां कामा नये.

गंगाजळ पाहीं पाठी पोटीं नाहीं
अवगुण तो कांहीं अमृतासी.
रविदीप काळिमा काय जाणे हिरा
आणिक तिमिरा नाश तेणें.
कर्पूर कांडणीं काय कोंडाकणी
सिंधू मिळवणी काय चाले?
तुका म्हणे तैसे जाणा संतजन
सर्वत्र संपूर्ण गगन जैसे

अशी संतांची योग्यता आहे. तुकोबा तर त्यांना पुढें 'भगवंताची मूर्ति' म्हणतात. एखाद्या शतकांत एका देशांत वा समाजांत एखादाच संत जन्माला येतो. पण

संतचिन्हें लेउनि अंगीं
भूषण मिरविती जगीं
काम क्रोध लोभ चित्तीं
वरिवरीं दाविती विरक्ती
तुका म्हणे शब्दज्ञानें
जग नाडियलें तेणें—

अशीं संतांचीं सोंगें सर्वत्र पहावयाला मिळतात आणि त्यामुळें अज्ञजनांच्या बुद्धिभेद होतो.

आमची स्वतःची देहाची आसक्ति अद्याप सुटली नाहीं आणि ती सुटणारहि नाहीं. सामान्य माणसाच्या आवांक्याबाहेरचें हें काम आहे. चिलटानें आभाळांत भरारी मारण्याची इच्छा धरण्यासारखेंच हें आहे. विनोदानें खरें बोलायचें तर आम्ही एका गाढवाचे गुलाम आहोंत. चोवीस तास त्या गाढवाच्या तैनातींत असतों. गाढव जेवलें का? गाढव पाणी प्यालें का? गाढव झोंपलें का? गाढवाला खरारा झाला का? गाढव जिकडे नेईल तिकडे आम्हांला जावें लागतें. गाढवाचे सारे लाड आम्हांला पुरवावे लागतात. गाढवानें झक मारली तर आम्हांला डोळ्यावर कातडें ओढून स्वस्थ बसावें लागतें. आमच्याप्रमाणें सगळें जगच असें गाढवांचें गुलाम आहे.

अशा लाचार परिस्थितींत संतांची आठवण आम्हांला होते, त्यांची पावनवाणी आमच्या तोंडून निघते हेंच केवढें आमचें भाग्य! पण तेवढ्यानें आम्ही 'संत' झालों अशा डागण्या आमच्या दुःखावर कोणी देऊं नयेत. 'तुका म्हणे संत। सोशी जगाचे आघात॥' इथें एखादा माणूस आमच्या विरुद्ध थोडासा बोलला तर आम्ही शंख करीत उठतों. आम्ही कसले संत?

तुकाराम : २२-७-५४

## वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरें

तुकोबांच्या सर्व अभंगांत हा एक अभंग आम्हांला अतिशय आवडतो. मूर्तिमंत काव्य भरलें आहे त्याच्यांत :

**वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळवीती**
**तेणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगां येत**
**आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी**
**कथा कमंडलू देह उपचारा । जाणवितो वारा अवसरू**
**हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनी प्रकार सेवूं रुचि**
**तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणांसी**

एकान्तवासाचें एवढें रम्य वर्णन कोणीहि केलें नसेल. तुकोबांना जगांतील माणसांचा उबग आला. नको त्यांचें दर्शन आणि नको त्यांचा सहवास, असें त्यांना होऊन गेलें. त्यापेक्षा लांब कुठें तरी रानांत जाऊन बसावें असें त्यांना वाटूं लागलें. अशी त्यांच्या मनाची वृत्ति होण्यास कारण असें झालें.

एकदां तुकोबांचें कीर्तन चालू असतां श्रोते मधूनच उठून जाऊं लागले.

तें बघून तुकोबांना फार वाईट वाटलें. आपण जीव तोडून या लोकांना त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखवीत असतां त्यांना त्याची किंमत वाटूं नये ह्याचें त्यांना अतिशय दुःख झालें. घरीं जाऊन त्यांनीं ह्या गोष्टीवर पुष्कळ विचार केला आणि ठरविलें,

**आपुला विचार करीन जीवासी**
**काय या जनासी चाड मज ?**
**आपुलें स्वहित जाणिती सकळ**
**निरोधितां बळ दुःख वाटे.**
**आईको नाईको कथा कोणी तरी**
**जाऊनियां घरीं निजो सुखें**
**माझी कोण वोज झाला हा शेवट**
**देखोनिया वाट आणिकां लावूं ?**
**तुका म्हणे भाकूं आपुली करुणा**
**जयाची वासना तया फळें**

यापुढें माझ्याच हिताचा विचार मी करीत जाईन. लोकांची चाड मी विनाकारण कशाला धरूं ? ज्याला त्याला आपापलें हित उत्तम प्रकारें कळतें. मग माझ्या उपदेशाची त्यांना काय जरुरी आहे ? उलट असें करूं नका, तसें करूं नका, असें जर मी त्यांना सांगूं लागलों तर त्यामुळें त्यांना वाईट वाटेल. माझें कीर्तन कोणी ऐको वा न ऐको, किंवा घरीं जाऊन खुशाल झोंप घेवो, मी तें मनाला लावून घेणार नाहीं. माझें स्वतःचें काय असें मोठें चांगलें झालें आहे म्हणून मी दुसऱ्यांना त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखवूं ? मी कीर्तन करून देवाजवळ माझ्या स्वतःसाठीं करुणा भाकीन. ज्याची वासना जशी असेल तसें त्याला फळ मिळेल. दुसऱ्यांनीं सांगून काय व्हायचें आहे ?

ह्या मानसिक अवस्थेंत त्यांनीं जगाचा संबंध सोडला आणि मग एकांतवासाबद्दल त्यांना विलक्षण आकर्षण वाटूं लागलें. वृक्षवल्ली आणि वन्यपशू हींच त्यांना सोयरींधायरीं वाटूं लागलीं. दिवसभर तेथें पक्ष्यांचें

मधुर गायन चाललेलें असतें. माणसांच्या कंटाळवाण्या गजबजाटांत असें गायन कोठलें ऐकायला मिळावयाचें? ह्यामुळें एकांतवास मोठा रम्य वाटूं लागतो. माणसांच्या संगतीचा परिणाम असा होतो कीं, त्यांचे गुणदोष आपल्या अंगाला चिकटतात आणि त्यामुळें आपल्या मूळच्या व्यक्तित्वाचा लोप होतो. वृक्षवल्लींच्या संगतींत तें भय नसतें. त्यांचे गुणहि आपल्या अंगीं येत नाहींत किंवा त्यांचे दोषहि पण आपल्याला चिकटत नाहींत. त्यामुळें आपल्या व्यक्तिमत्वाचा नैसर्गिक विकास होतो.

खालीं पृथ्वीचें विस्तीर्ण हिरवेंगार आसन आणि डोक्यावर आकाशाचा भव्य निळाभोर मंडप. तेथें आपलें मन हर्षित होऊन पक्ष्यासारखें भराऱ्या मारूं लागतें आणि एखाद्या लहान मुलासारखें बागडत सुटतें. देहाच्या उपचारासाठीं भीक मागण्याची एक झोळी नि पाणी पिण्यासाठीं एखादा कमंडलू; ह्यापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची जरुरी नाहीं. वेळ कळण्याचें साधन म्हणजे वारा. हरिकथा हेंच भोजन. त्याचे अनेक रुचकर प्रकार करून खातां येतात. सारा वेळ स्वतःबरोबर वाद घालीत बसावयाचें. हाच एकांतवासाचा सर्वांत मुख्य फायदा होय.

ज्याला आत्मपरीक्षण करावयाचें आहे आणि चित्तशुद्धि साधावयाची आहे त्याला अहर्निश एकांतवास पत्करून स्वतःच्या मनाशीं वाद घालीत बसलें पाहिजे. त्याशिवाय स्वतःच्या अंगांतील दोष त्याला कळून येणार नाहींत. आपल्या सर्व दोषांची इत्थंभूत जाणीव तुकोबांना होती. म्हणूनच त्यांनीं म्हटलें आहे,

> **कासया गुणदोष पाहों आणिकांचे**
> **मज काय त्यांचें उणें असे ?**
> **काय पाप पुण्य पाहूं आणिकांचें**
> **मज काय त्याचें उणें असे ?**
> **नष्ट दुष्टपण कवणाचें वाणूं ?**
> **तयाहून अणु अधिक माझें**

कुचर खोटा मज कोण असे आगळा
तो मी पाहूं डोळा आपुलीये
तुका म्हणे मी भांडवलें पुरता
तुजसी पंढरीनाथा लावीयलें.

दुसऱ्याचे गुणदोष पाहात बसण्याची मला जरुरीच काय? माझ्यामध्यें काय ते कमी आहेत? दुसऱ्यांच्या पापपुण्याच्या चौकश्या मी कशाला करूं? दुसऱ्यांच्या नष्टपणाचीं आणि दुष्टपणाचीं लांबलचक वर्णनें मी कशाला करूं? माझ्या अंगीं ह्या सर्व गोष्टी अगदीं भरपूर आहेत. माझ्यापेक्षां खोटा अन् वाईट जगांत दुसरा कोण आहे कीं, ज्याकडे मी तुच्छतेनें वेडेवांकडे डोळे करावेत? माझ्या अंगांत हें सर्व भांडवल अगदीं तुडुंब भरलें आहे. आणि देवा पंढरीनाथा, तें मी आतां तुझ्याकडेच लावून दिलें आहे.

जगांत माणसें दुसऱ्यांच्या दोषांवर सारखी टीका करीत असतात. स्वतःच्या अंगामधले दोष त्यांना दिसत नाहींत. अहंकारामुळें तीं आंधळीं होतात. अहंकाराच्या मुळाशीं घाव घातल्याखेरीज आपल्या स्वरूपाचें यथार्थ दर्शन होणार नाहीं. कांहीं लोक तुकोबांची निंदा करीत असत. पण त्यांची ही निंदा खोटी आहे असा चुकूनहि विचार तुकोबांच्या मनांत कधीं आला नाहीं.

चंदनाच्या वासें धरतील नाक
नावडे कनक न घडे हें
साकरेची गोडी सारिखी सकळां
थोरा मोठ्या बाळां धाकुटिया
तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें
तरी कां निंदिते लोक मज

चंदनाचा सुगंध आला म्हणजे स्वतःचें नाक दाबून धरतांना कोणी दिसला आहे का? सोनें ज्याला आवडत नाहीं असा कोणी माणूस आढळला

आहे का? साखर ही गोड नाहीं असा वाद तरी कधीं उद्भवतो का? लहानापासून मोठ्यापर्यंत, अगदीं चिमुकल्या मुलांपर्यंत साखरेची गोडी सर्वांना समजते. चंदनाचा वास, सुवर्णाचें मूल्य आणि साखरेची गोडी, ह्या गोष्टींची जगांत निंदा होत नाहीं. मग माझीच कां होते? ह्याचा अर्थ उघड आहे कीं, अद्याप माझें चित्त शुद्ध नाहीं. म्हणून लोकांना माझा सुगंध येत नाहीं. माझें चित्त जर खरोखरच शुद्ध असतें तर लोकांनीं चुकून अवाक्षर काढलें नसतें माझ्याविरुद्ध.

कठोर आत्मपरीक्षणाची ही अगदीं पराकाष्ठा आहे. या अग्निदिव्यांतून तुकोबा गेले म्हणूनच त्यांच्या आयुष्यांत एक दिवस असा उगवला कीं, ते आत्मविश्वासानें म्हणूं शकले कीं,—

**पिकलिया सेंद कडूपण गेलें**
**तैसें आम्हां केलें पांडुरंगें**
**काम क्रोध लोभ निमाले ठायींची**
**सर्व आनंदाची सृष्टि झाली!**
**तुका म्हणे भाग्य या नांवें म्हणीजे**
**संसारीं जन्मिजे याची लागीं.**

शेंदाड पिकलें म्हणजे त्याचें कडूपण आपोआप जातें. तसे पांडुरंगानें आमचे दुर्गुण नाहींसे केले आहेत. आमचे सर्व विकार जागच्या जागीं मरून गेले आहेत. म्हणून सर्व सृष्टि आम्हांला आनंदमय झाली आहे. याचेंच नांव भाग्य आणि यासाठींच माणसानें जन्माला यावयाचें. एकांतवासानेंच प्राप्त करून दिलेली ही सिद्धी होय.

तुकाराम : २९-५-१९५४

# विनोबाचें 'स्थितप्रज्ञ-दर्शन'

गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील शेवटच्या अठरा श्लोकांत भगवंतांनीं अर्जुनाला स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. लोकमान्य टिळकांच्या मतें स्थितप्रज्ञाचें वर्तन हा कर्मयोग शास्त्राचा मुळीं पायाच आहे. हे अठरा श्लोक म्हणजे एक समग्र दर्शनच आहे असें विनोबा म्हणतात. म्हणून ह्या श्लोकांचें रहस्य उलगडून दाखविण्यासाठीं विनोबांनीं शिवणीच्या तुरुंगांत असतांना अठरा व्याख्यानें दिलीं. तीं 'स्थितप्रज्ञदर्शन' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत.

'ईशावास्योपनिषदा' प्रमाणेंच स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचे हे अठरा श्लोक म्हणजे विनोबांचा जीव कीं प्राण आहेत. म्हणून 'स्थितप्रज्ञदर्शनां'त त्यांच्या अलौकिक विभूतिमत्वाचें दर्शन होतें. ह्या ग्रंथाची थोडीशी ओळख करून देतों.

बुद्धि आणि प्रज्ञा ह्यांमधील भेद सांगतांना विनोबा म्हणतात, बुद्धि शब्दसामान्य. बुद्धि माणसाच्या मनोविकाराप्रमाणें पालटणारी असते. निव्वळ ज्ञानाचें कार्य करणारी ती प्रज्ञा. प्रज्ञा तटस्थ असते. नेमकें

वस्तुस्वरूप लक्षांत घेऊन ती निर्णय देते. बुद्धीवर रंग चढले म्हणजे एकाच बुद्धीच्या अनेक बुध्द्या बनतात. दयेचा रंग चढला कीं, ती दयाबुद्धि. द्वेषाचा रंग चढला कीं, ती द्वेषबुद्धि. अशा हजार बुध्द्या मार्गदर्शनाच्या कामीं कुचकामाच्या होत. शुद्ध बुद्धि म्हणजेच प्रज्ञा. ती नेमका निर्णय देते. कारण, तिला स्वतःचा रंग नसतो. ती थर्मामीटरसारखी असते. थर्मामीटरला स्वतःला ताप आलेला नसतो. म्हणूनच तो इतरांच्या तापाचें मापक होऊं शकतो.

अल्पबुद्धीच्या माणसाला स्थितप्रज्ञ होतां येईल का? विनोबा सांगतात, बुद्धीच्या कमीजास्तपणाचा प्रश्न नाहीं. निखळ बुद्धीची एक लहानगी ठिणगी, एक लहानशी ज्योत असली तरी पुरे. बुद्धीच्या शक्तीची हीच तर खुबी आहे. शारीरिक शक्तीचें तसें नाहीं. एखाद्या काडीपेहेलवानाला या जन्मीं गामा होतां येईल कीं नाहीं याची शंका येऊं शकेल. एखाद्या अल्पबुद्धि माणसाला राष्ट्राचा कारभार चालविण्याचें नेतृत्व साधणें संभवनीय होणार नाहीं. पण अगदीं अल्पबुद्धीच्या आणि अशिक्षित माणसालाहि या जन्मांत स्थितप्रज्ञ होण्याची शक्यता निःसंशय आहे. त्याला भाराभर बुद्धीची गरज नाहीं. प्रज्ञेची एक ठिणगी पुरे. भारी बुद्धि जगाचा कारभा आणि उलाढाल वाटेल तेवढी करो. पण त्रिभुवनाला खाक करण्याचें सामर्थ्य मात्र प्रज्ञेच्या ठिणगीचें आहे.

समाधि म्हणजे ध्यानसमाधि नव्हे. चित्ताच्या समाधानाची स्थिति म्हणजे समाधि. समाधान म्हणजे समतुलन. तराजूचीं पारडीं बरोबर सारखीं असलीं म्हणजे तराजू समतोल आहे, तराजूचें समाधान आहे म्हणावयाचें. तराजूच्या दांडीप्रमाणें चित्ताची समतोल, अचल व शांत स्थिति झाली म्हणजे त्याचें समाधान झालें. ही समाधि नेहमीं टिकणारी असते. ती कधींच भंग पावत नाहीं. वृत्तीबरोबर वाहून जाऊं नये हें स्थितप्रज्ञतेचें सुलभतर साधन आहे. बरें वाटलें तर वाटो, पण हुरळून जाऊं नका. हर्षित होऊं नका. टिऱ्या बडवूं नका. टाळ्या पिटूं नका. त्याचें अभिनंदन करूं नका. मुलगा झाला तर बरें वाटेल. वाटूं द्या. पण

साखर वाटूं नका. लग्न लागलें. बरें वाटलें. चालेल. पण बँडबाजा वाजवूं नका.

तीव्र विकार बुद्धीवर आघात करतात. बुद्धि शाबूत राहिली पाहिजे. इंद्रियांचें नियमन हें स्थितप्रज्ञतेचें सुलभतम साधन आहे. या नियमनाचे दोन प्रकार आहेत. संयम आणि निग्रह. गुजरातींत एक मार्मिक म्हण आहे. 'माणसनी परीक्षा खाटले ने पाटले.' पाटावर आणि खाटेवर म्हणजे जेवणाच्या वेळीं व आजारी पडला असतां माणसाची परीक्षा होते. जेवण व आजार हे असे प्रसंग आहेत कीं, त्यांत माणसाच्या स्वभावांतले सगळे दोष बाहेर येतात. माणसाला बेसुमार खाणें जमतें. अथवा मुळींच न खाणेंहि एक वेळ जमतें. बेताचें खाणें जमत नाहीं. दोन टोकें साधतात. मधला बेत नाहीं साधत. इंद्रियांना मध्यावर ठेवणें हा संयम. केव्हां केव्हां त्यासाठीं त्यांना दुसऱ्या टोंकाला न्यावें लागतें हा निग्रह. निग्रहाचाहि उपयोग उघडच आहे. पण तो नेहमींचा धर्म नव्हे. युक्तिपूर्वक सर्व इंद्रियांचा संयम करून ईश्वरपरायण होऊन राहावें.

मनुष्याची पुरुषार्थ शक्ति जेथें कुंठित होते, तेथें भक्तीची गरज उत्पन्न होते. ईश्वरानें आपल्याला जी शक्ति देऊन ठेवलेली आहे, ती पूर्णपणें वापरण्यांतच नम्रता आणि आस्तिकता आहे. ईश्वराच्या शक्तीचें आवाहन करण्यांत पराधीनता नाहीं. कोटाच्या खिशाला दोन कप्पे केले आणि दोन्ही कप्प्यांत पैसे भरून ठेवले. वरच्या कप्प्यांतले पैसे संपले कीं, आंतल्या कप्प्यांतले काढले. दोन्ही कप्पे आपल्याच खिशाचे. किंवा कांहीं पैसे तुमच्या ट्रंकेंत आहेत. कांहीं बँकेंत आहेत असें समजावें. ईश्वर व आपण एकाच चैतन्याचीं रूपें आहोंत. आपण अंशमात्र आहोंत. ईश्वर त्या चैतन्याचें पूर्ण रूप आहे. तरी पण चैतन्य एकच.

ईश्वराची प्रार्थना आपण कशी करावी ? आपल्या इच्छेप्रमाणें त्यानें आपली दैवशक्ति वापरावी अशी आपली अपेक्षा असते. हें योग्य नव्हे. त्याच्या इच्छेला अनुकूल अशी आपली इच्छा बनविणें ही आस्तिकता आहे. आपण ईश्वराला असें म्हटलें पाहिजे—माझा पक्ष न्यायाचा असेल तर

माझा जय होऊं दे. नाहींतर मला अपयश येऊं दे. म्हणजे माझी बुद्धि तरी शुद्ध होईल.'

एक भारती आख्यायिका आहे. आंधळ्या धृतराष्ट्राच्या सहानुभूतीनें गांधारीनें डोळ्याला पट्टी बांधून ठेवली होती. तिचा मुलगा दुर्योधन युद्धाला निघण्यापूर्वी तिला नमस्कार करण्यास आला तेव्हां तिनें आशीर्वाद दिला कीं, तूं सन्मार्गानें जात असशील तर तुला यश येवो. हाच खरा आशीर्वाद आहे.

देवा, माझी हरवलेली वस्तु मला मिळूं दे, अशी प्रार्थना कशाला करावयाची ? वस्तु मिळो वा न मिळो, माझी चित्ताची शांति न ढळो अशी प्रार्थना करावी. मुलगा आजारी झाला असतां, ' माझा मुलगा न मरो ' ही काय प्रार्थना झाली ? मनुष्य केव्हां तरी मरणार हें ठरलेलें आहे. आतां न मरो अशी मागणी करावयाची असल्यास अमुक वेळीं मरायला हरकत नाहीं असें तरी ठरवा. आतां न मरो, अठ्ठावीस तारखेला मरो, अशी देवाजवळ निश्चित मागणी करा. पण अशी मागणी कोण करणार ? म्हणून मुलगा मरायचा असेल तर मरूं दे पण मरतांना त्याला मानसिक व्याकुळता न होवो, अशी मागणी करा.

तुकाराम : ५-६-१९५४

---

*ऋण निर्देश :* या लेखापर्यंतचे बारा लेख, मिरजचे श्री. वसंत बळवंत आगाशे, यांनीं ' तुकाराम 'चे अंक भक्तिभावानें जतन करून ठेवले असल्यामुळेंच संग्रहित करतां आले आहेत.

# ज्ञानेश्वर काय नुसतेच कवि होते?

पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि ग्रंथप्रकाशक श्री. य. गो. जोशी ह्यांनीं आषाढी एकादशीच्या सुमुहूर्तावर हरिभक्तपरायण सोनोपंत दांडेकर ह्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक संपादिलेली 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रकाशित करून मराठी जनतेवर फार मोठे उपकार केले आहेत.

सोनोपंत दांडेकर हे विष्णुबुवा जोगांचे शिष्य आणि संप्रदायांतले. संतवाङ्मयासंबंधीं विष्णुबुवांचा अधिकार फार मोठा होता. वारकरी मंडळीं-मध्यें त्यांचें अनन्यसाधारण स्थान होतें. तुकोबांची 'सार्थगाथा' प्रसिद्ध केल्यानंतर, 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस होता. पण त्यांच्या अकाली अवसानामुळें तें काम अपूर्ण राहिलें. तें काम पुढें त्यांचे ज्येष्ठ शिष्य बंकटस्वामी यांनीं पुरें केलें. बंकटस्वामींची ही 'ज्ञानेश्वरी' पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली. त्यामुळें अलीकडे कित्येक वर्षें ती दुर्मिळच झाली होती. म्हणून प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं तिच्यांत इष्ट ते फेरफार करून आणि अधिक योग्य तो मजकूर घालून अत्यंत अद्यावत् आणि आकर्षक स्वरूपांत ही 'ज्ञानेश्वरी' ची प्रत आतां प्रसिद्ध केली आहे.

77४८०

मराठीमध्यें आतांपर्यंत 'ज्ञानेश्वरी' च्या सतरा आवृत्ती निघालेल्या आहेत. त्यांपैकीं इतिहासाचार्य राजवाडे ह्यांची 'ज्ञानेश्वरी' ही एकनाथपूर्वकालीन असल्यामुळें केवळ भाषासंशोधनाच्या दृष्टीनें तिला महत्त्व आहे. ज्ञानेश्वरांच्या भक्तांना जिव्हाळा वाटण्यासारखें तिच्यांत कांहीं नाहीं. सर्वसामान्य अभ्यासकांच्या दृष्टीनें नानामहाराज साखरे आणि बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं संपादलेल्या 'ज्ञानेश्वरी' च्या प्रती लोकप्रिय समजल्या जात असत. वंकटस्वामींची 'ज्ञानेश्वरी' ही सांप्रदायिकांमध्यें मान्यता पावलेली होती. पण प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं संपादलेली ही 'सार्थ ज्ञानेश्वरी' मात्र आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व प्रतींमध्यें 'उजवी' असून ती सर्वसामान्य वाचकांना आणि सांप्रदायिकांनाहि अत्यंत उपयुक्त आणि उद्बोधक होईल अशी आमची खात्री आहे.

सोनोपंती 'ज्ञानेश्वरी' च्या कांहीं वैशिष्टयांचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांच्या चरित्राविषयीं आणि तत्त्वज्ञानासंबंधीं निरनिराळ्या महत्त्वाच्या आणि विवाद्य प्रश्नांची अत्यंत मार्मिक, विद्वत्तापूर्ण आणि सांगोपांग चर्चा करणारी दीडशें पानांची एक प्रदीर्घ प्रस्तावना सोनोपंतांनीं ह्या 'ज्ञानेश्वरी' च्या आरंभीं जोडलेली आहे. 'ज्ञानेश्वरी' चा अभ्यास करण्याचीं आतांपर्यंत जीं साधनें मराठी साहित्यांत उपलब्ध आहेत त्यांमध्यें ह्या 'प्रस्तावने'नें फार मोठी भर टाकलेली आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं. त्याखेरीज 'ज्ञानेश्वरीं'तील बहुतेक सर्व कठीण शब्दांचा शंभर पानी कोश, 'गीते'च्या सातशें श्लोकांची आणि 'ज्ञानेश्वरीं'तील नऊ हजार तेहतीस ओव्यांची बासष्ट पानी वर्णानुक्रमणिका शेवटीं जोडलेली आहे. प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं सुबोध सारांश दिलेला आहे. 'ज्ञानेश्वरी'च्या ओव्या एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला त्यांचा संपूर्ण अर्थ अशीं सव्वा-आठशें पानें होतात.

अर्थाबाबत निरनिराळ्या संपादकांमध्यें मतभेद होणें हें साहजिकच आहे. भिडे एखाद्या ओवीचा जो अर्थ सांगतील त्यापेक्षां दांडेकरांचा अर्थ निराळा असेल. हा मतभेद गृहीत धरूनहि आम्ही आतांपर्यंत ह्या 'ज्ञानेश्वरी'चा

जेवढा भाग वाचला तेवढ्यावरून असें निश्चितपणें म्हणूं शकतों कीं, 'ज्ञानेश्वरी' चा जास्तींत जास्त सुबोध आणि रसाळ अर्थ सांगण्याचा सोनोपंतांनीं यशस्वी प्रयत्न केलेला आहे. ह्याखेरीज ह्या प्रतीचीं बारीक-सारीक वैशिष्ट्येंहि पुष्कळच आहेत. सुरंग आणि कलात्मक चित्रांनीं तर ह्या ग्रंथाच्या आकर्षणांत अभिनव भर टाकलेली आहे. जवळजवळ बाराशें पानांच्या ह्या प्रचण्ड ग्रंथाची किंमत वीस रुपये आहे. सामान्य वाचकांना एवढे पैसे देणें परवडणार नाहीं हें खरें. पण 'ज्ञानेश्वरी' विकत घेतांना पैशाचा थोडाच विचार करायचा असतो ?

मानवतेला प्रकाश दाखविणारा 'ज्ञानेश्वरी' हा एक नंदादीप आहे. एक वेळ घरांत दिवा नसला तरी चालेल पण 'ज्ञानेश्वरी' पाहिजेच. म्हणून ती विकत घेतांना पांचदहा रुपये जास्त पडले म्हणून काय बिघडलें ? 'ज्ञानेश्वरी' ची अशी ही सर्वांगसुंदर प्रत प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. य. गो. जोशी ह्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों. (खुद्द य. गो. ह्यांना मात्र 'ज्ञानेश्वरी' चें हें प्रसिद्धीकरण आपल्या प्रकाशनवैभवाचा 'कळस' वाटत नाहीं. त्यांना महाराष्ट्रवाङ्मयांत यापेक्षांहि अधिक 'मोलाची भर' टाकण्याची अजूनहि निश्चित आकांक्षा वाटत आहे ! 'अभाग्याच्या घरीं बाबा कामधेनु आली' ह्यापेक्षां दुसरें काय म्हणावें ?)

प्रा. सोनोपंत दांडेकरांच्या ह्या 'सार्थ ज्ञानेश्वरी'च्या प्रकाशनाच्या निमित्तानें श्री. य. गो. जोशी ह्यांनीं आपल्या 'प्रसाद' मासिकाचाहि दोन सव्वादोनशें पानांचा एक खास 'ज्ञानेश्वरी' अंक काढलेला आहे. ह्या अंकांत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आणि ग्रंथकर्तृत्वावर प्रकाश टाकणारे निरनिराळ्या अधिकारी व्यक्तींचे कित्येक वाचनीय लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं लेखांचा येथें उल्लेख करणें आवश्यक वाटतें.

श्रीकृष्णदास लोहिया महाराजांनीं वारकरी पंथाची जी ऐतिहासिक पार्श्वभूमि दिली आहे ती अनेकांना उद्बोधक होईल. महाराष्ट्रांत वारकरी पंथ अवतीर्ण होण्यापूर्वीं अनेक देवदैवतांच्या उपासकांमध्यें मतभेद आणि भांडणें अगदीं विकोपास गेलीं होतीं. अद्वैतवादी आणि द्वैतवादी तत्त्वज्ञानाला

अनेक फांटे फुटले होते. आणि त्यामुळें जनतेमध्यें बुद्धिभेद निर्माण झाला होता. महाराष्ट्रामध्यें हे नाना देववाद्यांचे सर्व भांडणतंटे मिटवून श्री पांडुरंग हेंच एकदेववादाचें एक उपास्यदैवत आहे ह्या वारकरी पंथाच्या भूमिकेचें श्री ज्ञानेश्वरांनीं प्रतिपादन केलें; आणि सगुण-निर्गुण, द्वैताद्वैत, शैव, वैष्णव इत्यादि सर्व भेद चंद्रभागेच्या तीर्थांत बुडवून टाकले.

'श्री ज्ञानदेव आणि सामाजिक मार्गदर्शन' हा श्री तुकडोजी महाराजांचा लेख आणि 'श्री ज्ञानेश्वर आणि सनातनधर्म' हा श्री संतोजी महाराज कुकुरमुंडेकर ह्यांचा लेख हे श्री ज्ञानेश्वर महाराजांकडे बघण्याचे दोन अगदीं परस्परविरोधी दृष्टिकोन आहेत. संतोजी महाराजांना श्री ज्ञानेश्वर हे जन्म-जात वर्णांचे आणि जातिभेदाचे पुरस्कर्ते वाटतात. 'ब्राह्मण दुर्बळ झाला तरी त्यानें शूद्राच्या घरचें अन्न सेवन करूं नये,' ह्या अर्थाच्या ज्ञानेश्वराच्या ओवीवरून 'अलीकडे सहभोजनाची जी मोहीम निघाली आहे ती ज्ञानेश्वरांना मान्य नाहीं,' असा संतोजी महाराजांनीं निष्कर्ष काढला आहे. तर 'अहंता सांडावी समता वर्तावी' किंवा 'भूता परस्परा जडो । मैत्र जीवाचे ॥' असा समतेचा आणि ममतेचा अमर संदेश श्री ज्ञानेश्वरांनीं दिला एवढेंच नव्हे तर 'जो जें वांच्छील तें तो लाहो । प्राणिजात ॥' म्हणजे 'जो जें इच्छील तें त्याला मिळावें' हें समाजवादाचें किंवा कम्युनिस्टांचें तत्त्वज्ञान सहाशें वर्षें आधीं ज्ञानेश्वरांनीं सांगितलें असें तुकडोजी महाराजांनीं सांगितलें आहे.

'श्री ज्ञानदेव व आध्यात्मिक जीवन' हा प्रा. गजेंद्रगडकरांचा लेख आणि 'ज्ञानेश्वरींतील अर्जुन' हा श्री. नेऊरगांवकरांचा लेख हे दोन्हीहि लेख 'साक्षात्कारी' असल्यामुळें अत्यंत हृदयस्पर्शी वाटतात.

प्रा. न. र. फाटक ह्यांनीं आपल्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें एक जुनें भांडण उकरून काढलें आहे. ज्ञानेश्वर-तुकारामासारख्या 'संताळयां'नीं महाराष्ट्राचा नाश केला आणि त्याला तीन शतकें पंगू करून टाकलें अन् समर्थ रामदासांनीं 'महाराष्ट्रधर्मा'ची दीक्षा देऊन महाराष्ट्राचें संरक्षण केलें असें इतिहासाचार्य राजवाडे ह्यांचें एक मत होतें, तें किती भ्रामक होतें हें प्रा. फाटक ह्यांनीं दाखवून दिलें आहे.

इतिहासाचार्य राजवाडे झाले काय किंवा प्रा. न. र. फाटक झाले काय, दोघेहि इतिहासाचे भक्त आणि संशोधक. त्यांना जसा पुरावा सांपडणार तसें ते बोलणार. पुरावा बदलला कीं त्यांचीं मतें बदलली. इतिहासज्ञांच्या ह्या तांत्रिक वादविवादामध्यें सामान्य नि सश्रद्ध माणसांना कशी गोडी वाटणार ? इतिहासाचार्य राजवाडे हे एक प्रचंड संशोधक आणि स्वतंत्र प्रतिभेचे विचारवंत होऊन गेले. पण त्यांचीं सर्वच मतें कांहीं ग्राह्य मानण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ, ग्यानबा तुकारामांनीं महाराष्ट्राचें वाटोळें केलें असें कितीहि आग्रहानें त्यांनीं सांगितलें असलें तरी त्यांच्या त्या एकांतिक मताला सामान्य जनतेनें द्यावयाची तीच किंमत दिली.

जनता अविद्वान असली तरी सत्य आणि असत्य तिला समजत नाहीं असें नाहीं. महाराष्ट्रांतले पुष्कळसे इतिहाससंशोधक हे भावनाशून्य आहेत. भावनेला धाब्यावर बसविल्याखेरीज सत्याचें संशोधन होत नाहीं कीं काय ? ग्यानबा तुकारामाबद्दलचें राजवाडे ह्यांचें मत हें भावनाशून्य संशोधनाचा एक अतिरेकी नमुना होय.

संतांच्या कार्याकडे नि वाङ्मयाकडे बघण्याचा इतिहाससंशोधकांचा दृष्टिकोण जसा एकांतिक असतो तसाच तो साहित्यिकांचाहि पण असतो. ह्याचाहि एक भरभक्कम पुरावा ह्या 'ज्ञानेश्वरी खास अंका'नें उपलब्ध करून दिला आहे. पुण्यांतील एक विद्वान आणि व्यासंगी प्राध्यापक रा. शं. वाळिंबे ह्यांनीं 'ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति' ह्या मथळ्याखालीं लिहिलेला सव्वाशें पानांचा एक प्रदीर्घ ग्रंथच ह्या अंकांत समाविष्ट करण्यांत आलेला आहे. 'ज्ञानेश्वरी'चें साहित्यशास्त्रीय समीक्षण करण्याचा प्रा. वाळिंबे ह्यांनीं ह्या निबंधांत प्रयत्न केलेला आहे. तो करतांना त्यांनीं अतोनात परिश्रम केलेले आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपली सर्व विद्वत्ता ह्या कामीं पणाला लावलेली आहे. ह्याबद्दल त्यांचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

भाषाशैलीच्या आणि विवेचनाच्या दृष्टीनें हा सर्व निबंध अत्यंत सरस आणि हृदयस्पर्शी वठला आहे ह्यांत मुळींच संशय नाहीं. पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, ह्या कलात्मक नि भाषासुंदर निबंधाचा वैचारिक दृष्टिकोणच

मुळीं चुकलेला आहे. प्रा. वाळिंबे हे 'ज्ञानेश्वरी'चें साहित्यशास्त्रीय समीक्षण करावयाला म्हणून गेले आणि ती एक महान् साहित्यकृति आहे एवढाच त्यांनीं त्यांतून निष्कर्ष काढला.

ज्ञानेश्वर हे महाकवि आहेत किंवा ज्ञानेश्वरी हें एक महाकाव्य आहे यांत शंका नाहीं. पण तेवढें म्हणून का त्यांच्या अलौकिक स्वरूपाची यथार्थ कल्पना येऊं शकेल ? हिमालय हा अत्युच्च पर्वत आहे, काशी हें एक मोठें शहर आहे, अमृत हें मधुर पेय आहे किंवा वाघ हें एक मोठें मांजर आहे असें म्हणण्यासारखेंच हें आहे.

ज्ञानेश्वरांसंबंधीं प्रा. वाळिंबे ह्यांनीं आपल्या प्रदीर्घ निबंधांत मांडलेल्या सिद्धान्ताचा सारांश थोडक्यांत असा आहे. ते म्हणतात कीं, 'ज्ञानेश्वरी' लिहिण्यांत 'मराठीचिये नगरीं' केवळ 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' करण्यापेक्षां 'साहित्यरूपी सुवर्णाच्या खाणी उघडाव्यात' हा ज्ञानेश्वरांचा प्रधान हेतु होता. आरंभापासून अखेरपर्यंत 'ज्ञानेश्वरी'मध्यें तात्त्विक बाजूवर भर न देतां त्यांनीं त्यांतील साहित्यगुणांवर जास्त भर दिला आहे. 'ज्ञानेश्वरीं'त रसाचा प्रकर्ष करावा ही ज्ञानेश्वरांची महत्त्वाकांक्षा होती. रमणीय कल्पना-विलासाच्या उन्मादांत मूळ प्रतिपाद्य विषयाचा ज्ञानेश्वरांना जागोजाग विसर पडला असून ते वाङ्मयरसांत वहावत गेले आहेत. अध्यात्माचें विवेचन करीत असतां वाक्सृष्टींतील सारें कलात्मक ऐश्वर्य श्रोत्यांना पहावयास मिळावें हीच ज्ञानेश्वरांना सारखी तळमळ लागलेली आहे. तेव्हां 'ज्ञानेश्वरी' लिहिण्याचें 'व्याज' करून ज्ञानेश्वरांनीं मराठी भाषेच्या अंगणांत लावण्यपूर्ण सारस्वताचें झाड लावलेलें आहे असा प्रा. वाळिंबे ह्यांचा अंतिम निष्कर्ष आहे.

वाळिंबे ह्यांचें पुष्कळसें म्हणणें 'अक्षरशः' खरें आहे पण तें 'अंशतः' खरें आहे. हत्ती हा एक दोरखंड आहे असें म्हणणाऱ्या आंधळ्या माणसासारखा वाळिंबे ह्यांचा सर्व निष्कर्ष आहे. ते हत्तीचें शेंपूट हातांत धरून मोठमोठ्यानें सांगताहेत कीं, 'हा गोंडेदार अन् झुबकेदार दोर म्हणजेच हत्ती बरं का!' प्रा. वाळिंबे ह्यांचा हा निबंध वाचून 'ज्ञानेश्वरी'चे भक्त पोट धर-धरून हंसतील. संगमरवरी दगडांचा कलात्मक उपयोग करण्यासाठीं शहाजहान

२१३५५ दि. निबंध

बादशहानें 'ताजमहाल' बांधला हें म्हणणें जितकें खरें, तितकेंच शब्दांचा आणि कल्पनांचा कलाविलास दाखविण्यासाठीं ज्ञानेश्वरांनीं 'ज्ञानेश्वरी' लिहिली हें बोलणें खरें आहे.

'ज्ञानेश्वरी' हें महाकाव्य तर खरेंच पण तें कांहीं नवरसांचें काव्य नाहीं. तें 'ब्रह्मरसाचें महाकाव्य' आहे. 'वाङ्मया'संबंधींहि ज्ञानेश्वरांच्या कल्पनेंत आणि आधुनिक साहित्यिकांच्या कल्पनेंत जमीनअस्मानाचा फरक आहे. ज्ञानेश्वरांनींच अठराव्या अध्यायांत वाङ्मयाबद्दल म्हटलेलें आहे कीं, 'वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व। रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा॥' कवित्व ही भाषेची शोभा आहे, आणि या रसत्वाला 'परतत्त्व-स्पर्शा'नें खरी बहार येते. परतत्त्वांचा स्पर्श म्हणजे परब्रह्माचा साक्षात्कार. ह्यालाच आम्ही ब्रह्मरस म्हणतों. संतांचें वाङ्मय जें प्रभावी असतें त्याचें कारण त्याला परतत्त्वाचा स्पर्श झालेला असतो.

आधुनिक वाङ्मय क्षुद्र आहे ह्याचें कारण त्याला परतत्त्वाचा गंधहि नसतो; ही गोष्ट प्रा. वाळिंबे ह्यांना अजिबात उमगलेली नाहीं. ह्या निबंधाचें सातवें आणि आठवें प्रकरण त्यांनीं 'परतत्त्वा'वर खर्ची टाकलें आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं, 'परतत्त्वा'चा बोधहि अद्यापि त्यांना झालेला नाहीं. तो झाला असता तर त्यांच्या ह्या निबंधांत अभूतपूर्व सौंदर्य निर्माण झालें असतें! प्रा. वाळिंबे ह्यांना ज्ञानेश्वर हे बालकवि ठोमरे, भास्करराव तांबे, राम गणेश गडकरी, माडखोलकर, शेले किंवा वर्ड्‌स्वर्थ ह्यांच्या पंक्तीमधले पण अर्थात् मोठे असे कवि वाटतात. ज्ञानेश्वरांच्या कित्येक ओंव्या वाचून त्यांना ह्या कवींच्या काव्याची आठवण होते. 'सांगे कुमुद्दळाचेनि ताटें। जो जेवला चंद्रकिरणें चोखटें! तो चकोर काई वाळुवंटें। चुंबितु असे॥' कमल-पत्राच्या ताटामधून जो शुद्ध चंद्रकिरणांचें भोजन करतो तो चकोर पक्षी काय वाळवंटांतील खडे चाटीत बसेल?' ही ज्ञानेश्वरांची कल्पना वाचून 'आजवरी कमळांच्या द्रोणीं। मधु पाजिला तुला भरोनी॥' ह्या तांबे कवींच्या ओळी प्रा. वाळिंबे ह्यांना आठवतात! आमची खात्री आहे कीं पौर्णिमेचा चंद्र बघून प्रा. वाळिंबे ह्यांना आपल्या घरासमोरच्या

म्युनिसिपालिटीच्या विजेच्या बत्तीची नक्की आठवण होत असली पाहिजे !

आधीं मनामध्यें एखादा सिद्धांत ठरवावयाचा आणि मागाहून त्याच्या-बद्दलचा पुरावा गोळा करीत बसावयाचें या मतलबी टीकाकारांच्या मार्गाचें अनुकरण प्रा. वाळिंबे ह्यांच्यासारख्या प्रतिभाशाली आणि व्यासंगी टीका-कारांनीं करावें ह्याचें आम्हांला दुःख वाटतें. ह्यामुळेंच ज्ञानेश्वरांच्या मूळ ओंव्यांचाहि विपर्यास करण्याचें 'पातक' त्यांच्या हातून घडलें आहे. त्याचें उदाहरण देतों. 'रसु होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्रु ।' ही ज्ञानेश्वरांची अर्धी ओंवी घेऊन तिच्यांतून वाळिंबे ह्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, रसाळपणाची रेलचेल असावी ह्या कविलोकांच्या पद्धतीचा आपण अंगिकार केला आहे अशी ज्ञानेश्वरांनीं येथें स्पष्ट कबुली दिली आहे !

वस्तुतः ज्ञानेश्वरांनीं नेमकें ह्याच्या विरुद्ध म्हटलेलें आहे. ही संबंध ओंवी अशी आहे : 'रसु होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्रु । तरी अवंतूनि शत्रु । करितोसि कां गा ॥' ह्याचा अर्थ असा : 'विषयाचा पाल्हाळ करण्याच्या कविलोकांच्या पद्धतीचा जर तूं अवलंब केला असतास तर श्रोत्यांस मुद्दाम बोलावून आणून त्यांना शत्रु केल्याचा दोष तुझ्यावर आला असता.' म्हणजे विषयाचा पाल्हाळ करण्याचा 'कविमंत्रु' आपण पत्करला नाहीं असें ज्ञानेश्वर स्पष्टपणें सांगताहेत आणि प्रा. वाळिंबे नेमकें तेंच घोंगडें त्यांच्या गळ्यांत अडकवताहेत. अशीं 'असत्य' विधानें निदान प्रा. वाळिंबे ह्यांच्यासारख्या जबाबदार टीकाकाराकडून आम्ही अपेक्षीत नाहीं.

ज्ञानेश्वरीच्या शेवटीं 'शब्द कैचा घडिजे । प्रमेयीं कैसे पां चढिजे । अळंकारू म्हणिजे । काय तें नेणें ॥' म्हणजे 'शब्द कसा बनवावा, प्रमेय कसें मांडावें, साहित्यांतला अलंकार म्हणजे काय हें आपल्याला बिलकुल माहीत नाहीं' असें ज्ञानेश्वरांनीं स्पष्टपणें म्हटलें असतां प्रा. वाळिंबे म्हणतात कीं, 'हा ज्ञानेश्वरांचा विनय आहे.' ह्या कमालला काय करावें ? ज्ञानेश्वरांना 'साहित्यिक' ठरविण्याचा प्रा. वाळिंबे ह्यांनीं चंगच बांधलेला आहे. तेव्हां आपल्याला अनुकूल असेल तेवढेंच ज्ञानेश्वरांचें म्हणणें ते मानतात, अन् बाकीचें अमान्य करतात.

मला शब्द किंवा अलंकार कळत नाहींत ह्या ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच आहे कीं, वाङ्मयदृष्टीनें कांहीं मी हा ग्रंथ लिहिलेला नाहीं. पण 'आर्तांचैनि वोरसें। गीतार्थ-ग्रंथनमिसे। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु ॥' गीतेचा अर्थ जुळून सांगण्याच्या निमित्तानें जगांतील पीडितांच्या आणि दुःखितांच्या दयेनें (निवृत्तिनाथांनीं) माझ्याकरवीं ही जी शांतरसाची वृष्टि केलेली आहे तो हा माझा ग्रंथ 'ज्ञानेश्वरी.' ह्या एका ओवींत ह्या अलौकिक ग्रंथाचें सर्व सार आलेलें आहे. प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं एवढा प्रचण्ड खटाटोप करून आपली 'सार्थ ज्ञानेश्वरी' ज्या एका विशाल आणि उदात्त भावनेनें तयार केली त्याची वार्तासुद्धां प्रा. वाळिंबे ह्यांच्या गांवीं असूं नये ह्याचें आम्हांला आश्चर्य वाटतें.

'य. गो.' नीं तर निव्वळ प्रकाशकाचीच भूमिका पत्करली आहे. 'ज्ञानेश्वरी' ही 'प्रभूची वाङ्मयमूर्ति आहे' ह्या सोनोपंतांच्या भूमिकेबद्दल त्यांना जेवढा आदर तेवढेंच ती 'विदग्ध कलाकृति' आहे ह्या प्रा. वाळिंबे ह्यांच्या सिद्धान्ताचें त्यांना कौतुक!

आमचें हें निवेदन वाचून प्रा. वाळिंबे ह्यांनीं आपली अशी मुळींच समजूत करून घेऊं नये कीं, त्यांच्या प्रतिभेबद्दल आणि परिश्रमांबद्दल आम्हांला कौतुक नाहीं. तसें नव्हे. त्यांचा प्रयत्न निःसंशय मनोहर आहे. पण त्यांना 'ज्ञानेश्वरी' चें रहस्य कळलेलें नाहीं. सोनोपंतांकडून त्यांनीं तें समजावून घ्यावें; आणि तेवढा बदल करून हा निबंध त्यांनीं पुन्हा दुरुस्त करून घ्यावा. म्हणजे मराठी साहित्यांत एका अनमोल टीकाग्रंथाची भर घातल्याचें त्यांना श्रेय मिळेल!

पुनश्च एकवार 'ज्ञानेश्वरी' ची सर्वांगसुंदर अशी प्रत प्रसिद्ध केल्याबद्दल संपादक प्रा. सोनोपंत दांडेकर आणि प्रकाशक श्री. य. गो. जोशी ह्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

नवयुग : २०-९-१९५३

# ज्ञानियाचा राजा गुरु महाराज

कार्तिक वद्य त्रयोदशीला श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं आळंदी येथें समाधि घेतली. तथापि त्याच्या दोन दिवस आधीं म्हणजे एकादशीला आळंदीची यात्रा भरते. पंढरपूरच्या आषाढी–कार्तिकीसारखाच ह्या यात्रेचा सोहोळा आहे. ह्या यात्रेला प्रथमच जाण्याचा योग गाडगे बाबांच्या कृपेनें यंदां आला.

दशमीच्या दिवशीं मुंबईहून दुपारीं तीन वाजतां बाबांच्या मोटारीमधून आम्ही निघालों. बाबांच्या बरोबर त्यांचे सातआठ भजनकरी होते. मुंबई सरकारच्या दारुबंदी खात्याकडून बाबांना ही मोटार मिळालेली आहे. कर्जतच्या एका घाटांत ही मोटार त्या खात्यांतल्या एका अधिकाऱ्यानें दरीमध्यें पाडून तिचा चांगला कानवला केला होता. सरकारला त्या मोटारीचा कांहींच उपयोग नव्हता. तेव्हां मोठ्या उदार अंतःकरणानें त्यांनीं ती 'कै० मोटार' गाडगेबाबांना बक्षीस देऊन मोठें पुण्य मिळवलें. बाबांनीं तीनचार हजार रुपये तिच्यावर खर्च करून तिला पुन्हा जिवंत केलें. असा हा मुंबई सरकारनें बाबांना नजर केलेल्या त्या गाडीचा थोडक्यांत इतिहास आहे. दान

करण्याची ह्या देशांतल्या सर्वच लोकांची ही पद्धति आहे. मग सरकारलाच कशाला नांवें ठेवायचीं ?

ह्या गाडीमध्यें ध्वनिक्षेपक आणि कर्णे बसविले असल्यामुळें बाबा कोठेंहि गेले तरी हजारों लोकांना त्यांचें भजन ऐकण्याची तावडतोब सोय करतां येते. शिवाय गाडी चालतांचालतां आंतील भजन रस्त्यांतील लोकांनाहि ऐकूं येतें. भगव्या रंगामुळें गाडी सर्व मराठी माणसांना परिचयाची झालेली आहे. लांबून गाडी येतांना दिसली म्हणजे गरीब लोक एकदम थबकतात आणि गाडींत बाबा बसले आहेत, ह्या भावनेनें नमस्कार करतात. कित्येक लोक तर वाटेंत गाडी अडवतात.

ठाण्याला असेंच झालें. पोलिसांनींच गाडी अडवली. मी पुढें बसलों होतों. मीं त्यांना विचारलें, 'कां ?' ते म्हणाले, 'बाबांचें दर्शन घ्यावयाचें आहे.' बाबा आपल्या पायांना कोणालाहि स्पर्श करूं देत नाहींत. किंबहुना कोणी आपल्याला वंदन करण्याच्या आधींच दोन्ही हात मस्तकावर जोडून ते त्याला वंदन करतात. पोलिसांनीं आपलीं शिरस्त्राणें आणि पादत्राणें काढून बाबांना अभिवादन केलें आणि मग गाडी पुढें सोडली. असा रस्त्यांत चार-दोन वेळां प्रकार झाला.

गाडींत बाबा विशेष बोलत नव्हते. आधीं कित्येक रात्रीं दोनदोन तीन-तीन वाजेपर्यंत कीर्तन झाल्यामुळें ते दमले होते. म्हणून डोळे मिटून स्वस्थ बसले होते. खोपोलीच्या अलीकडे पनवेलला जाणाऱ्या रस्त्याच्या तोंडाला मोटारीचा तळ आहे. ह्याला शीळफाट्याचा तळ म्हणतात. तेथून आंतमध्यें एका मैलावर विठोबाची यात्रा भरते. तिकडे बाबांना बोलावणें होतें. म्हणून मोटार तिकडे वळली.

दहा मिनिटांच्या आंतच आम्ही यात्रेच्या ठिकाणीं आलों. उजव्या बाजूला उंच टेकडीवर विठोबाचें देऊळ आहे. आणि त्या टेकडीच्या आजूबाजूला मैदानांत यात्रेच्या निमित्तानें तात्पुरतें एक गांवच वसलेलें होतें. जिकडे पहावें तिकडे मांडव, पालें आणि दुकानें. करमणुकीचे सर्व प्रकार तेथें जमा झाले होते. एक नाटक मंडळीहि तेथें मुक्काम करून होती. त्यांतले पुष्कळसे नट

माझ्या ओळखीचे निघाले. रोज नाटकाला तेथें अडीचशें रुपये उत्पन्न होतें असें त्यांनीं सांगितलें. करमणुकीचा कर नाहीं आणि नाटककाराला कांहीं द्यायचें नाहीं. मांडवाचा काय खर्च झाला असेल तेवढाच.

कार्तिक महिन्यांत पंधरा दिवस यात्रा भरते. ह्या पंधरा दिवसांत लाख दीडलाख रुपयांची उलाढाल होते. यात्रेचें सर्व वातावरण 'मासळी'च्या वासानें दरवळून गेलें होतें. मी चकितच झालों. कोणाला तरी विचारलें, 'विठोबाची यात्रा ही. अन् इथं हे 'बोंबील' न् मासळी कशाला?' तेव्हां त्यानें मलाच उलट विचारलें, 'या विठोबाला काय म्हणतात तें ठाऊक आहे ना तुम्हांला?' मी म्हणालों, 'नाहीं. मी प्रथमच येतां आहें आज इथें.' तेव्हां तो हंसून म्हणाला, 'ह्याला 'बोंबल्या' विठोबा म्हणतात! ही बोंबल्या विठोबाची यात्रा. ह्या यात्रेंत सर्व तऱ्हेची मासळी मिळते म्हणून इथें ही एवढी गर्दी जमते.'

बोंबल्या विठोबा हें नांव ऐकून मी सर्दच झालों! विठोबाच्या नांवामागें त्याच्या भक्तांनीं अनेक विशेषणें चिकटविलीं आहेत. पण एवढी भयंकर उपाधी त्याच्यामागें आजपर्यंत कोणी लावून दिली नसेल! पुण्याच्या 'छिनाल बालजी'ला आणि 'भांग्या मारुती'ला हा 'बोंबल्या विठोबा' चांगला जोडीदार शोभेल असा एक विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

मोटारींतून बाबा खालीं उतरण्याच्या आधींच कडें आंतून वाजायला सुरुवात झाली होती. बाबांनीं भजनकऱ्यांना ओळीनें उभें केलें, आणि हातांतल्या काठीनें इशारा केला. त्याबरोबर कड्याच्या तालावर 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला॥' ह्या त्यांच्या आवडत्या भजनाचा गजर वातावरणांत उठला. सभोंवार यात्रेचा एवढा गोंगाट चालू होता पण त्या गोंगाटामधून एखाद्या कारंज्याच्या धारेप्रमाणें बाबांचें भजन वर उचंबळलें आणि क्षणांत त्यांच्याभोंवतीं गरीब स्त्रीपुरुषांचें आणि मुलांचें कडें जमा झालें; आणि बाबांच्या टाळीच्या तालावर सारेजण टाळ्या वाजवून मुक्तकंठानें 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला॥' हें भजन म्हणूं लागले.

सुशिक्षित पांढरपेशा वर्गांत आणि खालच्या वर्गांत हाच मोठा फरक आहे.

रस्त्यावर टाळ्या वाजवून भजन करण्याची शिकलेल्या माणसाला लाज वाटते. तो ओशाळा होतो. पण समाजांतील अज्ञ आणि गरीब लोक इतके साधे आणि भाविक असतात कीं, परमेश्वराचें नांव कानावर पडतांच ते देहभान विसरून त्या भजनांत तल्लीन होऊन जातात. गाडगेबाबा कुठेंहि रस्त्यावर उभे राहून भजन करूं लागले कीं, पांच मिनिटांच्या आंत प्रचंड जनसमुदाय त्यांच्याभोंवतीं जमून त्यांच्याबरोबर भजन करूं लागतो. बाबा पुढें आणि शेंकडों स्त्रीपुरुष मागें—टाळ्या वाजवताहेत अन् भजन करताहेत. असा तो मेळावा टेकडीच्या पायथ्यापासून तों माथ्यावरील 'बोंबल्या विठोबा'च्या देवळापर्यंत गर्जत गर्जत गेला.

टेकडीला वरपर्यंत रुंद पायऱ्यांचा रस्ता आहे. त्यावर अनेक भिकारी आपापल्या वाद्यावर निरनिराळीं गाणीं गात होते. पण 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला॥' हा भजनाचा लोंढा जेव्हां खालून वर चढूं लागला तेव्हां सारे भिकारी आपापलीं गाणीं सोडून उच्चस्वरानें त्या भजनाची साथ करूं लागले. तें बघून मला मोठी गंमत वाटली. देवळाला एक प्रदक्षिणा मारून बाबा भजन करीत करीत जसे वर गेले तसेच पुन्हा खालीं उतरले आणि मोटारींत येऊन बसले. कांहीं लोकांनीं त्यांना कीर्तनाचा आग्रह केला पण त्यांना अधिक वेळ थांबायला सवड नव्हती.

परत येतांना शीळफाट्यावर थोडा वेळ आम्ही थांबलों. खंडाळ्याचा घाट चढतांना पोलिसांनीं अडविलें. कारण रात्र झाली होती. मोठ्या गाड्या घाटांतून वर चढायला रात्रीची परवानगी नसते. पण गाडगेबाबांची गाडी आहे असें मी त्यांना सांगतांच त्यांनीं गाडी सोडली. एवढेंच नव्हे तर हात जोडून त्यांनीं बाबांचें दर्शन घेतलें. घाट चढून वर खंडाळ्याला यावयाला नऊ वाजले.

मी बाबांना म्हणालों, 'वर माझ्या बंगल्यावर चला. मी सर्वांना भाकरी न् पिठलें खायला घालतों.' पण बाबा कसले माझें ऐकायला! खंडाळ्याच्या भर बाजाररस्त्यावर त्यांनीं गाडी थांबवली, आणि खालीं उतरून भजनास सुरुवात केली. लोक भराभरा चोहोंकडून जमले. कांहीं बायका बाबांच्या

पाया पडायल्या धावल्या. तसे बाबाहि रस्त्याच्या एका बाजूकडून दुसरीकडे पळाले ! बायकांना ते म्हणाले, 'जी बाई माझ्या पाया पडेल तिची सासू दिवाळीच्या आंत मरणार नाहीं !'

नेहमींप्रमाणें भजन केल्यावर बाबांनीं उपदेशाचे दोन शब्द सांगितले. 'बाबांनो, दया हा जगांतला सर्वांत मोठा धर्म आहे. मी कबीराचा पुरावा सांगतों. 'तीरथ जावो, काशी जावो, चाहे जावो गया। कबीर कहे कमालकू, सबसे बडी दया।' गरीब प्राण्यांचे प्राण घेणें यासारखें पाप नाहीं. देव ह्या पापाला कधीं क्षमा करणार नाहीं. गरीब प्राण्यांना मारणाराचें वाटोळें होईल. दुसऱ्याचे प्राण वांचवणें हें सर्वांत मोठें पुण्य.'

त्यानंतर प्रत्येक स्त्रीनें आपापल्या घरांतून एकेक भाकर न् तिखट घेऊन यावें असा बाबांनीं आदेश दिला. दहा मिनिटांच्या आंत भाकरींची चवड जमा झाली. एका मारवाड्यानें एक लहानशी चपाती आणून दिली. तेव्हां बाबांनीं ती त्याला तशीच परत केली. ते म्हणाले, 'गरिबाचें अन्न द्या. हें नको.' एकानें पेढ्यांचा पुडा दिला. तो बाबा तसाच्या तसा त्याला परत करणार इतक्यांत एक आंधळा भिकारी बाबांच्या रोखानें चांचपडत चांचपडत येत असतांना त्यांना दिसला. तेव्हां त्या पेढ्यांच्या पुड्यांतले दोन पेढे त्यांनीं त्या भिकाऱ्याच्या तोंडांत मोठ्या प्रेमानें घातले.

गटाराच्या कडेला एक मोकळी जागा होती. तेथें बाबांची पंगत बसली. वर्तमानपत्राच्या कागदाच्या तुकड्यावर भाकरी वाढण्यांत आल्या. कोणी घरांतून लोणचें आणलें, कोणी मिरच्या आणल्या, कोणी कांदे आणले. गरीब लोकांनीं बाबांला दिलेली ती 'मेजवानी' बघून माझें हृदय भरून आलें. बाबा अलीकडे भाकर खात नाहींत. पण त्या रात्रीं त्यांनीं अर्धी भाकर लोणच्याबरोबर खाल्ली. इतक्यांत सगुणाबाई नांवाच्या एका वृद्ध स्त्रीनें ताज्या भाकरी अन् पिठल्याचें पातेलें आणलें. बाबांची न् त्या बाईची पूर्वीची ओळख असलेली दिसली. बाबांनीं तिच्या घरच्या सर्व मंडळींची अत्यंत आस्थेनें विचारपूस केली. जेवण झालें. जागा साफ झाली. डोक्यावरच्या खापरांतून पाणी पिऊन बाबांनीं ढेकर दिली.

मग मी म्हणालों, 'बाबा, आज रात्रींचा मुक्काम आतां आमच्या बंगल्यावरच होऊं द्या. सर्व मंडळीं दमली आहेत.' बाबांनीं तें मान्य केलें. मोटार स्टेशनासमोर ठेवून आम्ही डोंगरावर चालत चालतच गेलों. बंगल्यावर पोहोंचतांच मधल्या दालनांत बाबांच्या भोंवतालीं त्यांचे भजनकरी आपापल्या पथाऱ्या टाकून झोंपीं गेले. बाबा कशावर झोंपणार? धड वस्त्रावर बाबा झोंपतच नाहींत. अन् माझ्या बंगल्यावर तर एकहि फाटकें वस्त्र मला सांपडेना. शेवटीं मोठ्या कष्टानें एका फाटक्या जीर्ण सतरंजीचा तुकडा मला सांपडला. त्याबरोबर बाबांना हर्ष झाला. तो त्यांनीं खालीं अंथरला. माळ्याच्या बायकोकडून तिचें एक फाटकें लुगडें अन् गोधडी त्यांनीं मागून घेतली तेव्हां त्यांचा बिछाना सजला. अंगावरच्या चिंध्या बाबांनीं उतरल्या; आणि सुईदोरा मागून घेऊन त्या चिंध्या शिवण्याचें त्यांचें काम बऱ्याच रात्रीपर्यंत चाललें होतें. ऐशीं वर्षांच्या वर बाबांचें वय होऊन गेलें तरी त्यांची दृष्टि उत्तम आहे. सुईत दोरा त्यांनीं स्वतःच्या हातांनीं ओवला. हें बघून मी तर चकितच झालों. बाहेर बंगल्याच्या व्हरांड्यांत मी माझें अंथरूण पसरलें. बिछान्यावर पडल्यापडल्या किती वेळ तरी बाबांच्या त्यागमय जीवनावर मी विचार करीत होतों.

पहांटे साडेचाराला बाबा उठले. त्याबरोबर त्यांची मंडळीहि पटापट उठली. सर्वांनीं प्रातर्विधी आटोपले. बाबा मला म्हणाले, "तुमच्याकडे खराटे जेवढे असतील तेवढे लौकर आणा!' माळ्याकडे चारपांच खराटे होते. ते बाबांनीं आपल्या सर्व् मंडळीमध्यें वाटले. एक स्वतः हातांत घेतला आणि बंगल्याभोंवतालचें आवार झाडण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. मी लाजेनें अर्धामेला झालों. ऐशीं वर्षांच्या बाबांनीं माझ्या बंगल्याचें आवार झाडावें अन् मी काय करावें? नुसतें त्यांच्याकडे बघत उभें राहावें? बरें, मी हातांत खराटा घेऊन झाडायला सुरुवात करावी तर तें नुसतें सोंग झालें असतें. कारण तोंपर्यंत एकदांहि झाडण्याचें काम मी केलें नव्हतें, आणि बाबा गेल्यानंतर तें मी कधीं करणारहि नव्हतों. मग उगीच बाबांच्या पुढें हातांत खराटा धरून त्यांची आणि आपली स्वतःची वंचना कां करा?

मी चमत्कारिक मनःस्थितींत तसाच बाबांच्या मागें मागें हिंडत राहिलों. बाबांचें झाडण्याचें तंत्र मात्र 'रामबाण' आहे. त्यांनीं आमच्या दोन्ही गड्यांना जवळ बोलावून कसें झाडावें ह्याचें प्रात्यक्षिक दिलें. ते म्हणाले, 'बसून झाडावें. ओणव्यानें कधीं झाडूं नये. घाईचें झाडणें हें झाडणें नव्हे. झाडलेल्या जागेवर धूळ आणि खडा कधीं राहातां कामा नये. अगदीं बारीक सारीक खडाहि वेंचून दूर टाकावा.' अर्ध्या तासांत बंगल्याभोंवतालचें सारें आवार बाबांनीं आणि त्यांच्या मंडळींनीं झाडून झाडून आरशासारखें स्वच्छ केलें. एक नवीनच शोभा त्यांतून प्रकट झाल्याचा मला प्रत्यय आला. बाबा मला म्हणाले, 'रोज सकाळीं ह्या बंगल्याचें आवार असें दिसावयाला पाहिजे.' मी म्हणालों, 'ह्या माझ्या दोन गड्यांनाच तुम्ही तें सांगा. माझी पाठ वळली कीं, ते येथें स्वस्थ झोंपा काढतात.' तेव्हां बाबा कळवळून नोकरांना म्हणाले, 'अरे, तुम्ही ह्या बंगल्याचे नोकर नाहींत, मालक आहांत. तुम्ही येथें रोज राहातां. तुमचे मालक हे काय, चारदोन दिवसांचे मुसाफर म्हणून इथें येतात. हें तुमचें घर आहे. तें तुम्ही स्वच्छ ठेवणार नाहीं तर दुसरें कोण ठेवणार?' नोकर लाजले, ओशाळले. बाबा त्यांना म्हणाले, 'मी इथें वाटेल तेव्हां येईन. जर मला ह्या आवारांत खडा आढळला तर बघा.'

हा वेळ होईपर्यंत चांगलेंच उजाडलें होतें. समोरच्या उंच उंच डोंगरांच्या रांगा, निळेंभोर आभाळ आणि भोंवतालची हिरवीगार झाडी पाहून बाबा त्या सृष्टिसौंदर्यांत एकदम तल्लीन झाले. डोळे भरून ते सारखे बघूं लागले. मला म्हणाले, 'काल रात्रीं अंधारांत कांहीं मला दिसलें नाहीं. फारच अजब जागा तुम्हीं शोधून काढलीत. मजा आहे. आतां इकडून जातां येतां मी येथेंच येऊन मुक्काम करणार.' मला आनंद झाला. मी म्हणालों, 'बाबा, बंगला तुमचाच आहे. केव्हांहि येऊन आपण इथें राहा!' बाबा म्हणाले, 'मला काय करायचाय तुमचा बंगला? मी इथेंच कुठं तरी झाडाखालीं पडून राहीन, आणि तुमचा बंगला झाडून काढीन. ह्या बंगल्याचा झाडूवाला म्हणून तरी तुम्ही मला ठेवाल ना?' बाबांना काय उत्तर द्यावें हेंच मला

कळेना. ह्याच वृत्तीनें बाबा दुसऱ्यांचीं मनें जिंकतात. 'नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता ॥'

बाबांची निघण्याची वेळ झाली. कडेंवाला कडें वाजवूं लागला. भजनकऱ्यांनीं आपापल्या पथाऱ्या पाठीवर बांधून ते बाबांच्या मागें ओळीनें उभे राहिले. बाबांनीं सूर लावून काठीचा इशारा दिला. त्याबरोबर 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला ॥' ह्या भजनाचा गजर उसळला. आजूबाजूच्या झाडांच्या अंगावरहि रोमांच उसळला. आपल्या पानांच्या टाळ्या वाजवीत तींहि त्या भजनांत जणुं सामील झालेलीं दिसलीं.

माझ्या बंगल्यापासून खालीं स्टेशनाच्या आवारापर्यंत बाबांनीं भजनाचा तडाखा उडवून दिला. सकाळच्या शांत वातावरणांत त्या डोंगरभागांत कडें असें कांहीं घुमत होतें म्हणतां! खंडाळें गांव अगदींच लहान. दहावीस घरांचें. पण घराघरांतून मुलें, बायका, म्हातारेकोतारे पटापटा धांवत रस्त्यावर आले. मोठमोठ्या बंगल्यांचे पारशी, गुजराथी मालक आपापल्या व्हरांड्यांतून जांभया अन् आळोखेपिळाखे देत बाबांकडे जिज्ञासेनें बघूं लागले. त्यांना कळेना, ही काय भानगड आहे! डोक्यावर खापर ठेवलेल्या अन् अंगांत रंगीत चिंध्या घातलेल्या ह्या चमत्कारिक म्हाताऱ्याभोंवतीं खेडवळ माणसें टाळ्या वाजवीत एवढ्या सकाळीं कां जमा झालीं आहेत हें त्यांन उमगेना.

त्यांना बघून बाबा दोन्ही हात डोक्यावर जोडून जेव्हां अत्यंत नम्रतेनें नमस्कार करीत तेव्हां त्यांची फार पंचाईत व्हायची. ते त्यांच्या नमस्काराचा स्वीकार न करतां तसेच त्यांच्याकडे मख्खासारखे पहात उभे राहावयाचे! बाबा हळूच विषादानें मला म्हणाले, 'गरिबांचा नमस्कार श्रीमंत कशाला घेतील बिचारे? तेवढेच त्यांच्या हाताला कष्ट पडतील!' डोंगर उतरून आम्ही खंडाळा स्टेशनच्या फलाटावर आलों. तेथें तांबडे डगले घातलेले सर्व हमाल बाबांच्या भजनांत भराभर सामील झाले. तसे डोक्याला गरम कानटोपी घातलेले स्टेशन मास्तरहि बाहेर आले आणि सगळेच टाळ्या वाजवून भजन करीत आहेत हें पाहून तेहि हलके हलके टाळ्या वाजवूं लागले.

सगळ्यांत मला मौज वाटली एका पोलिसाची. अंगावर पोलिसी गणवेश घातलेला तो माणूस जेव्हां टाळ्या वाजवून भजन करूं लागला तेव्हां तें दृश्य पाहण्यासारखें होतें.

भजन करीत रस्त्यानें जातांजातां बाबा समोरून येणाऱ्याजाणाऱ्यांची मोठ्या आस्थेनें चौकशी करीत. मुलें भेटलीं कीं ते विचारीत, 'शाळेंत जातां ना रे ?' कोणी नाहीं म्हटलें कीं ते हळहळून म्हणत, 'अरे, शिकत नाहीं तुम्ही. तुम्हांला बैल का रे व्हायचंय ?' एक म्हातारा भिकारी बाजूला उभा होता. त्याच्या अंगावरून प्रेमानें हात फिरवून बाबांनीं विचारलें, 'कसं चाललंय तुझं ?' तो बाबांचा प्रश्न ऐकून मला हंसं आलें. भिकाऱ्याचें काय चालावयाचें ? भिकारी म्हणाला, 'कालपासून जेवलों नाहीं.' बाबा हळहळले. मला म्हणाले, 'त्याला दोन आणे द्या.' मी चटकन् त्याच्या हातावर दोन आणे ठेवले.

पुण्याला जाणारा आडवा रस्ता लागेपर्यंत बाबांचें हें भजन चाललें होतें. मोटर रस्त्यावर उभी होती. खंडाळ्याहून आम्ही लोणावळ्याला आलों. तेथें मोटर थांबली. पुन्हा बाबांची भजनपार्टी जी निघाली ती सर्व लोणावळें गांवामधून हिंडून आली. चांगला तास लागला. कोणी केळीं दिलीं, कोणी चिक्की दिली. एका गुजराथी व्यापाऱ्याकडून आपल्या भजनकरी मंडळीसाठीं बाबांनीं चारपांच गरम ब्लँकेटें घेतलीं.

लोणावळ्याहून वडगांवला आलों. तेथें रस्त्यावरच पोटोबाचें देऊळ आहे. त्याच्या शेजारच्या मैदानांत बाबांनीं आपलें भजन सुरू केलें. पांच मिनिटांत शेंदोनशें स्त्रीपुरुष त्यांच्याभोंवतीं जमले. भजनाचा सर्वत्र गजर उठला. कांहीं मराठ्यांच्या बायका तोंडाला आडवा पदर लावून उभ्या होत्या. त्यांना उद्देशून बाबा आपल्या तऱ्हेवाईक विनोदानें म्हणाले, 'कां ग बायांनो, तोंडाला पदर लावून कां ग उभ्या ? भजनाचें वारें तोंडांत शिंडांत शिरेल म्हणून भ्या वाटतंय् व्हय् ?' त्याबरोबर त्या लाजल्या अन् टाळ्या वाजवूं लागल्या.

भजन झाल्यावर बाबांनीं कीर्तनास सुरुवात केली. ते म्हणाले, 'ज्यांच्या

अंतःकरणांत दया नाहीं त्यांचें कधींच चांगलें होणार नाहीं. गुजराती, मारवाडी, ब्राह्मण हे घरांत कोंबड्या ठेवतात का? नाहीं. मग त्या तुमच्या घरांत कशा घुसल्या? सकाळीं त्या कोंबड्यांना दाणे घालायचे अन् संध्याकाळीं त्यांच्या मुंड्यांवरून सुरी फिरवायची? तुमचें कसें कल्याण होणार? मराठे, माळी, तेली, न्हावी, परीट, सुतार, लोहार, कैकाडी, वेलदार, महार, मांग ह्यांची वाईट स्थिति ह्यामुळें झाली. मुक्या जनावरांचे शाप त्यांना भोंवताहेत. तुम्ही लोक दिवसभर कामें करतां, काबाडकष्ट करतां. तुमच्या बायका रानांत जातात, शेण्या वेंचतात, काटक्या वेंचतात. पण त्यांच्या अंगावर धड वस्त्र नाहीं कीं फुटका मणी नाहीं. हीं—हीं तुमचीं घरें बघा. त्याला भिंती नाहींत कीं छप्पर नाहीं! नाहीं तर त्या मारवाड्याची ती तीनमजली हवेली बघा! **त्या मारवाड्याच्या घराशेजारीं जेव्हां महाराची माडी बांधलेली मला दिसेल तेव्हां माझा जीव शांत होईल.** मारवाड्याच्या बाईच्या नाकाला नुसता बोंबलाचा वास आला तर ती परातभर ओकेल. अन् तुम्ही मडकींच्या मडकीं घरांत बोंबलांनीं भरून ठेवतां काय? उगाच दरिद्री राहिलांत होय? इथें जी तरुण मंडळी मला दिसताहेत त्यांना मी सांगतों. जत्रेच्या ठिकाणीं शेंकडों बकरीं मारलीं जातात. तेथें शंभर तरुणांनीं जाऊन देवळाच्या पुढें उभें राहावें अन् दोनरों हातांनीं नमस्कार करून लोकांना सांगावें, 'बाबांनो, ह्या मुक्या जनावरांची हत्त्या करूं नका! दुसऱ्याचे प्राण वांचविण्यासारखें जगांत पुण्य नाहीं!'

वडगांवहून निघावयाला पावणेअकरा वाजले. उन्हें चांगलीं तापलीं होतीं. पुण्याला पोहोंचायला बारा वाजले. आळंदीच्या हद्दींत यात्रेच्या वेळीं मोटारींना जावयाला परवानगी नसते. ती परवानगी घ्यावयाला आम्ही कलेक्टरच्या कचेरींत गेलों. तेथें बाबांच्या दर्शनाला लोकांची प्रचंड गर्दी हां हां म्हणतां जमली. मॅजिस्ट्रेट आणि मामलेदारहि आंतून बाबांना भेटावयाला बाहेर आले.

मोटरची परवानगी घेऊन आम्ही आळंदीच्या परिसरांत पोहोंचावयाला एक वाजला. उन्ह असें तापलें होतें म्हणतां! अन् यात्रेकरूंचा महापूर

रस्ता भरून आळंदीकडे वाहात होता. वातावरणांत टाळ–दिंड्यांचा ध्वनि निनादत होता. यात्रेकरूंच्या खांद्यावरच्या पताका वाऱ्यावर फडफडत होत्या. भाविकतेचा उन्मादक सुगंध सर्वत्र दरवळत होता. बाबा मोटरींतून खालीं उतरले; आणि त्यांनीं 'देवकीनंदन गोपाला'चा गदारोळ ठोकला. त्याबरोबर शेंकडों यात्रेकरू त्यांच्या रोखानें धांवले. झालें. टाळ्यांचा न् भजनाचा धोशा पुन्हा जोरांत सुरू झाला.

मी मात्र मोटारींत बसून राहिलों. माझें सारें अंग आंबून गेलें होतें. मी शेलारमामांना म्हणालों, 'हा ऐशीं वर्षांचा म्हातारा जबरदस्त आहे. ह्याच्याबरोबर आपण कांहीं पुरे पडणार नाहीं.' शेलारमामा म्हणाले, 'गेलीं पन्नास वर्षें बाबांचा अहोरात्र हाच कचका चालला आहे. कोणताहि एक माणूस आठवडाभर कांहीं त्यांच्याबरोबर टिकत नाहीं!'

नवयुग : २०-१२-१९५३

# इंद्रायणीच्या वाळवंटामध्यें

गाडगेबाबा कोणत्याहि तीर्थांत कधीं स्नान करीत नाहींत किंवा कुठल्याहि देवळांत प्रवेश करीत नाहींत. तेव्हां त्यांचा निरोप घेऊन मी श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचें दर्शन घ्यावयास एकटाच पुढें गेलों. गर्दीला कांहीं सुमारच नव्हता.

यात्रेकरूंपेक्षां विक्रेत्यांचीच संख्या मला जास्ती वाटली. भिकारी आणि दुकानदार ह्यांनीं त्या यात्रेचें धार्मिक स्वरूप नष्ट करून त्याला कोठल्या तरी शहरांतील बाजाराचें गलिच्छ स्वरूप मिळवून दिलें होतें. बाकी, सर्व जत्रांची हीच परिस्थिति असते म्हणा! लोक धर्माचा व्यापार करतात. खाण्याच्या जिनसांचे इतके प्रकार सर्वत्र विकले जात होते कीं, लोक पोट भरण्यासाठीं तेथें आले आहेत का पुण्य संपादन करण्यासाठीं आले आहेत, हेंच कळत नव्हतें. कपाळाला लावावयाचें अभ्रकमिश्रित गोपीचंदनाचें रंगीबेरंगी गंध खेडवळ लोक दोनदोन पैसे देऊन कपाळावर रंगवून घेत होते. त्यामुळें त्यांचे चेहेरे मोहरमच्या वाघासारखे दिसत होते. ह्या देशांतील अडाणी लोकांच्या सौंदर्यदृष्टीचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे.

इंद्रायणीच्या पात्रांत माशांपेक्षां माणसेंच अधिक दिसलीं. पूल ओलांडतांच पलीकडे दोन्ही बाजूला भिकाऱ्यांच्या भयंकर पलटणी दुतर्फा लागून राहिलेल्या होत्या. सर्व तऱ्हेच्या हिडीस रोगांनीं पछाडलेले आणि कोणतींहि इंद्रियें धड स्थितींत ठिकाणावर नसलेले हे एकाहिपेक्षां एक भेसूर प्राणी अशा यात्रेच्या वेळीं एवढ्या संख्येनें एकदम कसे आणि कोठून जमा होतात हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कोणाच्या मदतीवांचून दहा पावलें नीट चालूं शकेल असा एकहि भिकारी त्यांत मला आढळला नाहीं. ह्याचा अर्थच हा आहे कीं, यात्रेच्या वेळीं ह्या सर्व भिकाऱ्यांना क्षेत्राच्या ठिकाणीं आणून त्यांचें सार्वजनिक प्रदर्शन करणाऱ्या कांहीं व्यापारी संघटना असल्या पाहिजेत. शरिराच्या भांडवलावर स्वतःचीं पोटें जाळणारीं कांहीं माणसें ह्या जगांत असूं शकतात हा विचार देखील करवत नाहीं.

भिकारी संपले तेथून हलवायाचीं दुकानें सुरू झालीं. प्रत्येकाच्या दुकानांतून फोनोग्राफ तारस्वरानें चित्रपटांमधलीं निरनिराळीं गाणीं किंचाळत होते. एका दुकानांतला ग्रामोफोन दुसऱ्या दुकानांतल्या ग्रामोफोनपेक्षां जास्त जोरानें ओरडण्याचा प्रयत्न करीत होता. डोक्यावर कडक उन्ह, नाकातोंडांत धूळ नि घाण, कानांत असंख्य आवाजांचा असह्य गोंगाट नि गर्दीतून वाट काढतांना सर्वांगाला बसणारे धक्के, अशा 'थाटांत' यात्रेकरू देवळाच्या अरुंद बोळांमधून जेव्हां जाऊं लागतो तेव्हां त्याच्या अंतःकरणांत भक्ति आणि श्रद्धा ह्या भावना किती अंशांनीं शिल्लक राहात असतील तें परमेश्वराला माहीत!

देवळाच्या महाद्वारासमोर तर बारीमध्यें शेळ्यांमेंढ्यांप्रमाणें हजारों लोक खेंचाखेंच करून असहाय्यपणें बसले होते; आणि दरवाजाच्या लहान दिंडी-मधून त्यांपैकीं दहा माणसें हस्याहस्यानें पोलीस सोडीत होते. बारीमध्यें जाऊन बसलें तर देवळांत प्रवेश मिळावयाला संध्याकाळ तरी झाल्यावांचून राहणार नाहीं ही गोष्ट सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ होती. तेव्हां आतां श्री ज्ञानेश्वरांच्या समाधीचें दर्शन व्हावयाचें कसें ह्या विवंचनेंत मी तसाच थोडा वेळ उभा राहिलों.

इतक्यांत कोणी तरी सांगितलें कीं, देवळाच्या डाव्या बाजूला 'वशिल्याचें दार' आहे, तेथून अधिक लौकर प्रवेश मिळूं शकेल. तेव्हां मी तिकडे गेलों. अन् खरेंच. 'खास प्रवेशपत्रिका' हातांत घेऊन पांढरपेशीं माणसें तिकडून आंत आरामशीरपणें अन् व्यवस्थितपणें जात होतीं. मी चकितच झालों. काय चमत्कारिक देश आहे हा हिंदुस्थान तरी! वशिल्यावांचून इथें कामेंच होत नाहींत! मग तो राजाचा दरबार असो नाहींतर देवाचा किंवा साधुसंतांचा दरबार असो. थोड्या वेळांत मी चार माणसांची वशिल्याची पत्रिका मिळविली, अन् मोठ्या रुबाबांत आंत शिरलों. सहस्रावधि गरीब यात्रेकरू महाद्वारासमोर तासन् तास ताटकळत अन् तळमळत बसले असतां आपण 'वाम मार्गानें' म्हणजे डाव्या बाजूच्या दरवाजानें आणि वशिल्यानें देवालयांत प्रवेश मिळवावा ही अपराधी जाणीव मनांत डांचत होती. पण गेलों तसाच आंत कोडग्यासारखा अन् काय?

आंतहि काय कमी गर्दी होती म्हणतां कीं काय? तेथेंहि दर्शनोत्सुक भक्तांच्या प्रचंड रांगा लागून राहिल्या होत्या. ओळीनें गेलों असतों तर एकदोन तास तरी सहज मोडले असते. तेव्हां लौकर दर्शन घडावें म्हणून पुन्हा दुसरा वशिला लावला. तोहि चटकन् लागला. समाधिगृहाच्या उजव्या बाजूला एक लहानसें चौकोनी द्वार आहे. माझ्या शरिराच्या माणसाला त्या दारांतून आंत शिरणें म्हणजे एक अग्निदिव्यच्च होतें. पण शिरलों कसा तरी आंत आणि बघतों तों अगदीं ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीच्या समोरच्च उभा होतों मी! समाधीवर फुलांच्या राशी पडलेल्या होत्या. समाधीचें अन् तिच्या मागें असलेल्या श्रीविठ्ठल रखुमाईच्या मूर्तीचें मनसोक्त दर्शन घेतलें.

मागें वळून पाहिलें तों एक अत्यंत केविलवाणें दृश्य दृष्टीस पडलें. समाधीचें दाराबाहेरून दर्शन घेणाऱ्या भक्तांच्या अवस्थेचें काय वर्णन करावें! दाराच्या दोन्ही बाजूला दोन पोलीस उभे होते. रांगेतून अनुक्रमानें येणाऱ्या माणसाला डाव्या बाजूचा पोलीस दोन्ही दंडाला धरून दारापुढें उभा करी. अन् त्यानें दर्शनासाठीं हात जोडले रे जोडले कीं त्याला तो उजव्या बाजूच्या

पोलिसाच्या अंगावर ढकलून देई. म्हणजे कोणाहि माणसाला समाधीचें दर्शन दोन सेकंदांपेक्षां कांहीं अधिक वेळ घडत नसे. आंतून बघणाऱ्याला हें दृश्य फारच हास्यास्पद दिसे. आला माणूस कीं चालला! आला माणूस कीं चालला! हें का दर्शन म्हणावयाचें का दर्शनाची विटंबना?

गरीब माणसांनीं लांबून लांबून उन्हांतून आणि धुळींतून रखडत यावयाचें, तासचे तास बारींत तडफडत बसावयाचें, अन् एवढी तपश्चर्या करून समाधीचें दर्शन जें घ्यावयाचें तें असें पापण्यांच्या एका उघडझांपीचें! गाडगेबाबा म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं—'मरण बरें पण शहाण्या माणसानें यात्रेला जाऊं नये!'

देवळांतून बाहेर पडलों तेव्हां तीन वाजून गेले होते. इंद्रायणीच्या पुलाच्या एका कमानीजवळ गाडगेबाबांच्या 'गोपाला'चा प्रचण्ड दणका चालूच होता. दोनतीन हजार तरी माणसें त्यांच्या भजनांत उभीं होतीं. त्यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम रात्रीं नऊ वाजतां सुरू होणार होता. तेव्हां पांचसहा तास मी तेथें बसून काय करूं? असा विचार करून मी पुण्याला गेलों, आणि आठ साडेआठाच्या सुमारास पुन्हा आळंदीला परत आलों.

इंद्रायणीच्या दक्षिण तीरावर गाडगेबाबांनीं एक लाख रुपये खर्च करून पसतीस सालीं एक प्रशस्त आणि सुंदर धर्मशाळा बांधून ठेवली आहे. ह्या धर्मशाळेच्या आवारापासून नदीच्या पात्रापर्यंत पायऱ्या-पायऱ्यांसारखे जमिनीचे लांबलचक टप्पे तयार केलेले आहेत, आणि त्यांवर कलमी आंब्यांचीं झाडें लावलीं आहेत. गाडगे बाबा डोक्यावर चिंध्या घालीत असतील पण कलात्मक सौंदर्यदृष्टि त्यांच्या अंगीं उपजत आहे, हें त्यांनीं बांधलेल्या कोणत्याहि इमारतीकडे आणि त्या इमारतीभोंवतालच्या शोभिवंत आवारांकडे सहज दृष्टि टाकली असतां लक्षांत आल्यावांचून राहाणार नाहीं.

धर्मशाळेकडच्या नदीच्या उतरत्या पात्रांत कीर्तनाची व्यवस्था केली होती. हा सर्व भाग नळीच्या विद्युद्दीपांनीं सुप्रकाशित करण्यांत आलेला होता अन् रंगीबेरंगी कागदाच्या पताकांच्या माळांनीं सुशोभित केलेला होता. साडे-नवाच्या सुमारास कमींत कमी पन्नास हजार श्रोते तरी नदीच्या वाळवंटांत

जमलेले होते. उजव्या बाजूला इन्द्रायणीच्या पुलावरहि हजारों श्रोते कीर्तनश्रवण करण्यासाठीं उभे होते. आळंदीची निम्मी यात्रा तें कीर्तन ऐकण्यासाठीं जमली होती असें म्हटलें तरी हरकत नाहीं. आजपर्यंत कोणत्याहि कीर्तनासाठीं एवढी मोठी गर्दी जमलेली निदान मीं तरी पाहिलेली नाहीं.

गाडगेबाबांनीं आरंभीं उठून सर्व जनतेला नमस्कार केला आणि कैकाडी बाबांना कीर्तन करण्याची आज्ञा केली. गाडगेबाबांच्या निष्ठावंत शिष्यांत कैकाडीबाबा हे अग्रगण्य होत. गाडगेबाबांच्या पोषाखाची एक 'फॅशन' तर कैकाडीबाबांची दुसरीच 'फॅशन.' डोक्याला कानांवरून बांधलेलें पांढरें फडकें मागें पाठीवर रुळत आहे, गळ्यापासून खालीं पायघोळ पांढरें रकटें अंगावर दुमडून पांघरलेलें आहे, अन् त्यांतून त्यांच्या लांबलचक करड्या दाढीचा श्यामल चेहेरा अन् तेजस्वी डोळे चमकत आहेत! 'रामकृष्ण हरि। जयजय रामकृष्ण हरि॥' अशी कैकाडीबाबांनीं आपल्या सुरेल स्वरांत नामसंकीर्तनाला सुरुवात करून नंतर 'रूप पहातां लोचनीं। सुख झालें वो साजणीं॥' असें स्तवन केलें आणि 'संतांच्या पायीं हा माझा विश्वास। सर्व भावें दास झालों त्यांचा॥' हा अभंग निरूपणाला घेतला.

ते म्हणाले, 'हा संसार कष्टाचा आहे. एखाद्या राक्षसारखा किंवा भुता-सारखा तो तुमच्या मागें लागला आहे. संसाराचा गाडा ओढतांओढतां कोण कष्ट होतात जिवाला! नाकीं नव येतात. आतांच बघा! तुम्ही आज ह्या यात्रेला आलांत. घरांत स्वस्थ बसलां असतां तर तुम्हांला विश्रांति मिळाली असती. पण त्या विश्रांतिसुखाची तुम्ही पर्वा केली नाहीं. तुमच्या-जवळ पैसा नाहीं. यात्रा काय फुकटची होते? शेजाऱ्यापाजाऱ्याकडून दहा-पंधरा रुपये तुम्ही उसनवार काढले. उन्हातान्हांतून येथपर्यंत चालत आलांत. आळंदीच्या हद्दींत पाय टाकण्यापूर्वीं डॉक्टराकडून कचाकचा टोंचून घेतलेंत. थंडीचे हे दिवस. इंद्रायणीच्या पाण्यांत पाय टाकला कीं, अंगांत भडभडून हींव भरतंय. पण तुम्ही जे इथें आलांत ते काय इंद्रायणीच्या पाण्यांत आंघोळ करायला? तीर्थांत स्नान करून काय कुठें पापें

जातात? नाहीं. तुमचें पाप नष्ट करण्याचें सामर्थ्य जर कुठें असेल तर तें संतांच्या वचनांत.

लोखंडाचें सोनें केवळ परिसच करूं शकतो. सासू चांगली असली तर सून चांगली होते. गांवचा पाटील चांगला असला तर लोक चांगले. पाटील गुंड असला कीं गांव नासलाच म्हणून समजा. मास्तर चांगला असेल तर मुलगा चांगला निपजेल. मोटारीचा ड्रायव्हर कुशल असेल तर मोटारींतल्या उतारूंचे प्राण सुरक्षित राहातील. त्याच्या जर का उलट्या बाहुल्या असल्या तर आंतल्या पंचवीस तीस उतारूंचा निकाल लागलाच म्हणून समजा.

त्याप्रमाणें जगांत साधुसंत असतील तरच हें जग सुधारेल. 'तुका म्हणे पापें। जाती संताचिया कृपें॥' आम्ही दाढ्या वाढवणारे आणि अंगावर चिंध्या घालणारे कांहीं साधु नव्हत. 'चंदन थे तो घस गये रह नीमके खोड। साधू थे तो चल गये रहे चपातीचोर॥' साधुसंत हे चंदन. आम्ही कडुनिंबाचीं खोडें. आम्ही स्वतःच अजून सुधारलों नाहींत तर आम्ही तुम्हांला काय सुधारणार? पण ज्ञानोबा, तुकोबा ह्यांची वाणी चंद्रसूर्य जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत अमर राहाणार, आणि तिच्याच सामर्थ्यानें सर्वांचा उद्धार होणार. बोला—'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला॥'

म्हणून संतांच्या पायीं आपण विश्वास ठेवला पाहिजे. तेच माझें हित करतील अशी गाढ श्रद्धा मीं बाळगली पाहिजे. वैकुंठाचा रस्ता केवळ संतच दाखवूं शकतात. तें इतरांचें काम नव्हे. संतांच्या वाणीचा उच्चार करणें हाच तो वैकुंठाचा मार्ग. हा वैकुंठाचा मार्ग तुमचे कोणीहि सगेसोयरे दाखवूं शकणार नाहींत. उलट तुमची बायको, तुमचे आईबाप तुमच्या मार्गांत अडथळेच उत्पन्न करतील. लोक तुम्हांला त्या कामीं नांवें ठेवतील. पण लक्षांत ठेवा. संत तुमचें कधींहि अकल्याण करणार नाहींत. संसार कसा करावा, पाप कां करूं नये, कोणत्या गोष्टी करण्यांत खरें पुण्य आहे हें संतच तुम्हांला सांगतात. मग संसारी लोक संतांना कां विनाकारण नांवें ठेवतात? संतांनीं कोणाचें घोडें मारलें आहे?

जगांत पैशाला सारा मान आहे. हातांत 'रुपया' असेल तर 'जोरू

कहे प्राणपतया!' नवरा जोंपर्यंत पैसा मिळवतो तोंपर्यंत तो बायकोला आवडतो. बायको डोळ्यांत अश्रू आणून नवऱ्याला वारंवार सांगते, 'तुमच्यासाठीं मी माझे आईबाप सोडले बरें नाथ!' पण उपनिषदांत सांगितलें आहे कीं, ह्या जगांत कोणी कोणासाठीं कांहीं सोडलेलें नाहीं. आपलें जोंपर्यंत बरें आहे तोंपर्यंत सगळे आपले आहेत. 'बरें झालें तरी अववेची म्हणती गरीबाचा अंतीं कोणी नाहीं!' नवरा जोंपर्यंत धड आहे तोंपर्यंत बायको त्याला विचारते. त्याला महारोग होऊं द्या. अर्धांगवायु होऊन त्याचें तोंड वांकडें होऊं द्या. मग पहा. किंवा बायको आंधळी किंवा क्षयरोगी झाली नाहीं तोंपर्यंत नवरा तिला विचारील.

पण संतांचें तसें नाहीं. 'संत दयाळ दयाळ। करि सर्वांचा सांभाळ॥' सर्वांगाला रक्तपिती झाली असली तर त्याच्या अंगावरून केवळ संतच ममतेचा हात फिरवतील. संतांसारखी दया कोणाच्याहि अंतःकरणांत नाहीं. खुद्द देव देखील संतांएवढा दयाळू नाहीं. म्हणूनच म्हटलें आहे कीं, 'देव दयाळ दयाळ। करी भक्ताचा सांभाळ॥' देव केवळ आपल्या भक्तांचा सांभाळ करतो. तो पंक्तिप्रपंच साधुसंतांजवळ नाहीं. 'दीपकाचे अंगीं नाहीं दुजाभाव। चोर आणि साव सारखाची॥' असे संत असतात. कोणी चोर असो, कोणी साव असो. त्याच्या उद्धाराची संतांना सारखीच काळजी.

ज्ञानोबारायांच्या समाधीच्या दर्शनाला जमणारी आजची ही प्रचण्ड यात्रा पहा. करोडोपति मेला तरी त्याच्या दर्शनाला एवढीं माणसें कांहीं जमणार नाहींत. आजच्या ह्या यात्रेवर किती लोक पैसे कमावताहेत तें पहा. सरकार-पासून तों म्युनिसिपालिटीपर्यंत सर्वांचा 'कर' आपला ह्या बिचाऱ्या यात्रेकरूं-वर. दुकानदारांना तर पैसे कमावण्याची पर्वणीच आली आहे. चिमूटभर अबीर न् बुका नि एकेका माळेला आठ आठ आणे! अनेक बुवा-बैरागी ह्या वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्यासाठीं आज इथें जमले आहेत. ज्ञानेश्वर महाराजांच्या जिवावर आज इतके लोक इथें एवढा पैसा कमावतात. हा देखील संतांचा एक महिमाच म्हणायला हवा!

असत्यानें वागणाऱ्या माणसांचा सुद्धां संतांच्या मुळें एवढा फायदा होतो

३९३५५ दि: १७.९.७७
क्रमांक ९३७५ नों: दि: ...३०।९

तर सत्यानें वागणाऱ्या माणसांचा केवढा फायदा होईल बरें, ह्याचा तुम्ही विचार करा. देव आहे कीं नाहीं ह्याबद्दल एका वकिलाचा अन् त्याच्या मुलाचा मोठा वाद होता. वकील म्हणे, ही सृष्टि आपोआप उत्पन्न झाली. तिचा कोणी उत्पत्तिकर्ता नाहीं. मुलगा म्हणे, ही सृष्टि ईश्वरानें उत्पन्न केली. पण बापाला तें कबूल नसे. एकदां वडील बाहेर गेले असतां मुलानें वाघाचें एक सुंदर चित्र काढून त्यांच्या टेबलावर ठेवलें. वडील परत आले तेव्हां त्यांना तें चित्र दिसलें. ते त्या चित्रावर फार खूष झाले. चित्रांतला वाघ अगदीं हुबेहूब वाघासारखा दिसत होता. वडिलांनीं मुलाला विचारलें, 'बाळ, हें चित्र कोणी काढलें?' मुलगा म्हणाला, 'मला नाहीं माहीत.' 'मग हें इथें कसें आलें?' वडिलांनीं पुन्हा प्रश्न केला. मुलगा म्हणाला, 'तें तेथें आपोआप आलें.' वकील गंभीर मुद्रा करून म्हणाला, 'हें चित्र आपोआप इथें कसें येईल?' तेव्हां मुलगा हंसून म्हणाला, 'जशी ही सृष्टि आपोआप निर्माण झाली तसें!'

ह्या सृष्टीचा उत्पन्नकर्ता कोणी तरी आहे हें लहान मुलाला देखील जर कळतें तर त्याची जाणीव कृतज्ञतेनें आपण ठेवणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय? म्हणूनच त्याचें नामस्मरण करण्याचा मार्ग संतांनीं सांगितला. 'नाम घेतां वायां गेला। ऐसा कोणी ऐकला–नाहीं ॥' साधुसंत ह्या पृथ्वीवर जे अवतरले, त्यांना काय कोणी बोलावणें पाठवलें होतें? ते आपण होऊन आले! जगाच्या उद्धाराची त्यांना तळमळ होती म्हणून ते अवतीर्ण झाले. ज्ञानोबा, तुकोबा आणि आतां आमचे गाडगेबाबा! तुकोबांच्या वाणीसारखीच बाबांची वाणी अगदीं साधी आणि सोपी आहे. परंतु 'एक एक बोल वेदशास्त्रापरिस खोल।' अशी मौज आहे. गाडगेबाबा आहेत म्हणून आज गरिबांच्या दुःखाला वाचा फुटते आहे. गाडगेबाबांवांचून 'गरिबांचा वाली कुणी न्हाई रे!' संस्कृतभाषेच्या कपाटांतून कड्याकुलुपांत ठेवलेलें तत्त्वज्ञान ज्ञानोबांनीं–तुकोबांनीं फोडून बाहेर आणलें. 'फोडिलें भांडार। धन्याचा हा माल॥ मी तव हमाल। भारवाही॥' तुकोबांनीं बाहेर काढलेला हा माल आज गाडगेबाबा सर्व जनतेला मुक्त हस्तांनीं वांटीत आहेत. त्याचें कार्य अमर आहे.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

हिंसा करूं नका, मुलांमुलींना शिक्षण द्या, असें गाडगेबाबा आज इतकीं वर्षें तळमळून सांगताहेत. आपल्या मुलाची हजामत न्हावी करायला लागला तर त्याचा वस्तरा मुलाच्या डोक्याला एवढासा सुद्धां लागूं नये म्हणून आपण किती जपतों! अन् बकऱ्याचें मुंडकें कापीत असतांना आपल्याला यत्किंचित् सुद्धां यातना होत नाहींत, याला काय म्हणावें?

पैसा असो नसो, घरांत जागा असो नसो, एकामागून एक मुलें आई-बापांना होतच असतात. घरांत पोरवडा झाला म्हणजे कोणालाच धड खायला मिळत नाहीं किंवा अंगावर कपडा घालायला मिळत नाहीं. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा॥'

पण असा पुत्र कसा होणार? शिक्षणावांचून पुत्र गुंडा होणें अशक्य आहे. राजकारणाकडे आपण लोक जादा लक्ष देतों. आपण शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावयास हवें. तुम्ही म्हणाल, शिक्षणाला पैसा लागतो. तो पैसा कोठून आणावयाचा? मी तो उपाय सांगतों. तुम्ही दहा वर्षें आपलीं व्यसनें सोडा. चहा पिऊं नका. विडी, तंबाखू, पानपट्टी, हीं सर्व सोडूना द्या. मग बघा तुमच्याजवळ पैसा जमतो कीं नाहीं तें. सर्व पैसा तुम्ही आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं खर्च करा. गाडगेबाबा गेलीं पन्नास वर्षें गरिबांना घसा फोडून हेंच सांगताहेत. म्हणूनच मी म्हणतों कीं, बाबांखेरीज 'गरिबांचा वाली कुणि न्हाई रे॥'

अशा तऱ्हेनें आपल्या अत्यंत गोड आणि रसाळ वाणीनें एक तासभर तो प्रचण्ड श्रोतृसमुदाय कैकाडीबाबांनीं मंत्रमुग्ध करून ठेवला होता. गाडगेबाबांच्या खालोखाल जनतेमध्यें कैकाडीबाबांना कां मान आहे त्याचें प्रत्यंतर त्या कीर्तनामध्यें मला पहावयाला आणि ऐकावयाला मिळालें!

नवयुग : २७-१२-१९५३

# श्रीगाडगेबाबांची कीर्तन-गंगा !

कैकाडी महाराजांचे शिष्य श्रीनामानंद महाराज ह्यांचें त्यानंतर सुबोध कीर्तन झाल्यावर गाडगेबाबांनीं मला 'दोन हिताच्या गोष्टी' बोलावयास सांगितलें. मी म्हणालों, 'महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. येथें दुसरें कांहीं पिकत नसेल पण संतांची वाणी मात्र अमाप पिकते. संतांची परंपरा महाराष्ट्रांत अखंडित चालू आहे. त्यांनीं महाराष्ट्रांत भक्तांचें महान् मंदिर उभारलें.

'संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । रचियलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । त्यानें केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥'

ह्या भागवतधर्माचा पाया ज्ञानोबांनीं घातला आणि तुकोबा त्याचे कळस झाले. आमचे गाडगेबाबा त्या कळसावरची पताका आहेत. लोकोद्धाराचा

जो मार्ग ज्ञानोबा आणि तुकोबांनीं सांगितला त्याच मार्गानें आज विनोबा आणि गाडगेबाबा जनतेला नेत आहेत. ज्या इंद्रायणी नदीच्या कांठावर आज बाबांचें कीर्तन येथें होत आहे ती इंद्रायणी नदी धन्य आहे. कारण त्या इंद्रायणी नदीनें आपल्या डोळ्यांनीं विनोबाहि पाहिले आहेत आणि आज गाडगेबाबाहि पहात आहे.

ज्ञानोबांना जाऊन सातशें वर्षें होत आलीं. पण अजून त्यांची वाणी आपल्या कानांत घुमते आहे. एवढेंच नव्हे तर ती समाजाच्या सर्वांत खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोंचली आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीच्या दर्शनासाठीं आज महाराष्ट्रांतले लक्षावधि शेतकरी येथें आलेले आहेत. ज्यांना लिहितां येत नाहीं, ज्यांना वाचतां येत नाहीं, त्यांनीं ज्ञानोबांच्या नांवाचा गजर महाराष्ट्रांत जिवंत ठेवला आहे.

पुणें शहर येथून आठ मैलांवर आहे. विद्वानांची ती पेठ आहे. विद्यांचें तें पीठ आहे. पण त्यांपैकीं एखाद्या-दुसऱ्या तरी 'विद्वाना'ला ज्ञानोबांची आज आठवण असेल कीं नाहीं ह्याची शंका आहे. उलट, ते तिकडे वाद घालीत असतील—, ज्ञानेश्वर एक आहेत का दोन आहेत ?

गाडगेबाबा आज मला येथें घेऊन आले म्हणून हा सोहोळा पहाण्याचें भाग्य मला लाभलें. ज्ञानोबांपासून ते गाडगेबाबांपर्यंत सर्व संतांचें म्हणणें एक आहे. देव हा देवळांत नाहीं, दगडांत नाहीं, माणसांत आहे. ज्ञानोबांनीं सांगितलें, 'जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत॥' पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, माणसांतला परमेश्वर लोकांना दिसत नाहीं. त्यांना दगडांतलाच परमेश्वर दिसतो. त्यामुळें ह्या जगाचा अधःपात झालेला आहे. माणसांची उपेक्षा आणि धोंड्यांची पूजा हा या जगाचा धर्म होऊन बसला आहे. दगडाधोंड्यांत आणि तीर्थांत काय आहे ? तीर्थीं धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनीं॥ लोकांना खायला नाहीं आणि दगडाधोंड्याच्या देवापुढें अन्नाच्या राशी ओतल्या जात आहेत. लोकांजवळ पैसा नाहीं. पण देवाच्या समोर मात्र दक्षणेचे ढीग पडत आहेत. ही देवाची आणि धर्माची विटंबना होय.

'भूतांची दया हें भांडवल संता। आपुली ममता नाहीं देहीं॥'

प्राणिमात्रावर दया करणें हाच धर्म ! 'तुका म्हणणें सुख । पराचिया सुखें ॥' दुसऱ्याच्या दुःखानें ज्याच्या हृदयाला यातना होतात, ज्याच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाझर वाहतात आणि दुसऱ्यांना सुखी करण्यांतच ज्यांना परमसुखाची प्राप्ति होते ते खरे संत. तेच खरे साधु आणि तेच 'भगवंताची मूर्ति !' संतांनीं लोकांचीं दुःखें दूर करावीं आणि त्यांना सुखी करावें; आणि इतरांनीं मात्र स्वस्थ बसावें, असें थोडेंच आहे ? संतांचा मार्ग हा सर्वांचाच मार्ग आहे. आज जे राज्य करताहेत त्यांचासुद्धां तोच मार्ग आहे.

स्वातंत्र्य मिळून आज सहासात वर्षें झालीं. पण लोक सुखी नाहींत. उलट, लोकांचें दुःख दिवसेंदिवस वाढतच आहे. अज्ञान, दारिद्र्य आणि दुष्काळ ह्यांनीं स्वातंत्र्याचें वाटोळें केलें आहे. देशांतील लक्षावधि अडाणी आणि गरीब जनतेबद्दल आजच्या राज्यकर्त्यांना यत्किंचितहि दया वाटत नाहीं. संतांनीं समतेचा आणि ममतेचा मार्ग सांगितला. पण त्या मार्गावर आजच्या राज्यकर्त्यांचा विश्वास नाहीं. सर्व तऱ्हेच्या विषमतेनें आजचा समाज हैराण होऊन गेला आहे. कोणालाहि कोणाबद्दल प्रेम वाटेनासें झालें आहे. अशा परिस्थितींत संतांनीं सांगितलेल्या मार्गानें जाण्याखेरीज दुसरा काय उपाय आहे ?

आजच सकाळीं गाडगेबाबा मला म्हणाले, हा हिंदुस्थान देश फक्त साधूंच्या पुढें वांकतो—इतरांच्या पुढें नाहीं. बाबांचें म्हणणें खरें आहे. वीरांना, विद्वानांना आणि मुत्सद्यांना हा देश मान देत असेल पण तो आपलें डोकें ठेवतो फक्त साधूंच्या आणि संतांच्याच पायावर. ह्याचा अर्थच हा कीं, ह्या देशांत क्रांति घडवून आणण्याचें जर कोणांत खरोखर सामर्थ्य असेल तर तें साधूंत आणि संतांमध्यें. ह्या देशांतील एक प्रचंड क्रान्ति महात्मा गांधींनीं घडवून आणली. आतां उरलेली क्रांति घडवून आणण्याचें कार्यसुद्धां तशाच योग्यतेचा कोणीतरी साधुपुरुष करूं शकेल ! विनोबा आणि गाडगेबाबा हेंच समतेचें क्रांतिकार्य ममतेच्या मार्गानें घडवून आणण्याचा आज प्रयत्न करीत आहेत. त्यांच्याच मागून जाण्यांत आपणां सर्वांचें कल्याण आहे !'

त्यानंतर गाडगेबाबा कीर्तनाला उभे राहिले. ते म्हणाले, 'परदेशांतून ह्या

देशांत मारवाडी आले, गुजराथी आले. कोंकणांतून ब्राह्मण घाटावर आले. त्यांनीं बरोबर कांहीं आणलें नाहीं. फक्त बुद्धि आणि कर्तृत्व. पण त्या गोष्टींच्या जोरावर त्यांनीं लाखों रुपये मिळवले. पैशाचा चिखल केला. ब्राह्मणांनीं विद्या मिळवली, अधिकार मिळवले. अन् तुम्ही आहांत तिथेंच आहांत! एखाद्या शेटजीकडे रुपयाची मोड मागायला जा. तो म्हणेल, 'मजजवळ मोड नाहीं. शंभर रुपयांची नोट आहे. सो सो रुपयेकी एकेक नोट! त्यानंतर तुम्ही एखाद्या पवाराकडे किंवा जाधवाकडे जा. अन् विचारा, 'पावलीची मोड देतोस का?' तो म्हणेल, 'आतां नाहीं, उद्यां या.'

अरे, अरे, काय ही तुमची स्थिति! असा तुमचा बाणा खराब कां झाला? असे तुम्ही दरिद्रीनारायण कां झालेत? ह्याचें कारण, एकहि विद्या तुमच्याजवळ नाहीं. विद्या नाहीं तो खटाऱ्याचा बैल. तुम्हांला विद्या माहीत नाहीं, देव मालूम नाहीं. तुम्ही बनलांत कसाबाचे गुरु! तुम्ही बैल कसाबांना विकतां ना? 'गाय कसाबासी देती। त्यांच्या संसाराची माती ॥' तुमचे शेत पेरणारा तो बैल. त्याचा तुम्ही किती छळ करतां रे? त्याला वेसण काय घालतां, अर्धपोटीं ठेवून त्याला उन्हांत अन् थंडींत कामें काय करायला लावतां, त्याच्या पाठीवर अन् डोक्यावर आसुडाचे फटके काय मारतां! अन् शेवटीं तो म्हातारा झाला म्हणजे त्याला कसाबाला विकून टाकतां!

अरे, अरे, अरे, केवढी मोठी पापाची पाटी शेतकऱ्याच्या डोक्यावर आहे! बैल नसला तर शेतकऱ्याला अठरा धान्यें कशीं पिकवितां येणार? जो शेतकरी दयाळू असेल त्यानें आपल्या बैलाला शिरापुरी खायला द्यायला पाहिजे. लग्नाच्या समारंभांत पाहुण्यांना तुपांत पक्वान्नें तळून वाढतां ना? आग्रह करकरून करकरून त्याला पोटभर जेवूं घालतां ना? अन् मग बैलाचा कां असा छळ करतां बरें? त्यामुळें तुम्हां मराठ्यांचें कधीं कल्याण होणार नाहीं. 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला ॥'

लोक म्हणतात, चला काशीला, चला जगन्नाथाला, चला रामेश्वराला. तीर्थांच्या ठिकाणीं पुण्य भेटतें, गंगेंत स्नान केल्यानें पाप जातें, अशी सर्वांची समजूत आहे. काय सांगावें अशा लोकांना? गंगेंत स्नान केलें तर माणूस

फार झालें तर स्वच्छ होईल. पण त्याचें पाप कसें जाईल ? शिक्षा भोगली तरच पाप जातें. गंगेंत सारख्या बुडया मारीत बसाल तर आजारी पडाल, हिंवताप येईल अन् शेवटीं तुमचा जीव जाईल. पण तुमचें पाप मात्र कदापि जाणार नाहीं. मग तुम्ही कुठेंहि जा. काशीला जा, गयेला जा नाहीं तर प्रयागाला जा.

तीर्थ म्हणजे नदीचें पाणी आणि दगडाचा देव. 'तीर्थक्षेत्रा गेले। दाढी-मिशी बोडुनी आले ॥ पाप तसेंच राहिलें। दाढीमिशीनें काय केलें ॥' तीर्थाला जाऊन दाढीमिशी तेवढी बोडून याल. पण तुमचें पाप मात्र आहे असेंच शिल्लक राहील. तीर्थक्षेत्राला जाणें हा धर्म नव्हे. कबीरानें म्हटलें आहे 'सबसे बडी दया।' दया हा सर्वांत मोठा धर्म आहे. बैलाच्या श्रमावर अन् गाईच्या दुधावर शेतकरी जगतो. त्या बैलाला अन् गाईला कसाबाला विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडांत तापलेलें डांबर पडेल !

मघाशीं अत्रेसाहेब म्हणाले कीं, 'मी गरिबांचा वाली आहें.' म्हणजे काय ? तर मी शेतकऱ्यांचा वाली आहें. मला हंसूं येतें. तुम्ही गरीब ? अरे, तुम्ही कसले गरीब ? कोंबड्या, बकरीं, पक्षी, मासे, हे खरे गरीब. त्या गरिबांचा कोण वाली आहे ? तुमच्या पोटांत दया नाहीं, पाप आहे. तुम्ही रे कसले गरीब ? घरांत बकरें पाळतां. त्याला चारा देतां कीं नाहीं ? पाणी पाजतां कीं नाहीं ? हरवलें तर त्याला शोधून आणतां कीं नाहीं ? पावसानें भिजत असलें तर त्यांला पांघरूण घालतां कीं नाहीं ? अगदीं स्वतःच्या मुला-सारखें त्या बकऱ्याला सांभाळतां अन् एक दिवस मात्र त्याचा गळा चरचर कापून टाकतां ! तुमच्या पिढ्यान् पिढ्या मरतील. तुमचें कधीं कल्याण होणार नाहीं हें पक्कें समजून असा. 'गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥'

भांडवलवाले सावकार माणसाला लुटतात खरे पण तुम्ही डोळे मिटून त्यांच्या कचाट्यांत जातां तेव्हां. तुम्ही सावध राहिलांत तर तुम्हांला कोण लुटील ? तुम्ही सावकारावर फिर्याद करूं शकतां पण जनावरांचें तसें नाहीं. तुम्ही बकऱ्याचा पाय तोडला तर त्यानें कोणाकडे फिर्याद करावी ? त्याला बोलतांहि येत नाहीं. त्याची फिर्याद कोण ऐकणार ? तुम्ही हरिण खातां, सशाला मारतां, घोरपडीचा निकाल लावतां, कोंबड्या कापतां, मासे तळतां, झिंगे खातां. खातां

का नाहीं? (सारे 'हो' म्हणतात.) हो म्हणायला तुम्हांला लाजहि वाटत नाहीं! दुसऱ्याला कापून खाण्यापेक्षां जगांत अधिक कोणतें पाप आहे?

आळंदी, पंढरपूर, काशी, बद्रीनाथ या क्षेत्रांना जाण्यामध्यें पुण्य नाहीं. दुसऱ्या जीवाचें रक्षण करणें हें सर्वांत मोठें पुण्य! तुम्ही म्हणाल, कसाब जनावरें कापतो अन् आम्ही तीं खातों. पण कापतो तोहि कसाब अन् खातो तोहि कसाबच. इथें आळंदीला येऊन तुम्ही 'ग्यानबा-तुकाराम'च्या नांवाचा गजर करतां अन् घरीं जाऊन कोंबड्या खातां. तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं? दगडाला देव समजून तुम्ही त्याची पूजा करतां. तुमचें कसें कल्याण होईल?

त्या मारवाड्याच्या घरांत जा. त्याच्या बायकोच्या ट्रंका नि पेट्या भरलेल्या आहेत. तिच्या अंगावर पायापासून डोक्यापर्यंत हिऱ्याचे न् सोन्याचे दागिने लादले आहेत. रोज तुपांतल्या पुऱ्या करून ते खातात. आतां तुमच्या बायका बघा. अंगावर ना धड वस्त्र ना फुटका मणि! अन् दिसतात कशा? तर जशा मातीमधून उकरून काढल्या आहेत! बकऱ्यांच्या पोरांना कापून जे खातात त्यांची अशी दशा होते. मारवाड्याचें तोंड कसें असतें? लाल भडक! नाहीं तर तुमचीं तोंडें बघा. कशीं दिसतात? तर भाजलेल्या मिरच्यांसारखीं. मारवाडी प्राण गेला तरी मांस किंवा हाड तोंडांत टाकणार नाहीं. अन् तुमच्यापुढें बासुंदी, श्रीखंड आणून ठेवलें तरी तुमचें लक्ष बोंबलांवर!

'श्वानासी दिलें पक्वान्न-भोजन। परी त्याचें मन हाडावरी॥' अशी तुमची स्थिति आहे. तुमच्या घरीं तुमचा बाप मेला. त्याला तुम्ही नदीवर जाळून आलांत. त्याचीं हाडें न् राख नदीच्या पाण्यांत टाकलीत अन् मग बापाच्या नांवानें त्या भटजीला हो पलंग कशाला देतां? त्या पलंगावर काय तुमचा बाप येऊन निजणार आहे? तुमच्या बापाची राख जाऊन पडली नदींत. अन् तुम्ही दिलेल्या पलंगावर पाय ताणून डाराडूर झोपतो आहे तो भटजी अन् त्याची बायको.

एक गोष्ट सांगतों. एकदां एक बोका होता. तो उंदीर खाऊन माजला होता. पुढें आला दुष्काळ. शेतांत धान्य दिसेना, मग उंदीर कोठून सांपडणार? तेव्हां उंदीर पकडण्याची बोक्यानें युक्ति काढली. त्यानें साधूची

दीक्षा घेतली. तो डोळे न् तोंड मिटून रस्त्याच्या कडेला अगदीं गपचिप बसे. त्यामुळें उंदरांत जिकडेतिकडे कुजबूज उठली कीं, बोका साधु झाला. रोज निरनिराळ्या बातम्या उठूं लागल्या. बोका आज पंढरपूरला गेला. बोक्यानें आज तमक्या ठिकाणीं धर्मावर लेक्चर दिलें. एक दिवस बोक्याचें कीर्तन आहे असें जाहीर झालें. सारे उंदीर म्हणाले, आपण कीर्तनाला जाऊं! एक म्हातारा उंदीर होता. तो म्हणाला, 'तुम्ही कोणी नका येऊं. मी आज बघून येतों.' बोक्याला वाटलें कीं, कीर्तनाला सारे उंदीर येतील. पण कोणी आलें नाहीं. फक्त हा म्हातारा उंदीर आला. पण तो लांब अंतरावर एका बिळाच्या तोंडांत बसला. बोका म्हणाला, 'अरे तिकडे काय बसलाहेस ? इकडे ये.' उंदीर म्हणाला, 'नको. मी इथूनच कीर्तन ऐकतों.' अशी त्या म्हाताऱ्या उंदरानें त्या बोक्याची फजिती केली.

समाजांत असे अनेक बोके आहेत. त्यांच्यापासून आपण आपलें शहाणपणानें रक्षण केलें पाहिजे. घरट्यांत पांखरांचीं पिलें असतात. त्यांना दगड मारला तर पांखरूं का तुमच्यावर फिर्याद करणार आहे ? पाळण्यांतल्या तुमच्या पोराचा मी पाय कापला तर ? तर सारें गांव माझ्या अंगावर धांवेल अन् धोपटून धोपटून मला ठार मारील. लहानपणीं आम्हांला आमच्या वडिलांनीं शिकविलें नाहीं. त्यामुळें आमची ही दशा झाली. तुकोबांच्या-मुळें आम्हांला तोंड उघडतां आलें अन् कीर्तन करण्याची अक्कल आली. तुम्ही आपल्या पोरांना शिकवा बरें. नाहींतर बूट पॉलिश करीत रस्तोरस्तीं त्यांना हिंडावें लागेल.

डॉक्टर आंबेडकर ह्यांच्याकडे पहा म्हणजे विद्येचें फळ काय मिळतें तें तुम्हांला कळेल. त्यांच्या पूर्वजांच्या हातांत झाडू न् खराटा होता. आंबेडकर शिकले. सर्व डिगऱ्या त्यांनीं मिळवल्या. अन् झाडूवाल्याच्या कुळांतला मुलगा देशाचा कायदेमंत्री झाला. शेतकरी हा शेताचा मालक. सर्व धान्याचा तो धनी. पण शिक्षण नसल्यामुळें त्याची आज ही स्थिति झाली आहे. 'अटरा धान्यें ज्याच्या घरीं। कळण्या कोंड्यानें पोट भरी ॥' माळी, मराठे, कुणबी ह्यांच्या घरीं पिठल्याला तेल मिळायचें नाहीं, हळद

मिळायची नाहीं. नुसतें पांढरें फटक.

मारवाडी, ब्राह्मण, गुजराती रात्रीचें अन्न दिवसा खात नाहींत. अन् तुम्ही तीनतीन चारचार दिवसांचें शिळें अन्न खातां. ह्याचें कारण तुम्ही सणासमारंभाला वाटेल तसा पैसा खर्च करतां. अन् त्यासाठीं सावकाराचें कर्ज काढतां. म्हणून मी सांगतों कीं, भरल्या दिवाळीच्या दिवशीं फटकूर नेसा पण कर्ज काढून कोरे कपडे अंगावर घालूं नका. चटणीभाकर खा पण कर्ज काढून लाडूकरंज्या खाऊं नका. कर्ज काढून लग्न करूं नका. कर्ज काढून घर बांधूं नका. कर्ज काढून जमीन घेऊं नका. कर्ज काढून तीर्थाला जाऊं नका. सग्यासोयऱ्यांना कांहीं देऊं नका. कर्जापेक्षां मरण बरें.

कर्ज आहे त्याचा संसार नकटा ! ज्याला कर्ज नाहीं तो पडक्या घरांत राहात असला तरी तो साऱ्या हिंदुस्थानचा बादशहा आहे. 'तुका म्हणे कोंबड्याचे परी । पुढेंच उकरी लाभ नाहीं ॥' म्हसोबाची न् मरीआईची पूजा करतां. मारवाडी लोक तुमच्या देवाला धुत्या हातांनीं सुद्धां नमस्कार करीत नाहींत. गांवांतलीं कुत्रीं तुमच्या देवावर राजरोस तंगड्या वर करून मुततात ! अशा दगडाधोंड्यांच्या नादीं लागूं नका. त्यांना बळी देऊं नका. त्यांना नवस करूं नका. बोला 'गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥'

बाबांचें कीर्तन केव्हां संपलें कळलेंच नाहीं. श्रोते डोक्यावर हात उभारून टाळ्या वाजवण्यांत आणि भजन करण्यांत तल्लीन झाले होते. इतक्यांत पटकन् बाबा खालीं बसले अन् कुठें तरी बेपत्ता झाले. बाबांच्या कांहीं शिष्यांनीं त्यानंतर 'पुरावे' दिले. अर्ध्या तासानंतर तोहि कार्यक्रम संपला. रात्रींचा एकाचा सुमार होता. इंद्रायणीच्या कांठावर थंडीचा कोण कडाका पडला होता ! हजारों शेतकरी स्त्रीपुरुष श्रोते अंधारांत बसल्या जागींच कलंडले अन् झोपीं गेले. त्यामध्येंच कुठें तरी बाबा गुपचुप जाऊन झोंपले. त्यांना कुठें शोधीत बसावयाचें ? म्हणून अंधारांत झोंपीं गेलेल्या त्या प्रचंड जनसमुदायाला नमस्कार करून मी पुण्याकडे परतलों.

नवयुग : ३-१-१९५४

# विनोबांची गीताई नि प्रवचनें

भारतीय जीवनावर 'गीते'चा फारच मोठा प्रभाव आहे. तरीहि पण मराठी मनाला तिचें सर्वांत जास्त आकर्षण आहे. मराठी भाषेंत आजपर्यंत गीतेसंबंधीं विपुल लिहिलें गेलें आहे. 'ज्ञानेश्वरी' हा तर अमृताचा डोहच आहे. सहासातशें वर्षें जाणते आणि नेणते तिच्यांत डुंबून कृतार्थ होत आहेत. पण ज्ञानोबांनंतर 'गीते' वर अत्यंत मधुर आणि हृदयस्पर्शी असें लिखाण जर मराठी भाषेंत कोणी केलें असेल तर तें आमच्या विनोबांनीं.

गीतेबद्दल त्यांना काय वाटतें हें त्यांच्याच शब्दांत सांगतों. ते म्हणतात, 'गीतेचा आणि माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझें शरीर आईच्या दुधावर पोसलें. त्यापेक्षांहि माझें हृदय व बुद्धि ह्यांचें गीतेच्या दुधावर अधिक पोषण झालें आहे. तर्काला छाटून श्रद्धा व प्रयोग ह्या पंखांनीं मी गीतेच्या गगनांत यथाशक्ति भराऱ्या मारीत असतों. मी प्रायः गीतेच्याच वातावरणांत असतों. गीता म्हणजे माझें प्राणतत्त्व. गीतेविषयीं मी इतरांशीं कधीं बोलतों, तेव्हां गीतेच्या समुद्रावर तरंगत असतों. आणि एकटा असतों

त्या वेळेस त्या अमृतसमुद्रांत खोल दडी मारून बसतों.' गीतेसंबंधीं विनोबा बोलूं वा लिहूं लागले म्हणजे काव्याच्या धारा त्यांच्या मुखामधून उचंबळूं लागतात. 'गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता। पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी॥'

विनोबा हे स्वतः विलक्षण प्रतिभेचे कवि आहेत. ते सदैव काव्यच बोलत असतात. हें वाचून महाराष्ट्रांतल्या पुष्कळशा शब्दजुळव्या 'कवीं'ना धक्काच बसेल. ह्या अलौकिक प्रतिभेच्या सामर्थ्यावरच ते भगवद्गीता मराठी भाषेंत आणूं शकले. तीच त्यांची 'गीताई.' गीताई हा मराठी साहित्यांतला एक मोठा चमत्कार आहे. गीताई ही ईश्वरानें आपल्या हातून घडवलेली सर्वोत्तम सेवा आहे अशी विनोबांची श्रद्धा आहे. आपण 'कृतिशून्य' आहोंत असा स्वतःला ते उगाच बोल लावतात. 'प्रेरणा परमात्म्याची महात्म्याची प्रसन्नता। वाणी संतकृपेची ही विन्याची कृतिशून्यता॥' कारण 'गीताई' ही तर विनोबांची अमर कृति आहे. 'ज्ञानेश्वरी' प्रमाणेंच ती आतां सहस्रावधि लोकांच्या जीवनामधली एक नित्याचें समाधान होऊन बसली आहे. गीताई लिहिण्याच्या मागची भूमिका अशी होती :

गीतेमध्यें सर्वोत्तम, आध्यात्मिक आणि व्यावहारिक मार्गदर्शन आहे अशी विनोबांची श्रद्धा आहे. कर्मयोग आणि प्रेमयोग, ध्यानयोग आणि ज्ञानयोग, बुद्धियोग आणि शुद्धियोग हे गीतेनें सारे एकाच जीवनसूत्रांत ओवून टाकलेले आहेत असें त्यांना वाटे. गीतेच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचा यत्न करीत गेल्यानें अपार शांति मिळते असा त्यांना अनुभव येत गेला. म्हणून सर्वसामान्य जनतेची निष्ठा गीतेवर स्थिर व्हावी ह्या तळमळीनें त्यांनीं गीता मराठीमध्यें आणावयाचें ठरविलें.

तीस एकतीस सालीं एका विशिष्ट मानसिक योगावस्थेंत त्यांनीं 'गीताई'ची रचना केली. बत्तीस सालीं ती प्रथम प्रसिद्ध झाली. तेव्हांपासून आजतागायत 'गीताई'च्या कमींत कमी तरी तीन सव्वातीन लाख प्रती खपल्या असल्या पाहिजेत. गीताईची रचना इतकी सोपी, रसाळ आणि प्रासादिक आहे कीं, ती वाचतांवाचतांच तिच्यांतला भावार्थ मनामध्यें आपोआप

उमलूं लागतो. मूळ संस्कृतांत त्या श्लोकांचा बोध जाणत्यांनाच होतो. पण अर्थाचें आकलन करून घ्यावयास पदोपदीं थांबावें लागतें. ही अडचण गीताईच्या बाबतींत भासत नाहीं. अर्थ चटकन् ध्यानांत येतो आणि चिंतनाची प्रक्रिया लगेच चालू होते.

गीता वाचावयाची म्हणजे कांहीं शब्द वाचावयाचे नाहींत, किंवा सुरामध्यें तिचें पठन करावयाचें नाहीं. दैनंदिन गीता वाचणारे पुष्कळ लोक अंधश्रद्ध असतात. गीतेचे चारदोन श्लोक किंवा एखादा अध्याय घडाघडा वाचला कीं आपण एक मोठें पुण्यकृत्य केलें, असें त्यांना वाटतें. गीता हा कांहीं केवळ वाचनाचा विषय नाहीं. तें एक चिंतनाचें साधन आहे. विनोबांनींच स्वतः सांगितलें आहे, 'गीतेवर माझी जरी अनन्यश्रद्धा बसली आहे तरी तीहि मी गौणच समजतों. आत्मचिंतनाची कड गांठायला शब्दहि बाजूस सारावा लागतो. देहाच्या साधनानें जसें देहनिरसन करावयाचें तसेंच हें आहे. गीता म्हणते म्हणून प्रमाण असें नव्हे. वस्तु स्वयंप्रमाण आहे आणि तिनेंच गीतेलाहि प्रेरणा दिली आहे. ह्या गोष्टीचा विसर न होतां गीतेची मदत घ्यावी. शेवटीं सारेंच फेकून द्यावयाचें आहे आणि ओझें तर कशाचेंच केव्हांहि उचलावयाचें नाहीं !' गीतेकडे पाहाण्याची ही विलक्षण जिवंत दृष्टि विनोबांखेरीज दुसऱ्या कोणी दिली असें आम्हांला वाटत नाहीं.

आम्ही स्वतः संस्कृत जाणणारे आहोंत. अधूनमधून गीता कित्येक वर्षें तरी वाचीत आलों आहोंत. लोकमान्य टिळकांच्या 'गीता-रहस्या'चीं कित्येकदां तरी आम्ही पारायणें केलीं. गीतेचा अर्थ आम्हांला उमगला; पण तिची गोडी अशी कधींच लागली नाहीं. ती आम्हांला विनोबांमुळें लागली. विनोबांमुळें आम्ही गीता वाचतांना मिटक्या मारूं लागलों.

विनोबा नुसतेच तत्त्वज्ञानी आणि विद्वान नाहींत. ते रसिक आहेत. रूक्षपणा हा ह्या देशांतील विद्वत्तेला मिळालेला फार मोठा शाप आहे. विनोबा हे एकच त्या नियमाचे उज्ज्वल अपवाद आहेत. विनोबांनीं एके

ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'कोणत्याहि ग्रंथाचा सारासार विचार करावा. गीता हा एकच असा ग्रंथ आहे कीं, त्यांतलें कांहींच टाकावेंसें वाटत नाहीं.' हेंच नेमकें विनोबांच्या लिखाणाविषयीं आम्हाला करावेंसें वाटतें. विनोबांचें कांहींएक टाकावेंसें वाटत नाहीं. त्यांनीं लिहिलेलें प्रत्येक अक्षर घटाघटा प्यावें असें आम्हांला वाटतें.

विनोबा हे चटकन् कळतात, आणि सरळ डोक्यांत आणि हृदयांत जाऊन भिनतात. हा त्यांच्या बोलण्याचा किंवा लिहिण्याचा विलक्षण गुण आहे. त्यांच्याइतका सुंदर आणि सुबोध मराठी लिहिणारा लेखक मराठी भाषेंत दुसरा आढळणार नाहीं. वस्तुतः हा लौकिक साने गुरुजींचा आहे. पण विनोबा हे साने गुरुजींचे गुरुजी आहेत, हें ध्यानीं धरावें. विनोबा हे मराठी भाषेंतले 'सूत्रकार' आहेत. कमींत कमी शब्दांत जास्तींत जास्त अर्थ कसा ठासून भरावा हें कौशल्य आज तरी निदान फक्त त्यांच्याचजवळ आहे.

आम्ही सांगतों हें कित्येकांना अतिशयोक्तीचें वाटेल म्हणून त्यांना आम्ही विनोबांचीं 'गीताप्रवचनें' वाचण्याची शिफारस करतों. गीताई ही जर अमृताची पुष्करिणी असेल तर 'गीताप्रवचनें' हें त्या पुष्करिणीमधलें हजार धारांचें एक सोन्याचें कारंजें आहे. त्याच्या सौंदर्याचें आणि माधुर्याचें वर्णन करतांना आमचे शब्द तोकडे पडतात. 'गीताप्रवचनां'ची तुलना जर करावयाचीच झाली तर ती फक्त 'ज्ञानेश्वरी'शींच होऊं शकेल. गीतेचें असें हृदयस्पर्शी रसग्रहण कोणत्याहि भारतीय भाषेंत आजपर्यंत कोणीं केलें नसेल.

बत्तीस सालीं विनोबा धुळ्याच्या तुरुंगांत होते. त्यांच्याबरोबर अनेक राजकीय कार्यकर्तेहि त्याच ठिकाणीं कैदी होते. त्यांनीं इच्छा दर्शविल्यावरून दर रविवारीं एक अशीं विनोबांनीं गीतेवर अठरा प्रवचनें दिलीं. सुदैवानें तीं टिपून घ्यावयास साने गुरुजींसारखा सिद्धहस्त 'लेखकू' लाभला. विनोबा बोलणार आणि साने गुरुजी टिपून घेणार. मग विचारसौंदर्याला आणि भाषामाधुर्याला किती अमर्याद बहर आला असला पाहिजे त्याची कल्पना 'गीता-प्रवचनें' वाचल्याखेरीज कशी येणार ? ह्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति

प्रजासत्ताक दिनाच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध झालेली आहे. ह्या पुस्तकाचीं आजपर्यंत आम्ही स्वतः दहापंधरा वेळां तरी पारायणें केलीं असतील. इतका आनंद आणि समाधान आजपर्यंत आम्हांला कोणत्याहि एका पुस्तकाच्या वाचनानें मिळालेलें नाहीं. ह्या पुस्तकाचें कोणतेंहि पान उघडावें अन् कोणत्याहि ओळीपासून वाचायला सुरुवात करावी.

**दीपा नाहीं पाठींपोटीं अंधकार**
**सर्वांगें साखर अवघी गोड ।**

अशी विलक्षण माधुरी या प्रवचनांमधल्या प्रत्येक शब्दामध्यें भरलेली आहे. ज्यांना वाङ्मय काय हें माहीत नाहीं, ज्यांना वाचनाची विशेष गोडी नाहीं, ज्यांनीं उभ्या हयातींत जीवनाचा कधीं विचार केला नाहीं, अशा आमच्या माहितीच्या अनेक माणसांना आम्ही ह्या पुस्तकाची शिफारस केली. तीं माणसें 'गीताप्रवचनें' वाचून अक्षरशः वेडीं झालीं आहेत. हें पुस्तक आतां हातांतून सोडायला किंवा दुसरें पुस्तक हातांत धरायला तीं मुळीं तयारच नाहींत. आम्ही म्हणतों हें खरें का खोटें हें ज्यांना पडताळून पहावयाचें असेल त्यांनीं एकवार हें पुस्तक वाचूनच पहावें. पक्वान्नाची गोडी शब्दांनीं काय वर्णन करावी ? तें चाखूनच पाहिलें पाहिजे.

'गीताप्रवचनें' हें नांव 'गीताई' इतकें सोपें नाहीं. 'प्रवचनें' म्हटल्या-नंतर त्याचें तात्त्विक आणि क्लिष्ट स्वरूपच डोळ्यांपुढें उभें राहतें. आपल्या-कडचें बहुतेक आध्यात्मिक वाङ्मय हें बुद्धीला कष्ट देणारें आहे आणि पुष्कळसें निरर्थकहि आहे. आजपर्यंत लोक तें कसें वाचीत आले ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें. विनोबा हे अंतर्बाह्य शिक्षक आहेत. महान शिक्षक आहेत. शिक्षकाची आधुनिक व्याख्या ही आहे कीं, मुलें शिकतील अशा रीतीनें जो त्यांना शिकवितो तो शिक्षक. पुष्कळसे शिक्षक म्हणतात, 'आम्ही मुलांना शिकविलें !' हो, तुम्ही मुलांना शिकविलेंत, पण तीं शिकलीं का ? देण्याची क्रिया जशी घेण्यावांचून पूर्ण होत नाहीं त्याप्रमाणें शिकल्यावांचून शिक-विण्याची क्रिया पूर्ण होत नाहीं. श्रोत्यांनीं किंवा वाचकांनीं शिकावें हा

एकच हेतु मनांत बाळगून विनोबा सारें लिहितात किंवा बोलतात. त्यामुळें त्यांचें एकहि अक्षर कधीं वायां जात नाहीं. तत्त्वज्ञानी विनोबा मोठे आहेत का कवि विनोबा मोठे आहेत का शिक्षक विनोबा मोठे आहेत हा 'गीताप्रवचनें' वाचतांना वाक्यावाक्याला संभ्रम पडतो. त्यांच्या प्रतिभेचे हे तीन पैलू एकमेकावर मात करण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात. त्यामुळें 'गीताप्रवचनें' वाचतांना आपण एखादी गोष्ट वाचतों आहोंत का कादंबरी वाचतों आहोंत असें वाटतें.

व्यवहारांतले नित्याच्या परिचयाचे इतके साधेसाधे दृष्टान्त विनोबा देतात कीं कितीहि कठीण मुद्दा असो, त्याचे पदर उलगडून तो आपोआप तुमच्यापुढें मोकळा होतो. 'गीते'च्या प्रारंभीं युद्ध हें मुळांतच पाप आहे असें अर्जुनाला एकदम कां वाटलें? त्याचें उत्तर देतांना विनोबांनीं एका न्यायाधीशाची गोष्ट सांगितली आहे. शेंकडों अपराध्यांना त्यानें फांशीची शिक्षा दिली होती. पण एक दिवस त्याचा स्वतःचा मुलगा खुनी म्हणून जेव्हां त्याच्यासमोर उभा राहिला तेव्हां तो न्यायाधीश बुद्धिवादाची भाषा बोलूं लागला कीं, 'फांशीची शिक्षा अमानुष आहे. ती रद्द केली पाहिजे.' मुलाबद्दलच्या ममत्वामुळें न्यायाधीश असें बोलूं लागला. युद्धाविरुद्ध अर्जुनानें केलेला सर्व युक्तिवाद हा मोहामधून निर्माण झालेला प्रज्ञावादच होता. अर्जुनाचा धर्म क्षात्र होता. तो युद्धप्रवृत्तच होता. पण त्याला आपल्या क्षात्रधर्मापेक्षां संन्यासधर्म श्रेष्ठ वाटूं लागला. तथापि दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ वाटला तरी तो स्वीकारण्यांत आपलें कल्याण नसतें असें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें.

त्याबद्दल विनोबा म्हणतात, 'सूर्याचा प्रकाश मला प्रिय आहे. त्या प्रकाशानें माझी वाढ होते. सूर्य मला वंद्यहि आहे. पण म्हणून मी पृथ्वीवरचें वास्तव्य सोडून त्याच्याजवळ जाऊं पाहीन तर जळून जाईन. सूर्याचें तेज सहन करण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें नाहीं, तोंपर्यंत सूर्यापासून दूर पृथ्वीवर राहूनच मी माझा विकास करून घेतला पाहिजे. माशाला जर कोणी म्हणेल, 'पाण्यापेक्षां दूध मौल्यवान आहे, दुधांत रहा.' तर मासा

तें कबूल करील का ? मासा पाण्यांतच वांचेल. दुधांत मरेल. दुसऱ्याचा धर्म सोपा वाटला म्हणूनहि तो स्वीकारावयाचा नसतो. बायकामुलांचें नीट रक्षण करतां येत नाहीं म्हणून कंटाळून का संन्यासी व्हायचें ? तें ढोंग होईल अन् तें जड जाईल. संधि सांपडतांच त्याच्या वासना जोर करतील. संसाराचें ओझें झेंपत नाहीं म्हणून वनांत जाणारा आधीं तेथें लहानशी झोपडी बांधील. मग तिच्या रक्षणासाठीं तो कुंपण करील. असें करतां करतां त्याला तेथें सवाई संसार उभा करावा लागेल. ज्याची जी खरी वृत्ति तो त्याचा धर्म !'

विनोबांनीं एका खासगी पत्रांत असें लिहिलें आहे कीं, 'मी कोण ? कोऽहं ? ह्या प्रश्नाच्या उत्तरावर स्वकर्तव्य निश्चित होतें. लक्ष्मणानें आपल्याला हाच प्रश्न विचारला. कोऽहम् ? त्याला उत्तर मिळालें 'रामबंधुरहम्.' तो दशरथाचा मुलगा होता. ऊर्मिलेचा पति होता. अनेकांचा अनेक होता. पण त्याचें अंतस्थ उत्तर 'मी रामाचा भाऊ आहें' असें होतें. 'मी दशरथाचा पुत्र आहें' असें त्याचें उत्तर असतें तर तो रामाबरोबर वनांत गेला नसता.'

अर्जुनाला आपण कोण आहोंत ह्याचा भ्रम पडला. क्षात्रधर्मापेक्षां त्याला संन्यासधर्मच श्रेष्ठ वाटला. आतां कोणी जर अशी शंका काढील कीं खरें पहातां जर संन्यासधर्म हा क्षात्रधर्मापेक्षां श्रेष्ठ आहे तर मग भगवंतांनीं अर्जुनाला संन्यासी कां बनविलें नाहीं ? त्याला विनोबांनीं मोठें समर्पक उत्तर दिलें आहे. परमेश्वर हा मोकळीक देणारा आहे. ज्यानें त्यानें स्वतःच धडपड करावी. त्यांतच गोडी आहे. लहान मुलाला स्वतः चित्र काढण्यांत आनंद असतो. त्याचा हात धरलेला त्याला आवडत नाहीं. शिक्षक जर मुलांना भराभर गणितें सोडवून देऊं लागला तर मुलांची बुद्धि कशी वाढणार ? अर्जुनाच्या मनांतला मोह दूर करून त्याला त्याच्या कर्तव्याचें स्मरण करून देण्यासाठीं म्हणून भगवंतांनीं 'गीता' सांगितली. म्हणूनच गीता सांगून झाल्यावर त्यांनीं लगेच विचारलें, 'अर्जुना, गेला मोह ?' अर्जुन म्हणाला, 'होय देवा. मोह गेला. स्वधर्म समजला.' व्यासांनीं 'महाभारत' लिहिलें

तें देखील ह्याच हेतूनें. 'लोकांच्या मनावरील मोहावरण घालविण्यासाठीं मी हा इतिहासप्रदीप पेटवीत आहें' असें त्यांनीं प्रारंभीं सांगितलें आहे. कितीहि कठीण विचार असो वा गहन तत्त्व असो. त्याच्या नाडीवर किंवा गाभ्यावर नेमकें बोट ठेवण्याचें कौशल्य फक्त विनोबांमध्येंच आहे.

अध्यात्मविषयावर लिहिणारे बहुतेक विद्वान् नेहमीं ठराविक रीतीनें लिहितात. स्वतंत्र प्रज्ञेचा त्यांच्याजवळ अभाव असतो. त्याला विनोबा हे एक ठळक अपवाद आहेत. विनोबांचा प्रत्येक विचार हा स्वतंत्र असतो. पूर्वी आपण तो कुठेंहि ऐकलेला नसतो. नावीन्य हें त्यांच्या व्यक्तित्वांत आमूलाग्र भरलेलें आहे. प्रत्येक गोष्टीकडे ते आपल्याला नवीन दृष्टीनें पहावयास शिकवितात. ह्याचें कारण कोणत्याहि विचाराच्या तळाशीं जाण्याचें सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेंत आहे.

गीतेच्या चवथ्या अध्यायांतील कर्म आणि विकर्म ह्या कल्पना विनोबांनीं किती हृदयंगम शब्दांत समजावून सांगितल्या आहेत बरें? 'कर्माबरोबर मनाचा मेळ बसला पाहिजे. म्हणजे तें कर्म निराळेंच होतें. तेल व वात ह्यांच्या जोडीला ज्योत आली म्हणजे प्रकाश पडतो. दारूला बत्ती लावली कीं स्फोट होतो. त्या दारूंत शक्ति निर्माण होते. कर्म ही वस्तु ह्या बंदुकीच्या दारूसारखी आहे. कर्म हें ज्ञानाचें पेटवण आहे. एखाद लांकडाचा ओंडका पडलेला असतो. परंतु त्या लांकडाला पेटवा. तो धगधगीत निखारा होतो. तें लांकूड व तो अग्नि ह्यांत केवढा फरक! परंतु, त्या लांकडाचाच तो अग्नि असतो. कर्मांत विकर्म ओतलें कीं कर्म दिव्य दिसूं लागतें. आई मुलाच्या पाठीवरून हात फिरविते. एक पाठ व त्या पाठीवरून एक वेडावांकडा हात फिरला. परंतु त्या साध्या कर्मानें त्या मायलेकरांच्या मनांत ज्या भावना उचंबळल्या, त्यांचें वर्णन कोण करूं शकेल? हात फिरविण्याची क्षुद्र क्रिया. पण त्या क्रियेंत आईचें हृदय ओतलेलें आहे.

तुळशीरामायणांत एक प्रसंग आहे. राक्षसाशीं लढून जखमी झालेल्या वानरांकडे प्रभु रामचंद्रानें नुसतें प्रेमपूर्वक पाहिलें. त्याबरोबर वानरांच्या

वेदना नाहींशा झाल्या. आई मुलांना मारते म्हणून तुम्ही मारून पहा बरें! तुमचें मारणें मुलगा सहन करणार नाहीं. आईनें मारलें तरी तिच्या पदरांतच तो तोंड खुपशील. कारण आईच्या बाह्यकर्मांत चित्तशुद्धि आहे. तिचें तें मारणें निष्काम आहे. आंतरिक विकर्मामुळें रामाचें तें पाहणें केवळ सुधासागर होतें. विनोबांच्या हृदयंगम शैलीचा हा एक प्रातिनिधिक नमुना आहे.

ध्यानयोगांतील चित्ताच्या एकाग्रतेची विनोबांनीं एक फारच सुंदर गोष्ट सांगितली आहे. एका मुसलमान साधूच्या अंगांत बाण रुतला. त्या बाणामुळें त्याला फार वेदना होत होत्या. बाण काढायला जावें तर हात लावतांच जास्तच वेदना होत. अशा रीतीनें तो बाण काढतां सुद्धां येईना. त्या वेळी गुंगीचें औषध नव्हतें. मोठा प्रश्न पडला. त्या साधूची एका माणसाला माहिती होती. तो म्हणाला, 'बाण काढणें तूर्त राहूं द्या. हा साधु प्रार्थनेस बसला म्हणजे मग तो बाण काढा.' सायंकाळीं प्रार्थनेची वेळ झाली. साधु प्रार्थनेस बसला. एका क्षणांत त्याच्या चित्ताची एवढी एकाग्रता झाली कीं, तो बाण त्याच्या शरिरांतून काढला तरी त्याला त्याचें भानहि नव्हतें. केवढी ही एकाग्रता?

अडाणी माणसाची सुद्धां भावना किती महत्त्वाची आहे हें समजावून सांगतांना विनोबांनीं एक गोष्ट सांगितली आहे. यमुनेच्या पुलावरून आगगाडी जात असतांना एका भाविकानें नदींत दिडकी टाकली. शेजारीं एक गृहस्थ होते. ते विनोबांना म्हणाले, 'आधींच देश दरिद्री. अन् त्यांत हे लोक असे व्यर्थ पैसे दवडतात.' विनोबा त्यांना म्हणाले, 'तुम्ही त्या माणसाचा हेतु नाहीं ओळखलात. ज्या भावनेनें ती दिडकी त्यानें फेकली त्या भावनेची किंमत दोनचार पैसे तरी होईल कीं नाहीं? नदी म्हणजे ईश्वराची जणुं करुणा वाहून राहिली आहे असें मनांत येऊन जर त्या भाविकाच्या मनांत त्यागाची भावना उत्पन्न झाली तर त्या भावनेला तुमच्या अर्थशास्त्रांत कांहीं स्थान आहे का? देशांतील एक नदी पाहून त्याचें अंतःकरण द्रवलें. ही भावना तुम्हास समजेल तर मग मी तुमच्या देशभक्तीची

पारख करीन. देशभक्ति म्हणजे का भाकर? देशांतील महान् नदी पाहून सारी संपत्ति तिच्यांत बुडवूं दे, तिच्या चरणीं अर्पूं दे, असें मनांत येणें ही केवढी देशभक्ति! परमेश्वराच्या पायापुढें ही सारी धूळ तुच्छ आहे.

तुम्ही म्हणाल, नदीचा न् परमेश्वराचा काय संबंध? नदी म्हणजे ऑक्सिजन् अन् हैड्रोजन. सूर्य म्हणजे किटसन बत्तीचा एक मोठा प्रकार. त्याला काय नमस्कार करावयाचा? नमस्कार फक्त तुमच्या भाकरीलाच! मग त्या भाकरींत तरी काय आहे? ती भाकरी म्हणजे तरी एक पांढरी मातीच. तिच्यासाठीं कां मिटक्या मारतां? एवढा सूर्य उगवला. अशी ही सुंदर नदी दिसली. तेथें परमेश्वरी अनुभव यावयाचा नाहीं तर कुठें यावयाचा?'

दहाव्या अध्यायाच्या प्रवचनांत तर विनोबांच्या प्रतिभेला असा कांहीं बहर आलेला आहे म्हणतां! सृष्टींत परमेश्वर भरून राहिला आहे याचीं उदाहरणें देतांना विनोबांच्या मुखांतून काव्याचा धबधबा बाहेर पडला आहे. सबंध मराठी वाङ्मयांत असें रमणीय गद्य काव्य कुठेंहि आढळणार नाहीं. त्यामधले किती किती उतारे म्हणून द्यावेत? हा एकच नमुना पहाः 'आणि तो घोडा! किती उमदा, किती प्रामाणिक, किती स्वामीनिष्ठ! अरब लोकांचें घोड्यावर किती प्रेम! ती त्या अरबाची गोष्ट तुम्हांला आहे ना माहीत? तो अडचणींत सांपडलेला अरब सौदागरास घोडा विकण्यास तयार होतो. हातांत मोहरांची थैली घेऊन तो तबेल्यांत जातो. परंतु घोड्याच्या त्या गंभीर, प्रेमळ डोळ्यांकडे त्याची नजर जाते. मग तो ती थैली फेकतो व म्हणतो, 'जीव गेला तरी हा घोडा मी विकणार नाहीं. माझें काय व्हायचें तें होईल. नाहीं जेवायला मिळालें तर नाहीं. परमात्मा पाहून घेईल.'

पाठीवर थाप मारतांच घोडा कसा प्रेमानें फुरफुरतो! कशी त्याची ती आयाळ! खरोखरच घोड्यांत अमोल गुण आहेत. त्या सायकलींत काय आहे? घोड्याचा खरारा करा. तो तुमच्यासाठीं मरेल. तो तुमचा मित्र होईल. माझा एक मित्र घोड्यावर बसावयास शिकत होता. घोडा त्याला पाडी. तो मजकडे येऊन म्हणाला, 'घोडा पाठीवर बसूंच देत नाहीं.' मी त्याला म्हटलें, 'तुम्ही घोड्यावर फक्त बसावयास जातां, परंतु त्याची सेवा करतां

का? सेवा दुसऱ्यांनीं करावयाची आणि तुम्ही पाठीवर बसावयाचें, हें कसें जमेल? तुम्ही स्वतः त्याला दाणापाणी द्या, त्याचा खरारा करा आणि मग बसा.' तो मित्र तसें करूं लागला. कांहीं दिवसांनीं तो मजकडे येऊन म्हणाला, 'आतां घोडा पाडीत नाहीं.'

घोडा हा परमेश्वर आहे. तो भक्ताला कां पाडील? त्याची भक्ति पाहून घोडा नमला. हा भक्त आहे का तिऱ्हाईत आहे हें घोडा पाहतो. भगवान् श्रीकृष्ण स्वतः खरारा करावयाचे व पीतांबरांतून चंदी चारावयाचे. टेकडी आली, नाला आला, चिखल आला कीं सायकल अडली. परंतु घोडा उड्या मारीत जातो. सुंदर प्रेमळ घोडा म्हणजे परमेश्वराची मूर्ति. राम व वानर दोस्त झाले, ह्यांतच खरोखर रामाचें रामत्व व रमणीयत्व आहे. रामानें वानरांच्या ठिकाणचा परमात्मा पाहिला. त्यांच्याशीं प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही गोडी सोडाल तर गोडी गमावाल. पितापुत्रांचे, मायलेकरांचे संबंध अन्यत्रहि दिसतील. परंतु नरावानराची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणांत आहे. वानरांच्या ठिकाणचा देव रामायणानें पचनीं पाडला.' ही दृष्टि विनोबांखेरीज दुसऱ्या कोणाला असणार?

सृष्टीबद्दल लहान मुलाला जें हें कौतुक वाटतें त्यावर सारी इसापनीति उभारलेली आहे. इसापाला सर्वत्र ईश्वर दिसत होता. इसापाच्या राज्यांत दोन हातांचा, दोन पायांचा हा मनुष्यप्राणीच तेवढा नाहीं. तेथें कोल्हेकुत्रे, ससेलांडगे, कावळे–कासवें, सारे आहेत. सारे बोलतात, सारे हंसतात, एक प्रचण्ड संमेलनच आहे तें. इसापाशीं सारी चराचर सृष्टि बोलत आहे. हा विचार विनोबांखेरीज दुसऱ्या कोणाला सुचणार? अभिनव विचारांनीं आणि माधुर्यपूर्ण भाषेनें सारीं 'प्रवचनें' अगदीं फुलून गेलीं आहेत.

अठराव्या अध्यायाच्या अखेरीस भगवंतांनीं अर्जुनाला आधीं विचार-स्वातंत्र्य देऊन मागाहून तें काढून घेतलें आणि 'मला शरण ये,' असें सांगितलें. आतां 'मी' हा विचारच नको. सारें 'तूं' असें व्हावें,' असें भगवान् म्हणाले. त्यावेळीं विनोबांनीं एका जुन्या दृष्टान्ताची आठवण

करून दिली आहे. बकरें जिवंत असतांना, 'में–में–में' करीत असतें. म्हणतें मी–मी–मी. पण तें मरून त्याची तात पिंजणाला लावली कीं, तें म्हणतें, 'तुहि–तुहि–तुहि!' तूंच–तूंच–तूंच-तुहि–तुहि–तुहि! विनोबांच्या लेखनाबद्दल काय लिहावें अन् काय बोलावें! विनोबांचीं 'गीताप्रवचनें' हा विचारामृतानें तुडुंब भरलेला एक सुवर्णकलशच होय.

नवयुग : ७-२-१९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळ
अनुक्रम 29355 वि: निबंध
क्रमांक 13७5 नों: दि: 30/

# मी बदललों आहें काय ?

पुष्कळांना असें वाटतें कीं, सध्यां आम्ही बदलण्याच्या मार्गावर आहोंत. कारण अलीकडे आमच्या भाषणांत आणि लेखनांत आम्ही विनोबांचा नि गाडगेबाबांचा अनेकदां उल्लेख करतों. त्यांच्या संबंधानें वारंवार लिहितों. परवां एक गृहस्थ आम्हांला संतोषानें म्हणाले, 'हें सध्यांचें तुमचें परिवर्तन मला तरी फार आवडलें. माझी पहिल्यापासून कल्पना होतीच कीं, असा कांहीं तरी बदल तुमच्यांत होणारच होणार!' एकजण म्हणाला, 'तुम्ही आतां जाहीरपणें कीर्तन करायचेंच काय तें बाकी उरलें आहे.' एक गृहस्थ कुत्सित स्वरांत म्हणाले, 'करून करून भागलांत अन् आतां तुम्ही देवपूजेला लागलांत!' तेव्हां आम्ही त्यांना तेथल्या तेथेंच उत्तर देऊन टाकलें कीं, 'मी दुसरीकडे काय वाटेल तें केलें असेन! पण तुम्हांला तर कांहीं केलें नाहीं ना?' तेव्हां तो माणूस मान खालीं घालून मुकाट्यानें निघून गेला.

ह्या सर्व गोष्टींचा निष्कर्ष हा कीं, माणसें शब्दानें फसतात. साधुसंतांचीं नांवें घेतलीं किंवा त्यांच्या वचनांचा उच्चार केला म्हणजे काय कुठें माणूस

साधु किंवा संत होतो? इतकें सोपें का आहे तें? आमच्या अलीकडच्या लिखाणावरून आमच्या मनांत वैराग्य उत्पन्न झालें आहे किंवा आमचें लक्ष अध्यात्माकडे वळलें आहे अशी जर कोणाची समजूत झाली असेल तर ती साफ चूक आहे. पण त्याहीपेक्षां विनोबा किंवा गाडगेबाबा हे वैराग्याचा किंवा अध्यात्माचा प्रचार करणारे संत आहेत असा ज्यांचा कुणाचा समज झाला असेल तो त्यांनीं आपल्या डोक्यांतून आधीं काढून टाकावा.

जीवनाचा अत्यंत वास्तववादी आणि व्यवहारी दृष्टीनें विचार करणारे हे दोघेहि महान् सत्पुरुष आहेत. अन्यायमूलक अशा अनंत भेदांनीं आणि विषमतेनें शतकानुशतकें गांजलेल्या ह्या देशांत ममतेच्या मार्गानें समता प्रस्थापित झाल्यावांचून येथील जनतेचें कल्याण होणें अशक्य आहे, असें या दोघांहि महापुरुषांना वाटतें. ह्याच देहीं आणि याच डोळां सर्वांना मोक्षाचा लाभ व्हावा अशी ह्या दोन्हीहि कर्मयोग्यांना तळमळ लागून राहिलेली आहे. साधुसंत म्हटले म्हणजे सर्वसामान्य लोकांची ह्या देशामधली समजूत अशी आहे कीं, ते संसारासंबंधीं आपल्या मनामध्यें विरक्ति उत्पन्न करतात आणि पारलौकिक मोक्षाच्या वाटेचा आपणास मार्ग दाखवितात. असल्या प्रकारचे हे दोघे संत नाहींत. त्यांना स्वतःचा संसार नाहीं हें खरें; पण त्याचें कारण राष्ट्राचा संसार त्यांनीं आपला केलेला आहे. तुकोबा म्हणतात,

**मुक्तिपांग नाहीं विष्णूचिया दासा। संसार तो कैसा न देखती ॥**
**बैसला गोविंद जडोनियां चित्तीं। आदि तेचि अंतीं अवसानीं ॥**
**भोग नारायणा देऊनी निराळी। ओवियां मंगळीं तोचि गाती ॥**
**बळबुद्धि त्यांची उपकारासाठीं। अमृत तें पोटीं सांठविलें ॥**
**दयावंत तरी देवाच सारिखी। आपुलीं पारखीं नोळखती ॥**
**तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव। वैकुंठ तो ठाव वसती ते ॥**

ह्या सत्पुरुषांना स्वतःचा संसार नाहीं. सर्व भोग त्यांनीं नारायणाला अर्पण करून, स्वतःच्या बळाचा नि बुद्धीचा उपयोग ते लोककल्याणासाठीं करीत आहेत. त्यांच्या हृदयांत प्रेमाचें अमृत तुडुंब भरलें आहे. हें माझें न् तें

ग्रं. क्र. ११४८०

दुसऱ्याचें ही भावनाच त्यांच्यापाशीं नाहीं. ते देवस्वरूप आहेत. त्यांचें वास्तव्य जेथें असतें तोच वैकुंठ. कर्मसंन्यासी म्हणजे कर्मत्यागी नव्हे, असें विनोबांनीं बजावून सांगितलें आहे. उलट, जो सर्वांपेक्षां जास्त कर्म करतो तो कर्मसंन्यासी! जनतेच्या जीवनांत जास्तींत जास्त आसक्त होणें ह्याचें नांव वैराग्य. ह्या दोघां महापुरुषांचें वैराग्य आणि संन्यास अशा तऱ्हेचीं आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणें म्हणजे कांहीं 'करून करून भागल्यानंतर देवपूजेला लागणें' नव्हे. आम्ही समतावादी आहोंत. मानवतावादी आहोंत. समतेचें आणि मानवतेचें अत्यंत उदात्त आणि उज्ज्वल दर्शन आम्हांला ह्या दोघांच्या विचारांत आणि आचारांत आढळतें. म्हणून आम्हांला त्यांच्याबद्दल अतीव आदर वाटतो. दुसरें कांहीं नाहीं.

जगांत दोन तऱ्हेचे संत आहेत. एक कुटुंब–संत आणि दुसरे समाज–संत. सर्वसामान्य माणसांना अनेक वैयक्तिक आणि कौटुंबिक दुःखें असतात. कुणाचें लग्न होत नाहीं, कुणाला मुलें होत नाहींत, कुणाला नोकरी मिळत नाहीं. कुणाला अगणित धनाची हाव असते. कुणाला असाध्य व्याधी जडलेल्या असतात. कुणाच्या घरांत अकस्मात् आजार उद्भवतो. कुणाचे प्रियजन एकाएकीं निधन पावतात. आपल्या सर्व मनःकामना तृप्त व्हाव्यात असें कित्येकांना वाटतें तर कोणतेंहि संकट आपल्यावर कधीं येऊं नये असें कांहींना वाटतें. वास्तववादी जगांत या सर्व उणीवा आणि दुःखें एकदम दूर करण्याचा कांहींहि उपाय आढळत नाहीं. म्हणूनच चमत्काराच्या मार्गावर माणसांची सहजच श्रद्धा जडते. हें चमत्काराचें सामर्थ्य कांहीं पुरुषांच्या अंगीं असतें असें कित्येकांना वाटतें. त्यांना तसा अनुभव येतो असें म्हणतात. म्हणून असे लोक त्या त्या सत्पुरुषाच्या भोंवतीं जमा होतात. त्या सत्पुरुषाचे फोटो ते आपल्या घरांत लावतात. त्यांची ते पूजा करतात. त्यांच्या प्रतिमेच्या माळा किंवा आंगठ्या ते अंगावर धारण करतात. त्यांचे अंगारे ते कपाळाला लावतात. गंडे हातांत बांधतात. अशा चमत्काराच्या दैवी मार्गानें जे माणसांचीं वैयक्तिक वा कौटुंबिक दुःखें दूर करतात त्यांना आम्ही 'कुटुंबसंत' म्हणतों.

गाडगेबाबा हे अशा प्रकारचे दैवी चमत्कार करणारे संत नव्हत, असें आम्ही त्रिवार सांगतों. गाडगेबाबा डोक्यावर खापर ठेवतात. अंगांत चिंध्या घालतात. म्हणून ते कोणीतरी अद्भुत शक्तीचे अवलिया आहेत, असें पुष्कळांना वाटणें साहजिकच आहे. आम्हांला असें सांगणारेहि लोक भेटले आहेत कीं, 'गाडगेबाबा आमच्या घरीं आल्यापासून आम्हांला व्यापारांत फायदा होऊं लागला!' किंवा 'गाडगेबाबांच्या हातांतल्या काठीचा आम्हांला तडाखा बसला, त्या दिवशींच आमच्या पगारांत बढती झाली!' पण असें बोलणें हें त्या लोकांचें अज्ञान होय. ती गाडगेबाबांची विटंबना होय. गाडगेबाबा हे निर्मळ 'समाज-संत' आहेत. त्यांच्या डोक्यावरचें खापर आणि अंगावरच्या चिंध्या हें कांहीं चमत्काराचें भांडवल नाहीं. दरिद्र-नारायणाची सेवा करण्याचा तो त्यांचा गणवेश होय. गाडगेबाबांचा आणि चमत्कारांचा काडीमात्र संबंध नाहीं. आम्ही गाडगेबाबांच्या मागें लागलों म्हणजे मोठे 'भाविक आणि श्रद्धाळू' झालों किंवा चमत्काराच्या मार्गावर आमचा विश्वास जडला अशी कांहीं लोकांनीं जर आपली समजूत करून घेतली असेल तर ती बरोबर नाहीं. गंडे, दोरे, अंगारे, जपजाप्य, पूजा किंवा मंत्र ह्या मार्गावर आमचा काडीमात्र विश्वास नाहीं. ज्यांचा विश्वास असेल त्यांचा असो.

आम्ही शंभर टक्के बुद्धिवादी आहोंत. स्वतःच्या बुद्धीशीं द्रोह करून केवळ चमत्कारावर आंधळेपणानें श्रद्धा ठेवण्याची सध्यां जी प्रचण्ड लाट आपल्या समाजांत उसळली आहे, तें एक सामाजिक संकट आहे असें आम्हांस वाटतें. चांगले शहाणेसुरते आणि शिकलेसंवरलेले लोक अंधश्रद्ध होत चाललेले पाहून तर आम्हांस विशेषच दुःख होतें. वैयक्तिक दुःखें चमत्कारानें दूर होऊं शकतात असें ज्यांना वाटतें त्यांना सामाजिक दुःखें तशाच चमत्कारांनीं दूर व्हावींत ह्याची तळमळ वाटत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अमक्या अमक्या बुवानें मुठींतून बुक्का काढला किंवा खडीसाखर काढली असें कांहीं लोक मोठ्या आश्चर्यानें सांगतात. पण त्याबरोबर त्या लोकांच्या

डोक्यांत विचार येत नाहीं कीं, आज ह्या राष्ट्रांत अनेक जीवनवस्तूंची टंचाई असतांना हे 'महात्मे' आपल्या चमत्काराच्या सामर्थ्यावर त्या त्या वस्तू निर्माण न करतां केवळ चिमूटभर बुक्का किंवा खडीसाखरेचा लहानसा खडा निर्माण करण्यांत आपल्या महान् शक्तीचा कां निष्कारण व्यय करतात? 'कुटुंब-संतां'चें हें एक वैशिष्ट्य आहे कीं, केवळ त्यांची जे भक्ति करतात त्यांनाच ते प्रसन्न होतात, इतरांना नाहीं.

एका सत्पुरुषाची गोष्ट अशी सांगतात कीं, त्याच्या दर्शनाला आलेल्या एका व्यापाऱ्याला 'तूं अमक्या अमक्या दिवशीं आगगाडीनें जाऊं नकोस' असें त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें तो व्यापारी गेला नाहीं. त्यामुळें त्याचा प्राण वांचला. कारण त्या दिवशीं आगगाडीला अपघात होऊन दोनशें माणसें मेलीं. आमचें ह्याच्यावर असें म्हणणें आहे कीं, जर आगगाडीचा अपघात होऊन त्यांत दोनशें माणसें मरणार हें ह्या महापुरुषाला आधींपासून ठाऊक होतें तर त्यांनीं त्या दोनशें माणसांचा प्राण न वांचवतां केवळ आपल्याच भक्ताचा प्राण कां वांचवला? त्या सत्पुरुषाच्या मोठेपणाचा हा पुरावा नसून तें आम्हांला त्याचें लांछन वाटतें. विनोबा किंवा गाडगेबाबा ह्यांच्यासारख्या 'समाज-संतां'चा मार्ग हा सर्वांच्या कल्याणाचा मार्ग आहे. मग कोणाचा त्यांच्यावर विश्वास असो वा नसो. कोणी त्यांची भक्ति करो वा न करो!

सर्वसामान्य माणसांच्या देवासंबंधीं आणि धर्मासंबंधीं फार गैरसमजुती आहेत. ह्यामुळें जगाचें फार मोठें नुकसान झालेलें आहे. गाडगेबाबांचे ह्यासंबंधींचे विचार समजून घेण्यासारखे आहेत. कोणत्याहि देवळांत बाबा कधीं पाय टाकीत नाहींत. कोणत्याहि देवाचें ते दर्शन घेत नाहींत. कोणत्याहि तीर्थांत ते आंघोळ करीत नाहींत. दगडाधोंड्यांच्या मूर्तीची पूजा करणें हें पाप आहे, असें त्यांना वाटतें. मूर्तिपूजेचे ते मुसलमानांपेक्षांहि कट्टर विरोधक आहेत. तीर्थक्षेत्राला जाऊं नका, यात्रा करूं नका, देवाला कशाचाहि नैवेद्य दाखवूं नका, देवापुढें पैसा ठेवूं नका, असें ते जीव तोडून सांगत असतात. तीर्थांत आंघोळ केल्यानें किंवा क्षेत्राला गेल्यानें पुण्य

संपादन होतें असें जे सांगतात ते धर्माचा काळाबाजार करतात, असें ते स्वच्छ म्हणतात. मानवधर्मापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि धर्माला बाबा मानीत नाहींत. ते विचारतात, 'जगांत सूर्य एक आहे. आभाळ एक आहे. जमीन एक आहे. पाणी एक आहे. वायु एक आहे. मग धर्म कां हो दहा?'

प्रश्न बिनतोड आहे. हें जग निर्माण करणारा ईश्वर एक आहे—आणि सर्व त्याचीं लेकरें आहेत. ईश्वराचें कृतज्ञ बुद्धीनें स्मरण करावें आणि प्रत्येकानें आपलें स्वतःचें आणि समाजाचें कल्याण करावें इतकें त्यांचें सोपें तत्त्वज्ञान आहे. ईश्वर हा आपल्या शरिराबाहेर राहात नाहीं हा त्यांच्या या सिद्धान्ताचा गाभा आहे. पूर्वीच्या साधुसंतांचेंहि तेंच मत होतें. तुकोबा म्हणतात,

**'देहीं असोनिया देव। वृथा फिरतो निर्दैव॥**
**देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं॥**
**नाभीं मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरीं॥**
**साखरेचें मूळ ऊंस। तैसा देहीं देव वास॥**
**दुधीं असतां नवनीत। नेणें तयाचें मथित॥**
**तुका सांगे मूढजना। देहीं देव कां पहा ना॥'**

गाडगेबाबा अक्षरशः हेंच सांगतात. समर्थ रामदासांचा तसाच पुरावा आहे.

**'देव जवळीं अंतरीं भेटी नाहीं जन्मवेरी।**
**मूर्ति त्रैलोक्यीं संचली दृष्टि विश्वाची चुकली॥**
**भाग्यें आले संतजन झालें देवांचें दर्शन।**
**रामदासीं योग झाला देहीं देव प्रकटला॥**

बीजांत ज्याप्रमाणें झाड असतें किंवा झाडांतून ज्याप्रमाणें बीज प्रकट होतें, त्याप्रमाणें आपणांत ईश्वर आहे आणि ईश्वरांत आपण आहोंत. 'एकीं एक सामावलें.' उदकावर तरंग उठावेत तसे ईश्वरी सामर्थ्यांतून निर्माण झालेले प्राणिमात्र हे सर्व तरंग आहेत. तरंगांत आणि उदकांत काय फरक?'

'तुका म्हणे होती तुझी माझी एक ज्योती ॥' आपण ईश्वरमय आहोंत असा साक्षात्कार होणें ही जगांतली सर्वांत मोठी धर्मभावना आहे. आपल्या शरिराच्या बाहेर ईश्वर आहे अशी समजूत करून घेऊन जे त्याच्यामागें धांवतात ते जगांतले सर्वांत मोठे नास्तिक होत. कोणीहि देवाच्या मागें लागूं नये. देव आपणाला दिसेल अशी कोणीहि आशा धरूं नये. आम्हांला देव दिसला किंवा देवाचा साक्षात्कार झाला असें जे सांगतात त्यांच्यावर कदापि विश्वास ठेवूं नये. देव आपल्यापेक्षां निराळा थोडाच आहे म्हणून तो आपल्या दृष्टीला दिसणार आहे? आणि तो निराळा आहे असें क्षणभर मानलें तरी तो पहाण्याचें सामर्थ्य आपणामध्यें कोठून असणार? दुपारच्या सूर्याकडे आपल्याला बघवत नाहीं मग हजारों सूर्य नि चंद्र निर्माण करणाऱ्याकडे आपण कसे बघणार? बुबुळांची राख होऊन जाईल. विनोबा म्हणतात, 'माणसानें विश्वरूप बघण्याच्या भानगडींत पडूं नये. स्व-रूप पहावें.'

आपला देह हेंच देवाचें पवित्र मंदिर आहे ही भावना प्रत्येकानें आपल्या मनांत बाळगावी. हा देह स्वच्छ ठेवावा. ह्या देहांतील देवापुढें सदैव ज्ञानाची उपासना चालू ठेवावी. दया आणि प्रेम हीं फुलें या देवावर नेहेमीं उधळावींत. सद्विचारांचा आणि सद्भावनेचा गंध नि धूप ह्या मंदिरांत सदैव दरवळत ठेवावा. अशा तऱ्हेनें प्रत्येक प्राणिमात्रानें आपल्या देहाचीं मंदिरें अंतर्बाह्य स्वच्छ, सुंदर आणि पवित्र ठेवलीं म्हणजेच देवाचें राज्य ह्या पृथ्वीवर अवतरलें असें म्हणतां येईल! तुकोबा म्हणतातः

**सकळ चिंतामणी शरीर**
**जरी जाय अहंकार आशा समूळ**
**निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धी**
**निर्मळ स्फटिक जैसा.**
**मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी**
**येती तयापासी अवघीं जनें**

तीर्थांसी तीर्थ झाला तोचि एक
मोक्ष तेणें दर्शनें.
मन शुद्ध तया काय करिती माळा
मंडित सकळा भूषणांसी
हरिच्या गुणें गर्जताती सदा
आनंद तया मानसीं
तन मन धन दिलें पुरुषोत्तमा
आशा नाहीं कवणाची
तुका म्हणे तो परिसाहून आगळा
काय महिमा वर्णूं त्याचा ?

जो आपलें मन आणि शरीर शुद्ध करूं शकतो त्याचें पावित्र्य काय वर्णन करावें ? मग हें करण्यासाठीं तीर्थयात्रा आणि देवाच्या देवळामध्यें जाण्याचें काय कारण आहे ? देवाच्या मूर्तीपुढें तासन् तास डोळे मिटून आणि नाक दाबून बसण्यांत काय अर्थ आहे ? आज जगांत सर्वत्र अधर्माचा फैलाव झालेला आहे. देवाच्या नि धर्माच्या सत्यस्वरूपाचें आकलन न झाल्यामुळें लक्षावधि लोक आपल्या पैशांचा, श्रमांचा नि काळाचा अपव्यय करीत आहेत. शाळा किंवा इस्पितळें बांधण्याऐवजीं जो उंच उंच कळसाचीं देवळें बांधत सुटतो त्याच्यासारखा अधार्मिक कोण असेल बरें ? सर्व साधनांचा आणि संपत्तीचा संचय स्वतःपाशीं करून जगांत दारिद्य आणि विषमता निर्माण करणाऱ्यापेक्षां जास्त पापी आणि अधम कोण असेल ? मानवाची जो उपेक्षा करतो तो धर्मच होऊं शकणार नाहीं. मानवधर्म हाच खरा देवधर्म. मानवतेवर प्रेम करणें आणि मानवतेची सेवा करणें हाच त्या धर्माचा आचार. आजच्या काळांत विनोबा आणि गाडगेबाबा हे त्या मानवधर्माचे महान् उद्गाते होत ! त्यांचें माहात्म्य आम्हांला उमगलें हें आमचें भाग्य. आमच्यांत जर कांहीं बदल झाला असेल तर तो एवढाच आहे !

नवयुग : १०-१-१९५४

## साहित्य नि सेवा ह्यांची फाळणी नको †

साहित्याचें शिक्षण घ्यावयास आपण येथें जमलांत, फार चांगली गोष्ट आहे. माझ्या लहानपणीं अशी सोय नव्हती. आम्ही आमच्याच प्रेरणेनें आणि प्रयत्नानें साहित्याचा अभ्यास केला. पण एखादी गोष्ट मुद्दाम शिकविल्यानें ती शिकली जात नाहीं असा माझा अनुभव आहे. शाळेंत आणि कॉलेजांत मीं जें शिकलों त्याचा मला आयुष्यांत कांहीं उपयोग झाला नाहीं. मी कवि झालों, नाटककार झालों, पत्रकार झालों. आज ह्याच गोष्टींवर मी माझें पोट भरतों आहें. पण ह्या कलांचें ज्ञान मी कुठें शिकलों? शाळेंत किंवा कॉलेजांत नव्हे.

शाळेमधल्या किंवा कॉलेजांतल्या शिक्षणाकडे मुळीं लक्षच जात नाहीं. त्याचा कंटाळा येतो. आपण आपल्या इच्छेनें जें शिकतों त्याचाच आपल्याला आयुष्यांत उपयोग होतो. पण साहित्याची आपणाला गोडी आहे म्हणूनच

---

† मुंबई मराठी साहित्यसंघाच्या 'प्राज्ञविशारद' वर्गाचें ह्या वर्षाचें उद्घाटन आचार्य अत्रे यांनीं केलें. त्या प्रसंगीं केलेलें भाषण.

आपण ह्याचें शिक्षण घ्यावयास येथें आलांत. साहित्य हा कांहीं शिळोप्याचा व्यवसाय नाहीं. मानवाला आणि समाजाला बदलण्याचें तें प्रभावी शस्त्र आहे. स्वतंत्र भारतांत त्याला फार मोठें स्थान आहे. म्हणून समाजांतल्या सर्व बुद्धिमान माणसांनीं साहित्याकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे.

माझी आतां ओळख करून देतांना, माझ्या विनोदी लेखनापेक्षां माझ्या गंभीर लेखनाची अधिक प्रशंसा करण्यांत आली. गंभीर लेखन अधिक विद्वत्तापूर्ण असतें आणि विनोदी लेखन हें त्या मानानें उथळ असतें अशी सर्वसामान्य समजूत आहे. 'गंभीर' ह्या शब्दाचा अर्थ 'खोल' असा आहे. गंभीर लेखन करावयाला आयुष्यांत फार खोल उतरावयाला लागतें आणि विनोद हा नुसता वरवरचा खेळ आहे असें पुष्कळांना वाटतें. ही समजूत चुकीची आहे. मी तर असें म्हणतों कीं, एका दृष्टीनें गंभीर लिखाण करणें फार सोपें आहे. विनोदी लेखन करणें फार अवघड आहे. जीवनाचें रहस्य समजलें पाहिजे. जीवनाचा अर्थ कळला पाहिजे. मानवी स्वभावाच्या सर्व खुब्या लक्षांत आल्या पाहिजेत, तरच विनोद साधतो.

विनोदाबद्दल लोकांचा फार गैरसमज आहे. त्यांना तो अश्लील वाटतो. पण वात्रटपणा म्हणजे अश्लीलपणा नव्हे. शकुंतला प्रियंवदेला म्हणते, 'किती घट्ट माझें वल्कल बांधलें आहेस गे!' तेव्हां प्रियंवदा म्हणते, 'याबद्दल तुझ्या यौवनाला दोष दे. मला कां दोष देतेस?' हा काय कालिदासाचा अश्लीलपणा आहे? मला तर पुष्कळ वेळां भ्रम पडतो कीं, मी काय लिहावें! 'ब्रह्मचारी' लिहिला कीं लोक म्हणतात, ह्यांत नुसता हास्यरस आहे. कांहींतरी टिकाऊ लिहा. अन् 'श्यामची आई' सारखी कृति लोकांपुढें मांडली कीं म्हणतात, 'ब्रह्मचारी'ची मौज ह्यांत नाहीं. म्हातारा माणूस, त्याचा मुलगा आणि गाढव ह्यांची जशी गोष्ट आहे, तसें माझें झालें आहे.

पण लोकांच्या मर्जीप्रमाणें लेखकानें लिहूं नये, त्यानें आपली ऊर्मि प्रकट करावी. साहित्याच्या स्वरूपाबद्दल लोकांच्या डोक्यांत गोंधळ आहे. ह्याचें कारण साहित्याचा फार वरवर विचार केला जातो. साहित्य हें एक शब्दांचें

शास्त्र आहे. रस निर्माण करण्याची ती एक योजना आहे. लेखनाचें हें एक तंत्र आहे असा बहुतेकांचा समज आहे. साहित्याबद्दल जे सर्व वाद होतात ते त्याच्या ह्या सर्व बाह्य स्वरूपाबद्दल. एखादा कवि किंवा लेखक माझ्याकडे आपलें लेखन घेऊन येतो, आणि म्हणतो, 'ह्याची रचना कशी काय आहे? ह्यामधली शब्दयोजना कशी काय झाली आहे?'

साहित्य म्हणजे तेवढेंच अशी त्याची समजूत आहे. ह्यांतला विचार कसा आहे, ह्यांतली दृष्टि कशी आहे, हें विचारण्याच्या भानगडींत कोणीच पडत नाहीं. साहित्याच्या अंतरंगाकडे आपण दुर्लक्ष करतों. साहित्याच्या आत्म्याचें आकलन आपण करून घेत नाहीं, हा माझा आक्षेप आहे. प्राचीन वाङ्मय जें हजारों वर्षें टिकून राहिलें आहे तें काय शब्दांमुळें का रचनेमुळें? नाहीं–त्यांतील विचारांमुळें. शब्दांची आणि रचनेची त्यांनीं हेळसांड केली नाहीं. पण त्यांच्या वाङ्मयांतला तो महत्त्वाचा भाग नव्हता. जीवनाचा महान् साक्षात्कार त्यांना आपल्या वाङ्मयांतून प्रकट करावयाचा होता. म्हणून त्यांचें वाङ्मय अमर झालें.

मी खरें सांगू तुम्हांला? तुम्ही मला जुनाट म्हणाल. पण अलौकिक वाङ्मय प्राचीन काळांतच निर्माण झालें. ज्ञानाच्या अत्युच्च शिखरावर त्यावेळचे बुद्धिमान लोक चढून बसले होते. आधुनिक काळांत मानवी बुद्धीचा निदान वाङ्मयांत तरी अधःपात झालेला दिसतो. मानवी जीवनाचीं रहस्यें शोधून काढण्यासाठीं पूर्वींच्या वाङ्मयकारांनीं केवढी प्रचण्ड खटपट केली! जीवनाला भव्य आणि उदात्त स्वरूप देण्याच्या केवढ्या अचाट कल्पना त्यांनीं रचल्या! अलौकिक आणि उज्ज्वल मूल्यांचा आणि गुणांचा पुरस्कार करण्यासाठीं त्यांनीं केवढें आकाशपाताळ एक केलें? महाभारत आणि रामायण हे मानवी प्रतिभेचे आणि बुद्धीचे प्रचण्ड चमत्कार होत. आदर्श जीवनाचें तत्त्वज्ञान आणि आदर्श मानवाचीं चरित्रें ह्यांवांचून ह्या महाकाव्यांत दुसरें कांहींहि आढळणार नाहीं. गीतेला वाङ्मय म्हणणें ही कोणाला तिची विटंबनाच वाटेल. पण भगवंतांनीं गायलेलें तें काव्यच होय. भारतीय वाङ्मयाची ती गंगोत्रीच. सर्व भूतांच्या ठायीं आत्मौपम्य बुद्धीनें

माणसानें वागावें हा गीतेनें मानवजातीला चिरंतन संदेश देऊन ठेवला आहे. मी हिंसा कां करूं नये? तर इतरांनीं माझी केलेली हिंसा मला आवडावयाची नाहीं.

मी सत्यानें कां वागावें? तर इतरांनीं माझ्याशीं असत्यानें वागूं नये अशी माझी अपेक्षा असते. आत्मौपम्याच्या या तत्त्वज्ञानापेक्षां मानवी कल्याणाचें अधिक श्रेष्ठ तत्त्वज्ञान ह्या जगांत नाहीं. म्हणून गीता अमर झाली आहे. प्राचीन काळांतील अगदीं कथावाङ्मय घेतलें तरी त्यांत उन्नत जीवनाचा आणि उदात्त ध्येयवादाचा पुरस्कारच केलेला आढळेल. विष्णुशर्म्याचें 'पंचतंत्र' ह्या दृष्टीनें भारतीय वाङ्मयांतला हिरा आहे.

पंचतंत्र हें नीतिशास्त्र आहे. सध्यांच्या काळीं 'नीति' ह्या शब्दाला भलताच अर्थ आलेला आहे. 'नीति' म्हणजे साधु किंवा बैरागी ह्यांची जगण्याची 'रीति' अशी पुष्कळांची समजूत आहे. अनेक व्रतकैवल्यांनीं आणि यमनियमांनीं जो स्वतःला बांधून घेतो तो नीतिमान् असें मानण्यांत येतें.

मी एक नीतिमान् माणूस आहें असें आपणाला सांगितलें तर आपण हंसाल. पण शंकरराव देव किंवा मोरारजी देसाई हे नीतिमान् आहेत असें मी म्हटलें तर आपण अमान्य करणार नाहीं. पण प्राचीन काळीं शहाणपणानें जगणाऱ्या माणसाला नीतिमान् म्हणत असत. जगांत सावधगिरीनें कसें वागावें, लबाड माणसापासून आपलें संरक्षण कसें करावें, सज्जनांशीं मैत्री करून आपल्या गुणांचा विकास कसा करून घ्यावा, विद्याभ्यासांत अन् काव्य-शास्त्रविनोदांत आपला काळ घालवून आयुष्यांतल्या आनंदाचा रसिकतेनें कसा उपभोग घ्यावा, ह्याच्या ज्ञानाला त्यावेळीं 'नीतिशास्त्र' असें म्हणत असत. 'पंचतंत्र' ही मानवी तत्त्वज्ञानाची खाण आहे. एवढेंच नव्हे तर तत्त्वज्ञानाची व्यवहाराशीं फारच सुंदर सांगड घालून ठेवलेली आहे त्यांत. जीवनांतले सर्व प्रश्न त्यांत सोडवले आहेत. इतक्या सोप्या आणि आकर्षक रीतीनें कीं, लहान मुलांना देखील ते कळतील.

सत्ताधारी माणसें तशीं वाईट नसतात. पण जवळच्या हलकट माणसांमुळें तीं बिघडतात हें सत्य 'सिंहाची आणि सुताराची गोष्ट' सांगून विष्णुशर्म्यानें

शिकविलें आहे. सिंहाची आणि सुताराची मैत्री झाली होती. रोज दुपारीं सिंह सुताराच्या ताटांत जेवे. त्यामुळें त्याची शिकार बंद पडली अन् कावळ्याची नि कोल्ह्याची उपासमारी होऊं लागली. त्यांनीं सुताराला मारायचा निश्चय केला. ते सिंहाला म्हणाले, 'आम्ही तुझ्याबरोबर जेवायला सुताराकडे येतों.' सिंहाच्या बरोबर ती दुकल आलेली पाहून सुतार घाबरला अन् झाडावर चढला. सिंह म्हणाला, 'कां रे? मी तुझा मित्र आहें कीं!' सुतार म्हणाला, 'तूं जोंपर्यंत माझ्याकडे एकटा जेवावयाला येत होतास तोंपर्यंत मला तुझें भय वाटत नव्हतें. पण आतां ही जी जोडी तुझ्याबरोबर आली तिच्यामुळें मला तुझें भय वाटतें.' शहाणपणाच्या अशा शेकडों गोष्टी 'पंचतंत्रां'त भरल्या आहेत. मी जर भारताचा पंतप्रधान असतों तर सर्व देशी भाषांत 'पंचतंत्रा'चीं भाषांतरें करून त्याच्या प्रती पसतीस कोटी भारतीयांना मीं फुकट वाटल्या असत्या.

आचार्य विनोबा भावे म्हणतात, 'जें समाजाला शुद्ध करतें आणि समाजाचें कल्याण करतें तें साहित्य.' वाङ्मयाकडे पाहण्याची प्राचीनांची हीच दृष्टि होती. कबीर, तुळसीदास किंवा तुकाराम हे कांहीं नुसतेच कवि नव्हते. ते नुसतेच जर कवी असते तर त्यांचें काव्य समाजानें डोक्यावर घेतलें नसतें. कबीरानें शाईला आणि कागदाला हातसुद्धां लावला नाहीं. तुकारामानें एका ठिकाणीं देवाला म्हटलें आहे कीं, 'देवा, अजून मला पुरता अनुभव नाहीं. मग काय, मी नुसता कवीच होऊं का रे?' 'कवि' होण्याची तुकारामाला लाज वाटत होती. ज्यांत अनुभव नाहीं तें कसलें काव्य, असेंच तुकारामाला वाटत होतें. मूर्ति, मंदिर, योग, जप, तप हीं धर्माचीं लचांडें गरीब आणि अज्ञ जनतेला झेपण्यासारखीं नव्हतीं. मोक्षाचा मार्ग आपल्याला मोकळा नाहीं असें त्यांना वाटत होतें. त्यांच्यासाठीं 'काम' करतांकरतां 'नाम' घेण्याचा सर्वांत सोपा धर्म कबीरानें आणि तुकारामानें शोधून काढला.

कबीर म्हणे, 'तुमच्या देवाला काय चारच हात? अरे, माझ्या देवाला हजारों हात आहेत. माझा देव देवळांत नाहीं, मशिदींत नाहीं, काव्यांत नाहीं किंवा कैलासांत नाहीं. माझा देव अगदीं माझ्या हृदयांत आहे. देव

तुम्हांला विचारतो आहे, 'अरे भक्ता, मला कुठें शोधतो आहेस? मैं तो तेरे पास में!' गालिब कवीची अशीच गोष्ट आहे. तो एकदां मशिदींत दारु प्यायला गेला. तेथला मुल्ला म्हणाला, 'ए, इथें काय दारु पितोस? इथें देव आहे.' गालिब म्हणाला, 'मग जिथें देव नाहीं ती जागा मला दाखव. म्हणजे तिथें जाऊन दारु पितों.' एक मौलवी मशिदीवर चढून मोठमोठ्यानें बांग पुकारीत होता. त्याला कबीरानें विचारलें, 'काय रे, मोठमोठ्यानें काय बोंबलतो आहेस? अल्ला काय बहिरा आहे का?' हें काय शब्दांचें काव्य आहे ? ह्यांतला विचार मनाला वेड लावतो.

सुग्रीव आणि वाली ह्यांचें युद्ध चाललें असतां रामानें वालीला बाण मारला. तो जिव्हारीं लागून वाली खालीं पडला—आणि रामाला दोष देऊं लागला. राम म्हणाला, 'वाली, माझें तुझ्यावर प्रेम आहे म्हणून मीं तुला बाण मारला. तुझी इच्छा असेल तर मी तुला जिवंत ठेवतों.' वाली म्हणाला, 'छे छे, नको. आज मरतांना तूं माझ्या डोळ्यांना तरी दिसतो आहेस. पण मला तूं आयुष्य दिलेंस तर पुन्हा मरण्याची पाळी येईल तेव्हां तूं डोळ्यांना दिसशील ह्याची काय खात्री?' हें तुळसीदासजींचें काव्य काय शब्दांचें आहे?

तुकारामाच्या काव्यांत जीवनाचें तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलें आहे, तें कोठवर उपसावें? प्रा. भागवत म्हणतात त्याप्रमाणें त्यासाठीं 'तुकाराम विद्यापीठ'च काढावयास हवें. एकदां एका अडाणी ब्राह्मणानें विठोबापाशीं धरणें धरलें आणि तो म्हणाला, 'मला एकदम विद्वान कर!' विठोबांनीं दृष्टान्त दिला. 'आळंदीच्या ज्ञानोबांकडे जा!' म्हणून ब्राह्मण आळंदीला गेला, आणि ज्ञानोबांच्या समाधीपाशीं धरणें धरून बसला. ज्ञानोबांनीं त्याच्या स्वप्नांत येऊन सांगितलें, 'देहूला तुकोबा आहेत त्यांच्याकडे जा.' तेव्हां ब्राह्मण तुकोबांकडे आला अन् त्यानें सारा वृत्तांत त्यांना सांगितला. तेव्हां तुकोबांनीं त्याचे चांगले कान उपटले. 'अरे वेड्या, धनाची किंवा ज्ञानाची भीक मागण्यासाठीं का आपण देवाचे पाय धरायचे असतात? 'देवाचीया चाडें, आळवावें देवा!' 'देवाच्या प्रेमानें देवाला भजावें!' सोप्या आणि सुंदर शब्दांत हें केवढें सत्य सांगितलें आहे तुकोबांनीं!

एकदां तुकारामबुवांना पाहून पांखरें उडालीं. 'अरेरे, पांखरांना माझें भय वाटतें?' तेव्हां चार तास ते त्या ठिकाणीं निश्चळ उभे राहिले. मग पांखरांचें भय नाहींसें झालें आणि तीं त्यांच्या अंगाखांद्यावर येऊन बसलीं. त्याबरोबर त्यांच्या तोंडून दुसरा सिद्धान्त बाहेर पडला. 'सर्व भूतांचे ठायीं साम्य दिसणें हेंच ईश्वराचें दर्शन.' 'समाजवादा'चा साक्षात्कार सुद्धां तुकोबांना त्या काळीं झाला होता.

आपलीं खतपत्रें इंद्रायणींत बुडवून तुकोबा दारिद्र्यांत राहात होते. त्यांच्या सासऱ्यांनीं त्यांना एक म्हैस दिली होती. एके दिवशीं तुकोबा कीर्तनाला गेले असतांना चोरांनीं त्यांची म्हैस चोरून नेली. पण पुढें त्यांना पश्चात्ताप झाला आणि त्यांनीं ती म्हैस तुकोबांना परत आणून दिली. तुकोबा विचार करूं लागले, 'चोरांनीं माझी म्हैस कां चोरली?' मग त्यांच्या लक्षांत आलें कीं आपण चोर आहोंत म्हणून चोर आपणाकडे आले. म्हशीचें दूध आपल्याला वापरावयाचा काय अधिकार? धावे जातीपाशीं जाती. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून त्यांनीं त्या म्हशीचें दूध गांवांत वाटावयास सुरुवात केली.

आज जगांत 'आहे रे' आणि 'नाहीं रे' ह्यांचा जो झगडा चालला आहे त्याचें रहस्य तुकोबांनीं बरोबर ओळखलें होतें. एकेका वाक्यांत जो चिरंतन सत्य सांगतो तोच वाङ्मयकार. सुभाषितासारखें साहित्य नाहीं. 'बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें। शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं। नम्र झाला भूतां तेणें कोंडिलें अनंता।' अशीं शेंकडों 'सुभाषितें' तुकारामाच्या वाङ्मयांत नुसतीं विखुरलेलीं आहेत. आजकालच्या वाङ्मयांत अशीं सुभाषितें कां सांपडत नाहींत हें आपण सांगूं शकाल काय? ह्या दृष्टीनें फडक्यांचें वाङ्मय तपासा. खांडेकरांचें वाङ्मय तपासा. माझेंहि वाङ्मय तपासा. आजकालचे आम्ही लेखक नुसते शब्दांच्या मागें लागलों आहोंत. आमच्याजवळ विचार फार थोडा आहे—आणि विचार हाच मुळीं साहित्याचा आत्मा आहे.

भारतांत होऊन गेलेले पूर्वीचे संतकवि हे लोकसेवक होते. त्यांचें अमर साहित्य त्यांच्या लोकसेवेमधून निर्माण झालें. सेवा करतांकरतां त्यांना जो

अनुभव आला त्या अनुभवामधून त्यांचें वाङ्मय उचंबळलें. नुसतेंच वाङ्मय रचण्याचा व्यवसाय प्राचीन साहित्यिकांनीं केलेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

गृत्सपद नांवाचा एक ऋषि पूर्वीं होऊन गेला. ह्यानें ऋग्वेदाचें एक मंडल लिहिलें आहे. कापसापासून कापड विणण्याचा शोध प्रथम गृत्सपदानें लावला. तो विणतां विणतां आपले मंत्र रची. 'हे देवा, मी तुझें ध्यान करीत असतांना त्याचा तंतू न तुटूं दे!' दोनापासून दहापर्यंतच्या पाढ्यांचा शोधहि त्यानेंच लावला. 'हे इन्द्रा, तूं दोन घोड्यांच्या, चार घोड्यांच्या, सहा घोड्यांच्या रथांतून ये!' महत्त्वाचें समाजकार्य करीत असतां गृत्सपदानें आपले अमर मंत्र रचले. कबीरानेंहि शेले विणतांविणतां आपलें काव्य केलें. देवाच्या प्राप्तीसाठीं काम सोडण्याची आणि देवळांत जाऊन नाक धरून बसण्याची आवश्यकता नाहीं. काम करतांकरतां रामनाम घेतलें तरी पुरे आहे. 'काम में राम है' असा त्याचा उपदेश होता.

विनोबांनीं पुंडलीकाच्या गोष्टीमधूनहि तोच निष्कर्ष काढला आहे. पुंडलीक कांहीं देवाच्या मागें लागला नाहीं. तो आपल्या आईबापांची सेवा करीत बसला होता. देवच त्याच्या भेटीला तेथें आले. तरीसुद्धां पुंडलीकानें आपल्या हातांतलें काम सोडलें नाहीं. त्यानें एक वीट फेकून दिली आणि तो म्हणाला, 'त्या विटेवर तुला राहावयाचें असेल तर उभा राहा.' देव बिचारा अठ्ठावीस युगें आपला उभाच आहे.

परमेश्वरप्राप्ति झाली तरी कर्म सुटत नाहीं. कर्मांवांचून साधना व्यर्थ आहे. आधुनिक काळांत साहित्याची आणि समाजसेवेची फाळणी झाल्यामुळेंच आमच्या साहित्याचा अधःपात झाला. आजकालचे आम्ही साहित्यिक नुसतेच कवी किंवा नुसतेच नाटककार अथवा नुसतेच कादंबरीकार आहोंत. घरामध्यें किंवा ग्रंथालयांत बसावयाचें आणि कल्पनेचीं जाळीं विणायचीं, म्हणजे झालें साहित्य. साहित्यांत नुसत्या कल्पनेला कवडीची किंमत नाहीं. अनुभव हाच साहित्याचा पाया आहे. कोणत्या ना कोणत्या तरी सेवेच्या क्षेत्रांत वावरून हा अनुभव आपण गोळा केला पाहिजे.

विनोबाजींच्या आणि साने गुरुजींच्या साहित्याला जें तेज आहे तें ह्याचमुळें. ते आधीं सेवक आहेत अन् मग साहित्यिक. अनुभव नसला म्हणजे मग लेखक स्वप्नरंजन करीत बसतात.

एक गरीब शिक्षक आहे. दिवाळी आली पण त्याच्याजवळ पैसा नाहीं. घरांत गोडधोड करतां येत नाहीं. मुलांना फटाके आणतां येत नाहींत. ऐन दिवाळीच्या दिवशीं, शिक्षकानें एका मासिकासाठीं गोष्ट लिहिलेली असते—, तिचे मनीऑर्डरीनें पैसे येतात, आणि मग आनंदीआनंद होतो. असल्या नेभळ्या आणि स्वप्नाळू साहित्याचा काय उपयोग? फडके–खांडेकरांच्या पुष्कळशा गोष्टी अशाच आहेत.

फडक्यांची 'शीळ' ही गोष्ट पहा. एका पाटीवालीचें एका पोलिसावर प्रेम बसतें. कां, तर तो शीळ वाजवतो. पुढें तो पोलीस आपल्या गांवीं आपल्या बायकोला भेटायला जातो. पाटीवालीला त्याचा विरह सहन होत नाहीं. ती त्याचा शोध करीत त्याच खेडेगांवांत जाते. अन् तेथें सात गुंड तिच्यावर बलात्कार करतात. संपली गोष्ट. हें फडके ह्यांचें साहित्य! वाहवा! हैद्राबादच्या रझाकारांनीं आणि काश्मीरच्या टोळीवाल्या पठाणांनीं तेथील स्त्रियांवर केलेल्या अत्याचारांवर फडके ह्यांनीं कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पण त्यांत बलात्कारांचीं वर्णनें अशीं आकर्षक केलीं आहेत कीं वाचकांच्या तोंडाला पाणी सुटतें. यांनाहि वाटतें कीं आपण रझाकार किंवा पठाण व्हावें. साहित्याची ही विटंबना आहे. बलात्कार किंवा अत्याचार ह्यांच्याबद्दल वाचकांच्या अंतःकरणांत चीड उत्पन्न झाली पाहिजे. वेश्येचें वर्णन वाचून वाचकाला तिच्याबद्दल अनुकंपा वाटली पाहिजे, तिच्या माडीवर जाऊन यावें असें वाटतां कमा नये. अनुभव नसला म्हणजे नुसती कल्पना हे असलेच खेळ खेळणार.

शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहासंबंधीं खांडेकरांनीं लिहिलेली एक गोष्ट स्वप्नरंजनात्मक लेखनाचा उत्तम नमुना आहे. ह्या सत्याग्रहांत गोळीबार होऊन एक देशभक्त तरुण मरतो. ह्या गोळीबाराचा हुकूम ज्या इंग्रज कलेक्टरनें दिलेला असतो त्याची आंग्ल प्रेयसी त्याच दिवशीं इंग्लंडहून त्या ठिकाणीं येते. ती कट्टर स्वातंत्र्यवादी असते आणि तिचा प्रियकर हा जो

कलेक्टर तोहि पूर्वी पक्का स्वातंत्र्यवादी असतो. पण आतां तो ब्रिटिश साम्राज्यशाहीचा हस्तक झालेला असतो. भारतांत स्वातंत्र्याचा झगडा चालू असतां त्यांतील एका सैनिकाच्या मृत्यूला आपला प्रियकर कारणीभूत व्हावा, हें बघून त्याची प्रेयसी ताडकन् त्याचा त्याग करते आणि 'वंदे मातरम्' अशी गर्जना करून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळींत दाखल होते. अशा विनोदी घटना केवळ स्वप्नसृष्टींतच घडणें शक्य आहे.

ह्याच्या उलट साने गुरुजींची एक लहानशीच गोष्ट पहा. ते लहानपणीं पुण्यांत शिकत असतांना त्यांच्या दारावर एक वृद्ध भिकारी येत असे. त्याला सारे 'भिकारी' म्हणत. साने गुरुजींना तें सहन होत नसे. त्यांनीं त्या भिकाऱ्याला एकदां विचारलें, 'बाबा, तुमचें नांव काय?' तें ऐकून भिकारी रडूं लागला. आजपर्यंत कोणीहि त्याला त्याचें नांव विचारलें नव्हतें. आपलें नांव सांगायला त्याला लाज वाटली. तो भीत भीत म्हणाला, 'मी जेव्हां भिकारी नव्हतों तेव्हां मला बाबूराव म्हणत असत.' तेव्हांपासून साने गुरुजी त्या भिकाऱ्याला बाबूराव म्हणूं लागले. मानवी मनाला उन्नत करण्याचें केवढें सामर्थ्य आहे या लहानशा गोष्टींत! हिलाच विनोबा 'जीवनदृष्टि' म्हणतात.

साहित्य ही जीवनदृष्टि आहे. जीवनाच्या क्षेत्रांत प्रत्यक्षपणें वावरल्या-खेरीज ही दृष्टि येणार नाहीं. आजचे नवकवि कांहींतरी अभद्र आणि बीभत्स लिहितात; आणि म्हणतात कीं जीवन अगतिक झालें आहे. त्यामुळें वैफल्याची भावना आमच्यांत उत्पन्न झाली आहे. दारें बंद करून स्वतःला घरांत कोंडून घेणाऱ्या माणसांचे मेंदू रोगट न झाले तरच नवल! जीवनाची अनुभूति नाहीं म्हणूनच ही वैफल्याची भावना निर्माण होते. कल्पनेचीं जळमटें आहेत हीं. म्हणूनच मी म्हणतों कीं, साहित्य म्हणजे स्वप्नरंजन नव्हे. ज्याला साहित्य निर्माण करावयाचें आहे त्यानें कोणत्या ना कोणत्या तरी सेवेच्या क्षेत्रांत उडी मारली पाहिजे, अनुभव घेतला पाहिजे. त्या अनुभवांतूनच जिवंत साहित्याचा त्याला साक्षात्कार होईल. त्याचा उगम सेवेंतूनच व्हावा आणि सेवेमध्येंच त्याची परिणतीहि व्हावी.

नवयुग : १२-७-१९५३

# महाराष्ट्राचा बंडखोर लोककवि

महाराष्ट्र ही बंडखोरांची भूमि आहे. या भूमीमध्यें गेल्या सातशें आठशें वर्षांत अनेक मोठमोठीं बंडें झालेलीं आहेत. आणि अनेक महान् बंडखोर निर्माण होऊन गेलेले आहेत. महाराष्ट्राच्या पठारावरून सैरावैरा वहाणाऱ्या वाऱ्यामध्येंच मुळीं बंड आहे. महाराष्ट्राच्या डोंगरावरून आणि खडकाळ प्रदेशामधून झराझरा आणि भराभरा वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्यांतच मुळीं बंड आहे. महाराष्ट्राच्या कोरड्या आणि काळ्याभोर जमिनींत रडतखडत पिकणाऱ्या बाजरीजोंधळ्याच्या कणसामधील प्रत्येक दाण्यादाण्यांत बंड भरलेलें आहे. महाराष्ट्राचें हें बंडखोर वारें श्वासून, महाराष्ट्राचें हें बंडखोर पाणी प्राशून आणि महाराष्ट्राच्या बंडखोर भाकरी झणझणीत मिरच्यांच्या चटणीबरोबर ढोसून महाराष्ट्राचा सर्व पिंडच मुळीं बंडाचा झाला आहे. महाराष्ट्राच्या रक्तांत बंड आहे. तें कधीं थिजत नाहीं. महाराष्ट्राच्या मांसांत बंड आहे. तें कधीं गोठत नाहीं. महाराष्ट्राच्या हाडांत बंड आहे. तें कधीं मोडत नाहीं. महाराष्ट्राच्या डोक्यांत बंड आहे. तें कधीं वांकत नाहीं. महाराष्ट्राच्या डोळ्यांत बंड आहे. तें कधीं विझत नाहीं.

महाराष्ट्राच्या छातींत बंड आहे. तें कधीं हटत नाहीं. महाराष्ट्राच्या मनगटांत बंड आहे. तें कधीं पिचत नाहीं. बंड करणें हा मुळीं महाराष्ट्राचा स्वभावच आहे. आणि मेल्यावांचून कांहीं माणसाचा स्वभाव जात नाहीं. पण महाराष्ट्र बंडखोर असल्यानें तो मरणें अशक्य आहे. असें हें कांहीं त्रांगडें झालेलें आहे.

[ जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानि येते, तेव्हां तेव्हां परमेश्वर अवतार घेतो असें म्हणतात. पण महाराष्ट्रावर जेव्हां जेव्हां कोणी दास्य लादण्याचा प्रयत्न करतो, महाराष्ट्राच्या हातापायांत गुलामगिरीच्या शृंखला अडकवण्याचा जेव्हां जेव्हां कोणी डाव मांडतो, तेव्हां तेव्हां तें दास्य झुगारून देण्यासाठीं आणि त्या गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठीं महाराष्ट्रांत बंडखोर निर्माण होत असतात. आणि त्या बंडखोरांच्या हाकेला साऱ्या महाराष्ट्राकडून साद मिळते. धर्ममार्तंडांनीं आणि पंडितांनीं धर्माचीं तत्त्वें आणि विद्या ब्राह्मण्याच्या किल्ल्यांत आणि संस्कृताच्या कड्याकुलपांत बंदिस्त करून जनतेला वर्षानुवर्षें अज्ञानांत आणि दास्यांत ठेवलें. त्याविरुद्ध ज्ञानेश्वरांनीं गोदावरीच्या काठीं बंडाचा झेंडा प्रथम उभारला आणि तें ज्ञानाचें आणि विद्येचें भांडार मराठी भाषेंत वाहून घरोघर पोहोंचतें केलें. परकीय मोगल सत्तेच्या महापुरांत अवघें महाराष्ट्र भूमंडळ बुडून सर्व मराठी बुद्धि आणि कर्तबगारी नामशेष होण्याची जेव्हां पाळी आली तेव्हां त्या सत्तेविरुद्ध बंडाचा भगवा झेंडा तोरणागडावर उभारण्यासाठीं हातांत भवानी तलवार घेऊन आणि कृष्णा घोडीवर स्वार होऊन महाराष्ट्राचा पहिला बंडखोर छत्रपति अवतीर्ण झाला. वेदस्थापित धर्माचे देव्हारे माजवून, वर्णश्रेष्ठतेचे पोकळ नगारे वाजवून, टिळे टोपी घालणाऱ्या नि साधुत्वाचा आव आणणाऱ्या दांभिकांनीं जेव्हां महाराष्ट्रांतील अडाणी बहुजनांना आत्मोद्धाराचे सारे मार्ग बंद करून टाकले तेव्हां इंद्रायणीच्या काठीं भंडाऱ्याच्या डोंगरावर एका देहूच्या वाण्यानें बंडाची पताका उभारली आणि नुसत्या नामसंकीर्तनाच्या सामर्थ्यावर वैकुंठपेठ खालीं ओढून आणण्याचा अभंगमंत्र महाराष्ट्राला दिला. ]

ज्ञानेश्वर, तुकाराम आणि शिवछत्रपति ह्यांनीं केलेल्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्रांतीच्या बंडखोर परंपरा या क्षणापर्यंत महाराष्ट्रानें चालू ठेवलेल्या आहेत आणि त्यांनीं शिकविलेल्या बंडखोर मंत्राचें पुरश्चरण महाराष्ट्र अद्यापहि आपल्या मनामध्यें करीत बसलेला आहे. महाराष्ट्राच्या खडकाळ आणि नापीक भूमींत दुसरें कोणतेंहि पीक चांगलें रुजत नसलें तरी सर्व प्रकारच्या बंडांचें पीक मात्र येथें पुरुष पुरुष उंच फोफावतें. महाराष्ट्राच्या कलेंत, वाङ्मयांत आणि जीवनांत चोहींकडे बंडच बंड भरलें आहे. लावण्या पोवाडे हें कलेंतलें बंड आहे, डफ कडें हें वाद्यांतलें बंड आहे, ओवी अभंग हें काव्यांतलें बंड आहे, चटणी भाकरी हें भोजनांतलें बंड आहे. महाराष्ट्रांतल्या या बंडाला आशीर्वाद देण्यासाठीं एका हातांत तरवार घेऊन अन् दुसऱ्या हातानें भंडार उधळीत मल्हारी मार्तंड खंडोबा जेजुरीच्या डोंगरावर उभा आहे. तर महाराष्ट्राच्या या बंडाचें कौतुक करीत चंद्रभागेच्या वाळवंटांत पुंडलीकानें फेकलेल्या विटेवर कमरेवर हात ठेवून अठ्ठावीस युगें विठोबा माउली उभी आहे.

देहूचा बंडखोर वाणी 'कुडीसहित गुप्त' होऊन गेल्या फाल्गुन वद्य द्वितीयेला बरोबर तीनशें वर्षें झालीं. पुण्याहून मुंबईला जातांना किंवा मुंबईहून पुण्याला येतांना देहू गांवाच्या उत्तरेला दिसणारे भंडाऱ्याचे आणि भांबनाथचे दोन उघडेबोडके आणि ओकेबोके डोंगर पाहिल्यानंतर सबंध महाराष्ट्राला भक्तिरसाच्या महापुरांत बुडविणाऱ्या तुकोबांच्या अभंगवाणीची चंद्रभागा ह्याच डोंगरांमधून उगम पावली हा विचार डोक्यांत येऊन मनाला क्षणमात्र अचंबा वाटतो. महाराष्ट्राच्या अंतःकरणाइतकेच हे दोन्हीहि डोंगर अत्यंत रुक्ष आणि राकट आहेत. त्यांवर सावलीपुरतें सुद्धां झाड नाहीं किंवा ओलाव्यापुरताहि एखादा ओहळ नाहीं. मुंडण केलेल्या एखाद्या संन्याशाच्या डोक्यासारखेच हे डोंगर बोडखे आहेत. मातापितरें निवर्तल्यानंतर, वडील बंधु परागंदा झाल्यानंतर, दुष्काळांत बायको आणि गुरेंढोरें अन्नान्न

करून मेल्यानंतर शोकानें आणि दुःखानें वेडा झालेल्या सत्रा वर्षांच्या तुकारामाला सोबत करावयाला आणि आसरा द्यावयाला यापेक्षां अधिक कठोर मुद्रेचे आणि भावनाशून्य वृत्तीचे संवगडी मिळणें खरोखरीच अशक्य होतें, का तुकारामावर दुःखाचा डोंगर कोसळण्यापूर्वी या दोन्हीहि डोंगरांवर "वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें, पक्षीही सुस्वरें आळविती' ह्या ज्या सृष्टि-सौंदर्याचा उल्लेख तुकारामानें आपल्या एका अभंगांत केलेला आहे, तशा तऱ्हेचें रमणीय सृष्टिसौंदर्य बहरलेलें होतें? पण तुकारामाच्या भोंवतीं पेटलेला कौटुंबिक दुःखाचा भयाण वणवा बघून त्याच्या झळींनें या डोंगरावरच्या त्या वृक्षवल्ली जागच्या जागीं जळून गेल्या, पक्षी आणि वनचरें तेथल्या तेथें भाजून मेलीं आणि म्हणून तेव्हांपासून त्या डोंगरांनीं कायमचें मुंडन करून घेऊन हा भयाण संन्यास स्वीकारलेला आहे? कांहीं कळत नाहीं.

असेल, कदाचित् तसेंहि असेल. ह्याच डोंगरांनीं तुकारामाच्या डोक्यां-तील भ्रांति नष्ट केली. त्यांच्या जीवनांत क्रांति घडवून आणली आणि त्यांना वेडाची स्फूर्ति दिली. दगडाचे टाळ अन् चिपळ्या वाजवीत आणि कधीं कधीं हातानें टाळ्या पिटीत ब्रह्मानंदामध्यें तल्लीन होऊन या डोंगरांवर तुकोबा किती रात्रीच्या रात्री नाचत बसले असतील बरें? त्यावेळीं त्यांच्या मुखामधून निघालेल्या 'रामकृष्ण हरि गोविंद' ह्या नामसंकीर्तनाच्या गंभीर गजरानें भोंवतालच्या सर्व उंचसखल भूभागाच्या अंगावर कितीवेळां तरी हर्षाचे रोमांच उठले असतील आणि इंद्रायणीच्या पाण्यानें वहावयाचें सोडून किती वेळां तरी त्यांना आपल्या लहरींचा ताल दिला असेल बरें? 'वाटुली पाहतां सिणले डोळुलें' असें म्हणून 'धांव घाली आई, आतां पाहतेसी काई' अशी विठाई माउलीला सद्गदित कंठानें तुकोबानें या डोंगरांवरून अनेक वेळां हाक मारली असेल, आणि त्यावेळीं त्यांच्या डोळ्यांतून वाह-णाऱ्या अश्रूंच्या पाझरांनीं या डोंगरांवरचे फत्तर किती वेळां तरी ओले झाले असतील. तुकारामाच्या नाचत्या पावलांनीं ज्यांची माती पवित्र झालेली आहे आणि तुकारामाच्या वाहत्या आसवांनीं ज्याचे खडे न् दगड शुद्ध

झालेले आहेत ते हे देहूचे दोन डोंगर धन्य होत आणि त्यांचें दर्शन ज्यांना आज रोज घडत असेल तेहि पण धन्य होत !

❦ ❦ ❦

[ टिळे टोपी घालणाऱ्या दांभिक, ढोंगी नि व्यसनी बुवांनीं आणि संन्याशांनीं महाराष्ट्रांतल्या भोळ्याभाबड्या जनतेचा अनन्वित छळ करून तिला हैराण करून सोडलें होतें. या ढोंगी लोकांचीं सारीं बिंगें फोडून तीं तुकारामानें वेशीवर टांगलीं. स्नानसंध्या न करणारे, मद्यमांसाला चटावलेले, तोंडीं तमाखूची नळी धरणारे, शूद्र स्त्रियांशीं संग करणारे, विषयाच्या कर्दमांत डुकरांप्रमाणें लोळणारे आणि ईश्वरभक्तीचा व्यापार करणारे हे ‘मैंद’ आहेत. त्यांच्यापाशीं ‘गोविंद’ नाहींच नाहीं. ते निश्चित नरकांत जाणार आहेत. पायांतल्या पैजारा काढून त्यांचीं तोंडें आपण फोडलीं पाहिजेत असें जनतेला तुकारामानें निर्भयपणें बजावून सांगितलें. वर्णश्रेष्ठत्वाच्या अभिमानानें त्या वेळच्या ब्राह्मणांचीं डोकीं फिरून गेलीं होतीं. म्हणूनच तुकाराम त्यांना म्हणाला कीं, ‘बाबांनो, देवानें मला कुणबी केलें तेंच ठीक केलें. नाहींतर तुमच्याप्रमाणें नुसत्या दंभानें उन्मत्त होऊन मी कधींच मरून गेलों असतों. तुमच्याप्रमाणें विद्येमध्यें आणि शास्त्रामध्यें मला थोडीशी जरी गति असती तरी संतांची सेवा माझ्या हातून घडली नसती आणि आयुष्यांत माझी नागवण झाली असती.’

ग्रंथांच्या गोण्या डोक्यावर घेऊन उगाच इकडून तिकडे फिरणाऱ्या आणि तत्त्वज्ञानाचा अर्थशून्य काथ्याकूट करणाऱ्या शास्त्रीपंडितांना ‘तुम्ही निर्बुद्ध बैल आहांत’ असें तुकारामानें त्यांच्या तोंडावर निक्षून सांगितलें. एवढेंच नाहीं तर अठरा पुराणें, सगळीं शास्त्रें आणि चारी वेद ह्यांची जन्मभर उठाठेव करून त्यांचा उजेड तुमच्या बथ्थड टाळक्यामध्यें पडलेला नाहीं. तें रहस्य आणि तो अर्थ शूद्रशूद्र म्हणून तुम्ही ज्यांना हिणवीत आहांत त्या आम्हां यातिहीनांनाच खरा उमजलेला आहे असें छातीवर हात मारून तुकारामानें त्यांना सांगितलें. ‘वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा, येरांनीं वाहावा भार माथां.’

आणि वेद अवघड भाषेंत कितीहि जरी बोलला, तरी असा काय त्याचा अर्थ मोठा गहन आहे कीं, तो अडाणी माणसाच्या डोक्यांत शिरणें शक्य नाहीं ? 'विठोबासी शरण जावें, निज निष्ठें नाम गावें' एवढेंच सर्व वेदांचें साधें आणि सोपें सार आहे. जन्मजन्मांतरींचीं पापें जाळणारें नामसंकीर्तन हें एकच सोपें साधन आहे. हें करण्यासाठीं रानावनांत जायची जरुरी नाहीं. आहे त्याच ठिकाणीं शांतपणें बसून आणि एकचित्त करून 'रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा' या मंत्राचा जप केला म्हणजे नारायण आपल्या पायांनीं चालत आपल्याकडे येतो, हा संसारांतच राहून परमेश्वराची प्राप्ति करून घेण्याचा नामस्मरणाचा आणि सगुण उपासनेचा अत्यंत सोपा मार्ग तुकोबांनीं तुमच्या आमच्या सारख्या सर्वसामान्य प्रापंचिकांना दाखवून ठेवलेला आहे.

मोठमोठ्या शास्त्री आणि पंडितांपेक्षां तुकाराम हा अधिक विद्वान् आणि बुद्धिमान् होता यांत मुळींच संशय नाहीं. विद्येचा व्यासंग नऊ पिढ्या त्यांच्या घराण्यांत चालत आलेला होता. ज्ञानाच्या आणि उपासनेच्या आनुवंशिक संस्कारानें त्यांचा पिंड बनलेला होता. पण शूद्र यातींत जन्माला आल्यामुळें त्यांच्या अंगीं ज्ञानाचा आणि पांडित्याचा दंभ नि उन्माद उत्पन्न होऊं शकला नाहीं. म्हणूनच बंड करण्याचें सामर्थ्य आणि धारिष्ट त्यांच्या बुद्धीमध्यें निर्माण झालें. ढोंगी ब्राह्मण्याच्या दंभाविरुद्ध बंड करणारा क्रांतिकारक अवतार शूद्रांमध्येंच जन्माला यावा हें इतिहासाच्या नियमाला आणि क्रमाला धरूनच आहे. ]

❀ ❀ ❀

ऐन तारुण्यांत तुकारामाचें मन दुःखाच्या जात्यांत भरडून निघालें आणि संकटाच्या उखळांत ठेचून निघालें म्हणून त्याच्या बुद्धीमधून जीवनाचें अमर तत्त्वज्ञान अभंग उद्गारांच्या रूपांत एकदम कारंजासारखें उचंबळून बाहेर आलें आणि शिगोशीग भरून वाहूं लागलें. मृत्यूनें, दुःखानें, दुष्काळानें आणि आपत्तीनेंच तुकारामाला गुरुमंत्र दिला आणि आयुष्याचा खरा अर्थ समजावून सांगितला. संसार अनंत दुःखांनीं भरलेला आहे.

प्रापंचिकांच्या मनाला रोजच्या रोज नाना तऱ्हेच्या आधीव्याधीच्या जळवा लागलेल्या असतात. अनेक काळज्यांनीं त्यांचीं हृदयें रात्रंदिवस करपत असतात. त्यांच्या जखमेवर फुंकर घालून त्यांना कोण समाधान देणार? त्यांच्या दुःखित जीवांचें सांत्वन करून त्यांना आयुष्यांत कोण धीर देणार? श्रीमंत माणसें पैशाच्या मस्तीनें बेहोप झालेलीं असतात. विद्वान् माणसें आपल्या ज्ञानाच्या उन्मादांत धुंद झालेलीं असतात. धर्ममार्तंडांना आपल्या वर्णश्रेष्ठत्वाची गुर्मी चढलेली असते. अशा परिस्थितींत समाजांतील लक्षावधि दुःखितांकडे आणि दलितांकडे कोण लक्ष देणार? आणि त्यांच्या डोळ्यांमधले अश्रू सहानुभूतीच्या प्रेमळ हातानें कोण पुसणार?

समाजांतील दुःखितांचें हें दुखणें तुकारामानें ओळखलें. समाजांतील आर्त जीवांची ही हाक तुकारामानें ऐकली. आणि त्याच वेळीं त्याच्या तोंडून मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान बाहेर पडलें, "जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेंची जाणावा; मृदु सबाह्य नवनीत, तैसें सज्जनांचें चित्त; ज्यासी आपंगिता नाहीं, त्यासि धरी जो हृदयीं, दया करणें जें पुत्रांसी, तेंचि दासा आणि दासी, 'तुका' म्हणे सांगू किती, तोचि भगवंताची मूर्ति." जगांतील सर्व गरिबांना आणि दलितांना नवनीतासारख्या कोमल अंतःकरणानें आणि समबुद्धीनें जो आपल्या हृदयाशीं धरतो तोच खरा ईश्वराचा अवतार. हें पृथ्वीमोलाचें महान् सत्य संसार-सागराच्या तळाशीं बुडी मारून तुकारामानें बाहेर काढलें.

जगामधल्या कोणत्या धर्मसंस्थापकानें, तत्त्वज्ञानें आणि पंडितानें ह्याच्यापेक्षां अधिक महत्त्वाचें तत्त्व आजपर्यंत सांगितलेलें आहे? तुकारामाचे हजारों अभंग ही समाजांतील हजारों रंजल्या गांजल्यांना हृदयाशीं धरून दिलेलीं सहानुभूतीचीं आलिंगनें होत आणि त्यांच्या दुःखित अंतःकरणावर घातलेल्या समाधानाच्या शीतळ फुंकरा होत. केवढें शहाणपण, केवढी शांति आणि केवढा संतोष तुकारामाच्या एकेका शब्दांत आणि ओळींत भरलेला आहे! म्हणूनच तुकारामाचा एखादा रसाळ अभंग एखाद्या वारकऱ्याच्या, भाविकाच्या किंवा भिकाऱ्याच्या तोंडून गोड स्वरांत कानावर पडला

म्हणजे प्रापंचिक माणूस आपलें दुःख क्षणभर विसरून आनंदानें डोलूं लागतो.

अहो, आम्हां महाराष्ट्रांतल्या माणसांचें केवढें हें भाग्य कीं, तीनशें वर्षांपूर्वी इंद्रीयणीच्या कांठीं शूद्र कुळांत जन्माला आलेला एक सत्पुरुष गेलीं तीनशें वर्षें सतत आपल्या हातांनीं आमच्या डोळ्यामधले अश्रू पुसत आहे आणि आपल्या अभंग वाणीनें आम्हांला आशा देऊन, धीर देऊन, जागृति देऊन, आमचा उद्धार करीत आहे! या महाराष्ट्रांतले लक्षावधि भोळेभावडे, अडाणी आणि गरीब प्रापंचिक लोक गेलीं तीनशें वर्षें तुकारामाची भाषा बोलत आहेत आणि तुकारामाचें तत्त्वज्ञान सांगत आहेत. एवढ्या साध्या, सुबोध आणि रसाळ भाषेंत संसाराचें सारें सार इतकें सोपें करून ह्या जगांत कुठें कोणीतरी सांगितलें असेल काय हो?

महाराष्ट्रांतल्या आजच्या बहुजनसमाजानें 'आम्ही तुकारामाचे वारस आहोंत, आम्ही तुकारामाची मराठी भाषा बोलत आहोंत, आणि तुकारामानें आम्हांला विचार करावयाला शिकविलेलें आहे' असें मान वर करून अभिमानानें सांगावयाला हवें. डोहांत बुडविलेले तुकारामाचे अभंग तेरा दिवस देखील इंद्रायणीला आपल्या उदरांत ठेवतां आले नाहींत. तीनशें वर्षें ती तुकारामाची गाथा आपल्या डोक्यावर घेऊन काळ वाट चालतो आहे. मानवतेचें हें अमर धन काळपुरुषाला आपल्या डोक्यावर घेऊन आणखी किती युगें मिरवावें लागणार आहे तें कोण सांगूं शकेल?

नवयुग : १२-३-१९५०

# धन्य देहू गांव

कां कोण जाणे, पण मला देहू फार आवडतें. महाराष्ट्रामधल्या सर्व क्षेत्रांमध्यें एवढें एकच क्षेत्र मला अतिशय सुंदर आणि निर्मळ वाटतें. ह्याचें मुख्य कारण म्हणजे आळंदी आणि पंढरीएवढी भक्तांची वर्दळ ह्या ठिकाणीं नाहीं. म्हणून त्याचा जुनेपणा होता तसाच ताजातवाना राहिला आहे. इंद्रायणीवर अलीकडच्या काळांत गाडगेबाबांनीं बांधवून घेतलेला नवा पूल वजा केला, तर खुद्द तुकोबांच्या वेळीं देहू जसें दिसत होतें तसेंच तें आज दिसत आहे अशी माझी कल्पना आहे. गांव आपलें लहानसें गांवढें आहे. पन्नास उंबरा नसेल साऱ्या गांवांत. पण भोंवतीं गर्द झाडी आणि बागाईत शेती आहे. सभोंवार चारदोन लहान डोंगर आहेत.

त्यांत भांबनाथ आणि भंडाऱ्याचे तुकोबांचे दोन आवडते डोंगर ठसठशीत दिसतात. गांवाच्या पूर्वेला इंद्रायणी नदी वहाते. ती पाण्यानें नेहमीं तुडुंब भरलेली असते. गांवाच्या परिसरांत प्रवेश करतांच विठोबाच्या देवळाचा कळस आणि उंच तट दृष्टीस पडतांना हृदय आनंदानें नाचूं लागतें आणि तुकोबांचा गोड अभंग एकदम ओठामधून उचंबळतो :

धन्य देहू गांव, पुण्यभूमि ठाव,
तेथें नांदे देव पांडुरंग.
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे,
उच्चारिती वाचे नामघोष.
कर कटीं उभा विश्वाचा जनिता,
वामांगीं ते माता रखुमादेवी.
गरुडपारीं उभा जोडुनियां कर,
अश्वत्थ समोर उत्तराभिमुख.
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर
शोभे गंगातीर इंद्रायणी
तेथें दास तुका करितो कीर्तन
हृदयीं चरण विठोबाचे

तुकोबांचें सारें आयुष्य देहूमध्यें गेलें. हीच त्यांची जन्मभूमि आणि कर्मभूमि. त्यांचीं पावन पावलें ह्याच भूमीच्या धुळीमध्यें सर्वत्र उमटलेलीं आहेत. त्यांच्या मुखांतून बाहेर पडलेल्या पांडुरंगाच्या नामस्मरणानें हेच डोंगर पवित्र झालेले आहेत. ह्याच ठिकाणीं बाबाजी चैतन्यांनीं त्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांना 'रामकृष्ण हरि' मंत्राचा गुरूपदेश दिला आणि पांडुरंगाला साक्षी ठेवून नामदेवांनीं त्यांना शतकोटी कवित्व करावयास सांगितलें. त्यांच्या अभंगवाणीचे पडसाद आणि त्यांच्या भजन-कीर्तनाचा जयघोष येथल्याच आकाशांत निनादला. ह्याच इंद्रायणीचें तीर्थ प्राशन करून त्यांनीं जन्मभर तपश्चर्या केली आणि शेवटीं विठ्ठलनामाच्या गजरांत तिचा निरोप घेऊन त्यांनीं 'कुडीसहित' वैकुंठाला प्रयाण केलें.

तुकोबांच्या चरित्राचे असे शेंकडो साक्षीदार देहूच्या परिसरांत अजूनहि उभे आहेत. त्यांचें दर्शन झालें म्हणजे सर्वांगावर हर्षाचे रोमांच उभे राहातात आणि 'धन्य देहू गांव, पुण्यभूमि ठाव' ह्या उद्गारांची सत्यता पटते.

गेल्या आषाढीलाच मी देहूला गेलों होतों. देहूला जाण्याची संधि मी सहसा चुकवीत नाहीं. पावसाळ्याचे दिवस होते. त्यामुळें घाटमाथ्यापासून तों थेट देहूपर्यंतचा सारा प्रदेश हिरव्यागार वृक्षांनीं अन् शेतांनीं नि तजेलदार हिरवळीनें नुसता बहरून गेला होता. त्या दिवशीं पाऊस नव्हता. आभाळहि जवळजवळ निरभ्रच होतें. पण अधूनमधून पांढरे ढग सूर्याला झांकण्याची प्रयत्न करीत होते. त्यामुळें ऊन-सांवल्यांचा मोठा मनोहर खेळ चहूंकडे चालला होता. ऐन तारुण्यांत आलेल्या एखाद्या खेडवळ मुलीप्रमाणें इंद्रायणी नदी अधूनमधून लाजत अन् मुरडत चाललेली दिसत होती. एकदम मला तुकोबांचा एक अभंग आठवला आणि भास झाला कीं, ह्या सृष्टिसुंदर प्रदेशामध्यें तुकोबांना साक्षात्कार झाला असला पाहिजे.

**वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें,**
**पक्षीही सुस्वरें आळविती.**
**येणें सुखें रुचे एकांताचा वास**
**नाहीं गुणदोष अंगा येत**
**आकाश मंडप पृथिवी आसन**
**रमे तेथें मन क्रीडा करी**
**कथा कमंडलु देह उपचार**
**पाणवितो वारा अवसरू**
**हरिकथा भोजन परवडी विस्तारा**
**करोनि प्रकार सेवूं रुची**
**तुका म्हणे होय मनासी संवाद**
**आपुलाचि वाद आपणांसी.**

वृक्षवल्ली आणि पशुपक्ष्यांच्या सहवासानें सुरम्य वाटणाऱ्या एकांतवासांत आकाशाच्या मंडपाखालीं पृथ्वीवर आसन मांडून स्वतःच्याच मनाशीं वादसंवाद करीत ह्याच ठिकाणीं कोठेंतरी तुकोबा दिवसचे दिवस आणि रात्रीच्या रात्री ध्यानमग्न बसले असावेत, असें देहूपर्यंत जातांना मनाला एकसारखें वाटत होतें.

आषाढी एकादशी असून देवळासमोर विशेष गर्दी नव्हती. त्यामुळें बरें वाटलें. अडाणी लोक यात्रेचा बाजार करतात. त्यामुळें त्यांना स्वतःला तर उपसर्ग होतोच; पण देवालाहि त्याचा त्रास होत असावा असें वाटतें. देवळाच्या दाराशीं तुळशीच्या माळा, फुलें, बुका, अन् हळदकुंकू विकावयाला बसले होते. त्यांचा सुगंध भाविक मनाला अतिशय सुखदायक वाटतो. देवळाचा फरशीबंद परिसर चांगलाच ऐसपैस आहे. सारें आवार नीटनेटकें आणि स्वच्छ ठेवलेलें असतें. जुनेपणाचें पावित्र्य कुठेंहि बिघडवण्यांत आलेलें नाहीं हें विशेष आहे. आळंदीला ज्ञानोबांच्या देवळांत श्रीमंत भक्तांनीं आपल्या नांवाच्या संगमरवरी दगडांनीं साऱ्या आवाराची शोभा बिघडवून टाकली आहे. तसें येथें नाहीं. मंडपामधल्या कांसवापुढें एक आंधळा म्हातारा गळ्यांत वीणा अडकवून 'रामकृष्ण हरि। जय जय रामकृष्ण हरि।' असें फेऱ्या घालीत घालीत अत्यंत गोड पण मंद स्वरांत भजन करीत होता. तें ऐकतांच क्षणभर डोळे मिटून उभें रहावें असें वाटलें. 'कर कटीं उभा विश्वाचा जनिता। वामांगीं ते माता रखुमादेवी' असें आंतल्या गाभाऱ्यामधील ज्या मूर्तीचें तुकोबांनीं वर्णन केलें आणि ज्याचे चरण हृदयामध्यें सदैव बाळगून ज्या मंदिरांत तुकोबांनीं कीर्तन केलें, त्या समचरणाचा स्पर्श मस्तकाला होतांच खरोखर देहभान विसरल्यासारखें झालें. आणि मुखांतून पुन्हा उद्गार निघाले, 'धन्य धन्य देहू गांव, जेथें नांदे देव, पांडुरंग.'

ह्या भाग्यवान गांवाच्या शिवारांत बसून तुकोबांनीं भागवत धर्माची शिकवणूक साऱ्या मराठी भूमंडळाला शिकवली. सारी मराठी जनता त्यांनीं जागी केली आणि खरी मराठी भाषा त्यांनीं घडवली. ज्ञानोबांनीं तिचा पाया आधींच घालून ठेवला होता. तुकोबांनीं त्यावर कळस चढवला. विनोबा म्हणतात त्याप्रमाणें मराठी मनाला जागृत करणारा आणि मोहिनी घालणारा, 'ग्यानबा–तुकाराम' हा महामंत्र इंद्रायणीच्या कांठावर देहू आणि आळंदीच्या पंचक्रोशींत निर्माण झाला. धर्माच्या क्षेत्रांत ज्ञानाचें फार अवडंबर माजलें होतें. तुकोबांनीं तें पार उडवून लावलें आणि मोक्षाची वाट गरिबाच्या

झोपडीसमोर आणून अंथरली. व्रतवैकल्यांचें, जपातपाचे, टिळेटोपीचे आणि सोवळ्याओवळ्याचें असें जंगल माजलें होतें म्हणतां ह्या महाराष्ट्रांत! तुकोबांनीं तें साफ तोडून टाकलें. ते म्हणाले, "अरे, कुठें देवाच्या शोधासाठीं क्षेत्रें अन् देवळें पालथीं घालतां आहांत? लोणी दुधांत असतें तसा देव देहांत असतो, एवढी साधी गोष्ट तुम्हांला माहीत नाहीं? "तुका सांगे मूढ जना, देहीं देव का पाहा ना?'

'समर्थांसी नाहीं वर्णावर्ण भेद, राजा आणि रंक सारखाची।' असें त्यांनीं खडसून बजावलें. त्यांनीं सरळच प्रश्न टाकला कीं, 'वर्ण अभिमानें कोण झाले पावन? ऐसें द्या सांगून मजपाशीं! यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा, निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं.' धर्मगुरूंना त्यांनीं बजावून सांगितलें कीं, हीं सोवळ्याओवळ्याचीं सोंगें आणि पढीकपणाचीं ढोंगें तुम्ही कशाला करतां? 'काय बा करिसी सोवळे ओवळे? मन नाहीं निर्मळ वाऊगेची. काय बा करिसी ज्ञानाच्या गोष्टी? करणी नाहीं पोटीं बोलण्याची?' काय करावें हें तुम्हांला कळत नाहीं आणि फुकट ज्ञानाच्या गोष्टी करून तोंडाची वाफ रे कशाला दवडतां?

तुकोबांच्या आधीं जो ज्ञानी माणूस आणि साधुपुरुष उठे तो आपला स्वतःचा उद्धार कसा होईल आणि आपल्या स्वतःला मोक्ष कसा मिळेल ह्याची विवंचना करी. ह्या आप्पलपोटेपणाला तुकोबांनीं अशा कानपिचक्या दिल्या म्हणतां? त्यांनीं त्यांना हडसून सांगितलें कीं, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' आणि 'भूतांची दया हें भांडवल संतां!' स्वतःच्या देहाची तिळमात्र ममता न धरतां दुसऱ्यावर उपकार करण्यांत देह झिजवावयाचा एवढेंच संतांचें कार्य आहे. स्वतः तुकोबांनीं तेंच केलें. 'तुका म्हणे आतां, उरलों उपकारापुरता!'

रंजल्या-गांजल्यांचा आणि अनाथ-अपंगांचा कैवार महाराष्ट्रामध्यें तुकोबां-एवढा कोणीच घेतला नाहीं. त्यांना उचलून कडेवर जो घेतो, त्यांना हृदयाशीं धरून जो आपले म्हणतो तोच साधु आणि तोच देव हें तुकोबांच्या शिकवणुकीचें सार होतें. 'तुका म्हणे सुख पराविया सुखें, अमृत हें मुखें

स्रवतसे.' पराविया सुखांत जो स्वतःचें सुख मानतो त्याच्याच मुखामधून अमृताचे झरे वाहूं लागतात. ह्याच वृत्तीमुळें तुकोबाच्या अभंगवाणींत अमृताची अवीट गोडी निर्माण झाली होती. लोकसेवा आणि रामसेवा ह्यांमध्यें तुकोबांना फरकच वाटत नव्हता. 'राम राज्य राम प्रजा, लोकपाळ, एकचि सकळ दुजें नाहीं.' ह्या आत्मानंदामध्यें तुकोबा आजन्म तल्लीन राहिले. म्हणूनच ते म्हणूं शकले कीं, 'धन्य दिवस आजि झाला सोनियाचा, पिकली हे वाचा रामनामें !' पिकलेली तुकोबांची अभंग वाचा ह्याच देहू गांवामध्यें उगम पावली आणि महाराष्ट्रांतल्या गोरगरिबांना आणि अनाथ-अपंगांना 'सोनियाचा दिवस' दाखवला. म्हणून देहू गांवाचें स्मरण झालें, दर्शन झालें किंवा देहू गांवावरून पुण्याच्या रस्त्यानें मी जाऊं लागलों, कीं आपोआपच ओठांतून शब्द उमटतात :

'धन्य देहू गांव, पुण्यभूमि ठाव
जेथें नांदे देव, पांडुरंग !'

# ईशावास्योपनिषद्

उपनिषदें हीं वेदांच्या मस्तकावरचीं भूषणें होत. आध्यात्मिक विचारांचीं हीं जास्तींत जास्त उंच अशीं उड्डाणें होत. आत्मज्ञानाचें सर्व अमृतत्व त्यांत सांठवून ठेवलेलें आहे. उपनिषदें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं फारच थोडीं उपलब्ध आहेत. दहा उपनिषदें तर सर्वश्रुतच आहेत. त्यांमध्यें 'ईशावास्योपनिषदा'ला अग्रस्थान द्यावें लागेल. यजुर्वेदाचा तो अंतिम अध्याय आहे.

हें उपनिषद् तसें अगदीं लहान आहे. अवघे अठराच मंत्र आहेत त्याच्यांत. पण विनोबा म्हणतात कीं, 'हें एक पूर्ण उपनिषद् आहे. पारमार्थिक जीवनाचा संपूर्ण आराखडा या उपनिषदांत मांडण्यांत आलेला आहे. एवढेंच नव्हे तर तें वेदांचें सार आहे आणि गीतेचें बीज आहे.

वेदान्त म्हणजे वेदांचें रहस्य. तिळांत जसें तेल असतें त्याप्रमाणें वेदांच्या अंतरंगांत वेदान्त भरलेला आहे. (तिलेषु तैलवत् वेदे वेदान्तः सुप्रतिष्ठितः।) 'ईशावास्योपनिषद्' हा एक वेदान्ताचा ग्रंथ आहे. वेदांचें रहस्य त्यांत आलेलें आहे. तें जितकें लहान आहे तितकेंच महान्

आहे. ज्ञानोबांनीं म्हटलें आहे—'आंगें सानें परिणामें थोर। जैसें गुरुमुखीचें अक्षर ॥'

या उपनिषदाच्या पहिल्या मंत्राचा प्रारंभ 'ईशावास्यमिदं सर्वम्' म्हणजे 'हें सर्व जीवन ईश्वरानें व्यापलेलें आहे,' असा आहे. म्हणून या उपनिषदाला 'ईशावास्योपनिषद्' असें म्हणतात. हें उपनिषद् म्हणजे विनोबांचा जीव कीं प्राण आहे. त्यांनीं त्याचें मराठी गद्य भाषांतर केलेलें आहे. आणि रोज सकाळीं आपल्या प्रार्थनेंत ते हें उपनिषद् अत्यंत मधुर सुरावर म्हणतात. त्यांत साधकाची समग्र साधना थोडक्यांत आलेली असल्यानें प्रातःस्मरणाला तें फार उपयोगाचें आहे. हें उपनिषद् जीवनांत मुरल्यावांचून देहभाव ओसरणार नाहीं.

'ईशावास्या'चा प्रारंभ आणि अखेर एकाच 'शांतिमंत्रा'नें झालेलीं आहेत. प्रारंभींच्या या शांतिमंत्राचा उपनिषदांतील विषयाशीं संबंध असतोच असें नाहीं. पण त्या विषयाच्या अभ्यासाला अनुकूल अशी चित्तवृत्ति ह्या शांतिमंत्रानें निर्माण होते. तथापि 'ईशावास्या'च्या प्रारंभींच्या या शांतिमंत्रामध्यें या उपनिषदाचें जणुं सारच सांगितलें आहे. विनोबा म्हणतात कीं, प्रारंभीं शांतिमंत्र श्रद्धेच्या स्वरांत म्हणावा, आणि शेवटीं तो समाधानाच्या स्वरांत गावा.

**शांतिमंत्र**

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं**
**पूर्णात् पूर्णमुदच्यते।**
**पूर्णस्य पूर्णमादाय**
**पूर्णमेवावशिष्यते ॥**
**ॐ शांतिः शांतिः शांतिः।**

तें (अदः) पूर्ण आहे. हें (इदम्) पूर्ण आहे. पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें (उदच्यते). पूर्णांतून पूर्ण काढून घेतलें (आदाय) तरी पूर्णच बाकी राहतें (अवशिष्यते).

'तें' म्हणजे जें दिसत नाहीं तें—ब्रह्म. आणि 'हें' म्हणजे जें दिसतें तें—विश्व. तें पूर्ण आहे आणि हें पूर्ण आहे. ईश्वर पूर्ण आहे आणि ईश्वरानें निर्माण केलेलें हें विश्वहि पूर्णच आहे. कारण पूर्णांतून पूर्णच निर्माण होतें.

ईश्वर जर पूर्ण आहे, तर त्याची कोणतीहि कृति अपूर्ण कशी असेल? जगांतल्या सर्व गोष्टी अपूर्ण आहेत अशी आपण माणसें नेहमीं रडारड करीत असतों. त्यामुळें जगांत सर्वत्र असमाधान आणि अशांति निर्माण होते. पण हा माणसाचा शुद्ध भ्रम आहे. अगदीं मातीचा एखादा लहानसा कण घ्या. तोहि पूर्णच आहे. कुंभार जें मडकें करतो असें आपण नेहमीं म्हणतों तें काय कुंभार करतो? नाहीं. तें मडकें त्या मातीच्या कणांत आधींच तयार केलेलें असतें. तें त्यांतून प्रकट होण्याला कुंभार मदत करतो एवढेंच.

एखादें लहानसें बीं घ्या. तें काय अपूर्ण असतें? त्यांत संपूर्ण झाड लपलेलेंच असतें. तें प्रकट होण्यास माळी वा शेतकरी साहाय्य करतो इतकेंच. वर्ड्स्वर्थ म्हणतो, 'Child is the Father of Man'. लहान अर्भकांतच पूर्ण माणूस बनवलेला असतो. आईबापांना वाटतें कीं, आम्हीं मुलाला वाढवलें. शिक्षकाला वाटतें कीं, मीं त्याला शहाणा केलें. अरे, तुम्ही काय वाढवतांहांत अन् शहाणे करतांहांत? त्याची वाढ आणि त्याचा शहाणपणा त्याच्या जन्मकाळींच त्याच्यामध्यें सगळा तयार करून ठेवलेला होता. तुम्ही नुसते मदतगार. शिक्षणशास्त्राचें सारें रहस्य या मंत्रांत आलेलें आहे. मुलाला शिक्षण द्यायचें म्हणजे बाहेरून कांहीं त्याच्या डोक्यांत घालावयाचें नाहीं; तर आंत त्याच्यामध्यें जें कांहीं लपलेलें असतें तें बाहेर काढावयाचें. 'पूर्णापासून पूर्णत्वच उत्पन्न होतें' हाच सर्व विकासाचा नियम आहे. विकासांत नवीन कांहींच वाढवायचें नसतें.

बरें, पूर्णांतून पूर्ण काढून घेतलें तरी पूर्णच बाकी राहातें. म्हणजे जन्मानें पूर्ण जसें वाढत नाहीं, तसें नाशानें तें झिजतहि नाहीं. अशी या विश्वांत पूर्णाची अद्भुत लीला चालू आहे. आंकड्यांच्या गणितामध्यें बेरीज किंवा गुणाकार केला कीं वाढ होते. वजाबाकी किंवा भागाकार केला कीं घट होते. पण ईश्वरी गणितांत बेरीज करा नाहींतर वजाबाकी करा, गुणाकार करा नाहींतर भागाकार करा, मूळचें जसें पूर्ण आहे, तसेंच तें राहातें. कांहीं वाढत नाहीं कीं कांहीं कमी होत नाहीं. मी हें करतों किंवा मला हें करतां येत नाहीं या दोनच भावनांमुळें मनुष्याच्या जीवनांत अशांति उत्पन्न होते. त्यावर हा मंत्र एक उतारा आहे. तो माणसाला सांगतो कीं, तूं भलतें श्रेय आपल्याकडे घेऊं नकोस. कर्ता करविता सर्व तो आहे. तुला करतां येतें

हेंहि खोटें आणि करतां येत नाहीं हेंहि खोटें. कारण, 'त्यानें' तें सर्व करून ठेवलेलें आहे. तेव्हां तूं विनाकारण कां दुःख करून घेतोस? पूर्णाचा हा विश्वव्यापी खेळ ईश्वरानें चालविलेला आहे. तो तूं नुसता शांत मनानें बघत रहा. गडबड करूं नकोस. ही दृष्टि माणसाला आली म्हणजेच जीवनांत चिरंतन 'शांति' निर्माण होते. एतदर्थ, मंत्राच्या अखेर 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' असा शांतिघोष केलेला आहे.

**ईशावास्यमिदं सर्वं**
**यत्किंच जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुंजीथाः**
**मा गृधः कस्यस्वित् धनम् ॥ १ ॥**

जगांत जें कांहीं जीवन (जगत्) आहे तें सर्व ईश्वरानें भरलेलें आहे. म्हणून त्याच्या नांवानें त्यागून तूं आपला निर्वाह (भुंजीथाः) करीत रहा. दुसऱ्याच्या धनाचा तूं कधींहि लोभ धरूं (गृधः) नकोस.

प्रारंभींच्या 'शांतिमंत्रां'त ईश्वराच्या पूर्ण स्वरूपाचें दर्शन होतें. तोच विचार पहिल्या मंत्रांत अधिक वाढविलेला आहे. सर्व जीवन ईश्वरमय आहे. हें सारें जें डोळ्यांना दिसतें तें सारें ईश्वरानें भरलेलें आहे. ईश्वर जसा मंगल आहे, तसेंच जीवन मंगल आहे. जीवन हें मिथ्या आहे हें म्हणण्याचें कारण नाहीं! सारें ईश्वरमय आहे हें ध्यानांत आलें म्हणजे ईश्वराखेरीज दुसरें नांव घेण्याचें कारणच उरत नाहीं. ईश्वराच्या नांवांतच सर्व येतें. 'जगत्' म्हणजे जगणारें, जीवनवान् असा विनोबांनीं त्याचा अर्थ केला आहे. पण शंकराचार्यांनीं 'जगत्' याचा अर्थ बदलणारें असा केला आहे. जगांतील सर्व वस्तु जीवनमय आहेत. हें जीवन कोठें सुप्त आहे, कोठें प्रकट आहे. चंदनाच्या लांकडांतला सुप्त सुगंध ज्याप्रमाणें सहाणेवर घांसल्यावांचून प्रकट होत नाहीं त्याप्रमाणें वस्तूमधील किंवा व्यक्तीमधील अप्रकट ईशशक्ति चिंतनाच्या सहाणेवर घांसल्यावांचून प्रकट होत नाहीं. म्हणून बाहेरचीं सारीं मोहक आवरणें दूर सारून आंत बघावें लागतें. सर्व जगावर ईश्वराची सत्ता आहे, ही गोष्ट एकदां मान्य झाली म्हणजे मनुष्याला आपल्या सत्तेचा भ्रम राहात नाहीं आणि मग साहजिकच कोणत्याहि गोष्टीचा मोहहि पण उरत नाहीं. तसें झालें म्हणजे त्याग आणि भोग यांतला भेदच

नाहींसा होतो. 'तुका म्हणे रुची आलें । जें जें मिश्रित विठ्ठलें ॥'

प्रत्येक वस्तु ही ईश्वरानें भरलेली आहे, या जाणीवेपेक्षां जगांत अधिक गोड काय आहे? ही गोडी एकदां मनांत उत्पन्न झाली म्हणजे इतरांच्या भोगांचा लोभ वाटण्याचें कारणच उरत नाहीं. गृधः हा शब्द इंग्रजींतील Greed या शब्दाच्या समानार्थी आहे. दुसऱ्याचें धन लुबाडण्याच्या वृत्तीला वेदांत 'गृध्रवृत्ति' असें म्हणतात. सर्व धर्मांचें सार या एका मंत्रांत सांठवलेलें आहे असें विनोबा म्हणतात. हें सार असें. सर्व जगावर ईश्वराची सत्ता आहे. म्हणून आपण त्यागवृत्तीनें जगावें, आणि इतरांच्या भोगवृत्तीचा हेवा करूं नये. नाहीं तरी कोणत्याहि धर्मांत अधिक काय सांगितलेलें आहे?

◊ ◊ ◊

**कुर्वन्नेवेह कर्माणि**
**जिजीविषेत् शतं समाः।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति**
**न कर्म लिप्यते नरे ॥ २ ॥**

या जगांत कर्में करीत करीतच शंभर वर्षें (समाः) जगण्याची इच्छा धरावी (जिजीविषेत्). तुला देहवंताला हाच एक [एवं त्वयि] मार्ग आहे. याहून [इतः] दुसरा नाहीं [नान्यथा].

मागील मंत्रांत सांगितलें कीं, सर्व कांहीं ईश्वराचें आहे. आपलें कांहीं नाहीं, अशा वृत्तीनें वागावें. कोणाच्याहि धनाची वासना धरूं नये. यांतूनच हा मंत्र निघाला. दुसऱ्याच्या धनाची वासना धरणें म्हणजे श्रम किंवा कर्म टाळावयास बघणें. पण कर्म कोणासच टळत नाहीं. त्यागवृत्तीनें वागावयाचें म्हणजे कांहीं कर्म टाळावयाचें नाहीं. कर्म न करतां जिणें जगण्याची जो इच्छा करतो तो आपल्या आयुष्याशीं द्रोह करतो. जो कर्म न करतां जगेल त्याला आपलें आयुष्य म्हणजे ओझेंच वाटेल.

कर्म म्हणजे काय? तुमचा जो धर्म असेल त्याप्रमाणें जें कर्तव्य आहे तेंच कर्म. समाजांतील सर्व माणसें अशीं कर्तव्यबुद्धीनें सतत कर्में करीत राहिलीं तर तीं शंभर वर्षें सहज जगतील. वेदाप्रमाणें मानवी आयुष्याची पूर्ण मर्यादा शंभर वर्षांची आहे. आज माणसें शंभर वर्षें जगत नाहींत

ह्याचें कारण सर्वजण श्रम करीत नाहींत. समाजांतला धनिक आणि संपन्न वर्ग मुळींच काम करीत नाहीं. त्यामुळें बाकीच्यांवर वाजवीपेक्षां कामाचा जास्त ताण पडतो. ह्याचा काय परिणाम होतो? जे अतिश्रम करतात ते आणि जे कमी श्रम करतात किंवा मुळींच श्रम करीत नाहींत ते, आयुष्याची शंभर वर्षांची संपूर्ण मर्यादा जगूं शकत नाहींत. हा देह जोंपर्यंत तुझा आहे तोंपर्यंत तुला सतत कर्म करीत राहाण्यापेक्षां दुसरा मार्ग नाहीं. अर्थात् हें जें कर्म करीत राहावयाचें तें ईश्वरार्पण बुद्धीनेंच करावयाचें असल्यानें त्याचा दोष तुम्हांला चिकटूं शकत नाहीं. फलाची इच्छा धरणें हा कर्मामधला दोष. तो माणसाला चिकटूं शकतो. पण सर्व ईश्वराचें आहे, आपलें कांहीं नाहीं, अशा बुद्धीनें केलेल्या कर्माचा दोष कसा लागणार? निष्काम कर्मयोगाचा जो मार्ग भगवद्गीतेमध्यें सांगितला आहे तोच या मंत्रांत स्पष्टपणें प्रतिपादलेला आहे

**असुर्या नाम ते लोकाः**
**अन्धेन तमसावृताः।**
**तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति**
**ये के चात्महनो जनाः ॥ ३ ॥**

जे कोणी आत्मज्ञानाची उपेक्षा करतात ते आत्मघातकीच (आत्महनः) लोक म्हटले पाहिजेत. ते मेल्यानंतर (प्रेत्य) अंधारानें घेरलेल्या असुरी योनींत (असुर्या लोकाः) जातात (अभिगच्छन्ति).

आत्मज्ञानाची प्राप्ति हाच मनुष्यजन्माचा हेतु. आत्मज्ञान झाल्यावांचून परमात्म्याशीं ऐक्य होऊं शकत नाहीं. जे ईश्वरार्पण बुद्धीनें कर्म करीत नाहींत, म्हणजे जे भोगांत आणि आळसांत आपलें आयुष्य घालवतात, त्यांना आत्मज्ञान होणें अशक्य आहे. उलट, ते आपल्या आत्म्याचा नाशच करतात. मग असे लोक मेल्यानंतर कुठें जाणार? अर्थात् ज्या योनींत आत्मज्ञानाचा प्रकाश मिळणें अशक्य अशा अज्ञानाच्या अंधकारानें घेरलेल्या असुरी म्हणजे पशूंच्याच योनींत जाणार! 'ईशावास्या' च्या पहिल्या मंत्रांत ईश्वरावर निष्ठा ठेवावी असें सांगितलें. दुसऱ्या मंत्रांत सतत कर्म करीत राहा असें सांगितलें. आणि जो ईश्वरावर निष्ठा ठेवणार नाहीं आणि कर्में करणार नाहीं तो आपल्या आत्म्याचा नाश करून शेवटीं असुरी योनींत जातो असें तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे. हे तीन श्लोक मिळून

जीवनाचें एक दर्शन पूर्ण होतें. ईश्वराला विसरूं नका आणि भोगवृत्तीनें आणि आळसानें वागूं नका असा या पहिल्या तीन मंत्रांचा संदेश आहे.

ꕥ ꕥ ꕥ

**अनेजदेकं मनसो जवीयो**
**नैनद्देवा आप्नुवन् पूर्वमर्षत् ।**
**तद्धावतोऽन्यान् अत्येति तिष्ठत्**
**तस्मिन् अपो मातरिश्वा दधाति ॥ ४ ॥**

आत्मा किंवा ईशतत्त्व हें एकच आहे. तें मुळींच हलत नाहीं (अनेजत्). मनापेक्षांहि तें वेगवान (जवीयः) आहे. इंद्रियें (देवाः) त्याला गांठूं शकत नाहींत (न आप्नुवन्). कारण तें मनाच्या आधींचें (पूर्वमर्षत्) उभें आहे (तिष्ठत्). पण दुसऱ्या धांवणाऱ्यांना तें मागें टाकतें (अत्येति). पण त्याच्या अस्तित्वामुळें प्राणशक्ति (मातरिश्वा) प्रकृतीमध्यें (अपाः) खेळत असतें.

'ईशावास्या'च्या पहिल्या मंत्रांत सर्व जगांत भरलेल्या ज्या ईशतत्त्वाचा उल्लेख आलेला आहे त्याचेंच हें तपशीलवार वर्णन आहे. मागील मंत्रांत ज्या आत्मज्ञानाचें महत्त्व सांगितलें त्या आत्म्याचें स्वरूप काय आहे? आत्म्यांत आणि ईशतत्त्वांत भेद नाहीं. आत्मा हा सर्वव्यापी आहे. तिन्ही काळ दाही दिशा अंतर्बाह्य सृष्टीएवढी त्याची व्याप्ति आहे. मग तो हलेल कशाला? मनापेक्षांहि त्याचा वेग अधिक आहे. कारण मन कोठेंहि जाऊन पोहोंचण्यापूर्वींच हा त्या ठिकाणीं आधीं पोहोंचलेला असतो. इंद्रियांपेक्षां मन कितीतरी सूक्ष्म आहे. जो आत्मा मनाच्यासुद्धां आटोक्यांत येत नाहीं, तो इंद्रियांना कसा आकलन होऊं शकेल बरें? आत्मा हा इंद्रियांच्या ज्ञानाचा मुळीं विषयच नाहीं. कारण तो मनाच्या मर्यादेपलीकडचा आहे. तो स्थिर आहे. सर्वव्यापी असल्यानें त्याला इकडे तिकडे हलावेंच लागत नाहीं. इतरच सारे त्याच्या पोटांत फिरत असतात. उभा राहून तो धांवतो. त्याच्या स्थिरपणांत प्रचण्ड शक्ति आणि हालचाली भरलेल्या आहेत. सर्वत्र गतिसंचार करणारें हें प्राणतत्त्व या विश्वांतील सर्व प्राणिमात्रांच्या हालचालीला कारण आहे. या जगांतील प्राण्यांच्या सर्व चळवळी आत्म्याच्या अधिष्ठानावर चाललेल्या असतात. आत्मसत्तेखेरीज येथें दुसरी सत्ता नाहीं म्हणूनच आपलें स्वतःचें कांहीं नाहीं.

सर्व ईश्वरार्पणबुद्धीनें करावें असें पहिल्या मंत्रांत सांगितलेलें आहे. सर्वत्र भगवंताचें अधिष्ठान पहाण्यास शिकलें पाहिजे. ईश्वर ही केवढी अलौकिक शक्ति आहे ह्याचें ह्यापेक्षां अधिक समर्पक आणि सुंदर वर्णन जगाच्या इतर वाङ्मयांत कोठेंहि नसेल. त्याच्या शक्तीची आणि स्वरूपाची मनाला आणि इंद्रियांना कल्पनासुद्धां करतां येणार नाहीं. तो सर्वव्यापी आणि स्थिर दिसत असला तरी विश्वांतील सर्व प्राणशक्तींचा नि प्रेरणांचा तो उगम आहे. तो कर्म करीत नाहीं असें वाटतें पण वस्तुतः तोच सर्व कर्में करीत असतो. 'युगें अठ्ठावीस विटेवरी उभा राहून' तो सर्व जगाचें शासन करीत असतो.

**तदेजति तन्नैजति**
**तद्दूरे तद्वन्तिके ।**
**तदन्तरस्य सर्वस्य**
**तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५ ॥**

तें हलतें (एजति). तें हलत नाहीं (न एजति). तें दूर आहे. तें जवळ आहे. तें सर्वांच्या अंतरीं आहे. तें सर्वांच्या बाहेर आहे.

मागल्या मंत्रांत ज्या आत्म्याचें वर्णन केलें आहे, त्याचीच व्याप्ति ह्या मंत्रांत सांगितली आहे. म्हणून मागील आणि हा असे दोन्ही मंत्र एकत्र वाचावेत. तें हलतें म्हणजे 'चर' आहे आणि हलत नाहीं म्हणजे 'स्थिर'-हि आहे. स्थिरचर सारें तेंच आहे. तें दूर आहे आणि जवळ आहे. म्हणजे स्थल, काल हा प्रकारच त्याच्यापाशीं नाहीं. दोघांनाहि त्यानें गिळून टाकलें आहे.

(अज्ञानी माणसाला तो 'दूर' आहे आणि ज्ञानी माणसाला तो 'जवळ' आहे, असाहि कुणी अर्थ करतात.) आंतून पहाणारा तोच आहे आणि बाहेरचें सर्वहि पण तोच आहे. अशा रीतीनें आंत बाहेर, जवळ दूर, स्थिर-चर रूपानें सर्वत्र परमात्माच भरलेला असल्यानें 'हा माझा—हा परका,' 'हा दूरचा—हा जवळचा,' या भेदभावांना जीवनांत मुळीं अवकाशच उरत नाहीं.

**यस्तु सर्वाणि भूतानि**
**आत्मन्येवानुपश्यति ।**
**सर्वभूतेषु चात्मानं**
**ततो न विजुगुप्सते ॥ ६ ॥**

जो सर्व भूतांना आत्म्यांत पहातो आणि सर्व भूतांमध्यें आत्मा बघतो तो मग कोणाचाहि द्वेष करीत नाहीं (न विजिगुप्सते).

ह्या आणि पुढच्या दोन मंत्रांमध्यें ईश्वरभक्ताचें वर्णन दिलेलें आहे. तो आपल्यामध्यें सर्वांना आणि सर्वांमध्यें आपल्याला पाहतो. ह्यालाच भक्ति म्हणतात. हें आपलें आणि तें दुसऱ्याचें हे भेद भक्तीमुळें नाहींसे होतात. मनुष्यानें आपल्या भोंवतीं भेदांच्या हजारों भिंती निर्माण करून ठेवलेल्या आहेत आणि त्यामुळें जीवनांत प्रचण्ड कलह, द्वेष आणि अशांति निर्माण झाली आहे. हा सर्व जंजाळ ईश्वराच्या स्वरूपाचें खरें ज्ञान झाल्यावांचून मिटणार नाहीं. माझ्यांत जें आत्मतत्त्व आहे तेंच सर्व प्राणिमात्रांत आहे अशी व्यापक जाणीव जीवाला झाल्यावर भेदाचे सगळे पडदे आपोआपच गळून पडतात. आपण सगळे एकच आहोंत ही आपलेपणाची भावना निर्माण होते. मग द्वेषाचें कारणच काय? ज्याच्या जीवनांत माझें-तुझें किंवा माझें-त्याचें ही भावना नाहीं त्याच्यासारखें आनंदमय जीवन कोणाचें नाहीं !

**यस्मिन् सर्वाणि भूतानि**
**आत्मैवाभूद्विजानतः ।**
**तत्र को मोहः कः शोक**
**एकत्वमनुपश्यतः ॥ ७ ॥**

आत्माच सर्व भूतें आहे असें ज्याच्या दृष्टीला दिसतें आणि जो (सर्व भूतांचें) एकत्वच सदैव पाहतो त्या ज्ञानी पुरुषाला कशाचा मोह अन् कशाचा शोक हो?

आत्माच सर्व भूतें आहे याचाच अर्थ 'ईशावास्यमिदं सर्वम्'. सर्व भूतांत जो आत्मा पाहतो तो कोणाचाहि द्वेष करूं शकत नाहीं हें मागल्या मंत्रांत सांगितलें तर सर्व भूतांचें एकत्व जो ज्ञानी पुरुष अनुभवतो त्याच्या हृदयाला मोह आणि शोक या भावना मुळीं स्पर्शच करूं शकत नाहींत, हें यांत सांगितलें आहे. आपली दृष्टि आपल्यापुरती संकुचित असते म्हणून मोह निर्माण होतो. आपलें आणि दुसऱ्याचें ही वृत्ति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत हें आपल्याजवळ नाहीं, तें दुसऱ्याजवळ आहे, तेव्हां तें दुसऱ्याचें आपल्याला पाहिजे, असें मोहाचें आकर्षण मनांत उत्पन्न होतें. शोकाची

भावनाहि स्वार्थातूनच निर्माण होते. 'माझें गेलें' म्हणून माणूस शोक करूं लागतो. व्यापक आपलेपणाच्या भावनेंत शोकाला कुठें जागा असणार ?

स पर्यगात् शुक्रमकायमव्रणं
अस्नाविरम् शुद्धमपापविद्धम् ।
कविर्मनीषी परिभूः स्वयंभूः
यथातथ्यतोऽर्थान् व्यदधात्
शाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८ ॥

तो सर्व व्यापून (पर्यगात्) आहे. तो तेजस्वी (शुक्रम्), देहरहित (अकायम्), देहदोष नसलेला (अव्रणम्), असा आहे. तो स्नायुरहित (अस्नाविरम्), शुद्ध आणि पापदोषमुक्त आहे. तो द्रष्टा (कविः), ज्ञाता (मनीषी), सर्वंकष (परिभूः) आणि स्वयंभू आहे. शाश्वत कालपर्यंत सर्व अर्थ तोच यथार्थपणें साध्य करून देतो.

हें आत्म्याचें वर्णन आहे. पण विनोबांचें म्हणणें असें आहे कीं, तें आत्म्याचें वर्णन न मानतां आत्मज्ञान्याचें वर्णन मानावें, म्हणजे मंत्राचा सरळ अर्थ लागतो. देहाचे दोष किंवा गुण हे देहामुळें उत्पन्न होतात. इंद्रियादिकांमुळें पाप घडतें. पण ज्या आत्म्याला देहाची किंवा इंद्रियांची उपाधी नाहीं तो त्या दोषांपासून सर्वस्वी अलिप्तच असतो. आत्मतत्त्व हें देहांत गुंडाळलेलें आहे. पण तें त्यांतून बाहेर काढलें कीं, लखलखीत अन् तेजस्वीच आहे. कवि ज्याप्रमाणें भविष्यकाळांत देखील पाहूं शकतो त्याप्रमाणें देहाचा पडदा दूर सारून आत्मा पलीकडचें सर्व बघूं शकतो. आत्मा मनीषी आहे. म्हणजे त्याची मनावर सत्ता चालूं शकते. आत्मज्ञानी माणूस म्हणूनच आपलें मन आंवरूं शकतो. आत्मा परिभूः म्हणजे व्यापक आहे आणि स्वयंभू म्हणजे स्वयंपूर्ण आहे. शाश्वत काळपर्यंत टिकणाऱ्या सर्वच अर्थांची तरतूद आत्म्यानें करून ठेवलेली आहे. म्हणूनच आत्मज्ञानी पुरुष देहातीत होऊन परमार्थ साधूं शकतो.

ह्या तीन मंत्रांमध्यें आत्मज्ञानी आणि ईश्वरनिष्ठ पुरुषाचें वर्णन पूर्ण झालें आहे. तो सर्व भूतमात्रांवर प्रेम करतो. कोणाचाहि द्वेष करीत नाहीं. सर्व विश्वांत त्याला एकत्व दिसतें. मोह आणि शोक त्याच्या ठिकाणीं संभवत

नाहीं. आत्म्याच्या शुद्ध, तेजस्वी आणि व्यापक स्वरूपाचें त्याला ज्ञान झाल्यामुळें तो देहातीत राहून परमार्थ साधतो.

अन्धं तमः प्रविशन्ति
ये अविद्यामुपासते।
ततो भूय इव ते तमो
ये विद्यायां रताः ॥ ९ ॥

जे अविद्येंत म्हणजे अज्ञानांत किंवा नेणिवेंत गढून गेले ते गाढ अंधारांत शिरले. (पण) जे केवळ विद्येंत म्हणजे ज्ञानांत किंवा जाणिवेंत रमले, ते तर जणुं कांहीं त्याहीपेक्षां गाढ अंधारांत शिरले म्हणा ना!

येथून पुढच्या तीन मंत्रांमध्यें बुद्धीचें कार्य सांगितलें आहे. परमेश्वरानें मनुष्याच्या हातांत बुद्धि हें एक फार मोठें शस्त्र दिलें आहे. ह्या हत्याराच्या उपयोगानें आपण आपली जशी उन्नति करून घेऊं शकूं तशी अवनतीहि करून घेऊं शकतों. पण आपल्याला बुद्धीचा सदुपयोग करून घ्यावयाचा आहे. जगांत जेवढें ज्ञान आहे तेवढयाची कांहीं आपल्याला जरुरी नाहीं. कांहीं ज्ञान आवश्यक आहे, कांहीं अनावश्यक आहे. कोणतें ज्ञान आवश्यक आहे, कोणतें अनावश्यक आहे हें आपण विवेकानें ओळखावयाला शिकलें पाहिजे. जें ज्ञान आवश्यक नाहीं त्याचा बुद्धीवर व्यर्थ बोजा पडेल आणि त्यापासून जीवनाला धोका उद्भवेल. आणि जें आवश्यक ज्ञान आहे तें आपण संपादन केलें नाहीं तर आपण आपल्या कर्तव्यांत चुकलों असें होईल. एवढयासाठीं पुढच्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, विद्या पाहिजे आणि अविद्याहि पाहिजे. अनावश्यक ज्ञानाची नेणीव असावी. चुकून अनावश्यक ज्ञान प्राप्त झालें तर तें प्रयत्नपूर्वक विसरून जावयाला पाहिजे, हें ह्या मंत्राचें स्पष्टीकरण विनोबांच्यावरून घेतलें आहे.

दुसरे भाष्यकार विद्या आणि अविद्या ह्यांचा निराळा अर्थ सांगतात. विद्या म्हणजे देव आणि यज्ञयागांचें ज्ञान. आणि अविद्या म्हणजे यज्ञयागादि कर्मकांडाचें आचरण. नुसतें ज्ञान किंवा नुसतें कर्म सत्याच्या प्रकाशाकडे नेऊं शकत नाहीं. विनोबांचा दृष्टिकोन आधुनिक वाटतो. विद्याहीन अविद्या आणि अविद्याहीन विद्या ह्या एकेकटया अनर्थकारक आहेत. त्यांपैकीं

कोणती जास्त अंधारांत नेणारी हें सांगणें कठीण आहे. अविद्येंत सुख मानणारे जसे लोक असतात, त्याचप्रमाणें नुसत्या विद्येंत आनंद मानणारेहि असतात. ह्या दोघांनाहि आत्मज्ञान होऊं शकत नाहीं.

**अन्यदेवाहुः विद्यया**
**अन्यदाहुरविद्यया।**
**इति शुश्रुम धीराणां**
**ये नस्तद् विचचक्षिरे ॥ १० ॥**

तें आत्मतत्त्व जाणीवेहून वेगळेंच म्हटलें आहे आणि नेणीवेहूनहि वेगळें म्हटलें आहे. ज्यांनीं आम्हांला त्याचें दर्शन घडविलें आहे (विचचक्षिरे) त्या ज्ञानी पुरुषाकडून (धीराणाम्) आम्हीं हें ऐकलें आहे.

दुसऱ्या भाष्यकारांनीं 'अन्यत्'चा अर्थ 'फळ' असा दिला आहे. विद्येचें फळ एक असतें तर अविद्येचें फळ दुसरें मिळतें असा ते या मंत्राचा अर्थ करतात. आत्मज्ञान हें अविद्येहून वेगळें आहे हें तर उघडच आहे. पण तें नुसत्या विद्येच्याहि फार पलीकडे आहे. ह्या गोष्टीवर या मंत्रानें जोर दिला आहे.

**विद्यां चाविद्यां च**
**यस्तद् वेदोभयं सह।**
**अविद्यया मृत्युं तीर्त्वा**
**विद्ययाऽमृतमश्नुते ॥ ११ ॥**

विद्या आणि अविद्या या दोन्हीसह जे त्या आत्मतत्त्वाला (तद्) जाणतात (वेद) ते अविद्येनें मृत्यूला जिंकून विद्येनें अमृताचें तीर गांठतात.

विद्या आणि अविद्या या एकेकट्या अनर्थकारक असल्यानें दोन्ही मिळून आत्मज्ञानाचें एक साधन बनवावयाचें आहे. आत्मज्ञानाकडे दृष्टि असली म्हणजे मनुष्य अविद्येच्या योगानें व्यर्थ भाराभर ज्ञान टाळतो. याचाच अर्थ तो मृत्यूचा समुद्र पोहून जातो आणि मग विद्येच्या बळानें तो आत्मचिंतन करून अमृताचा किनारा गांठतो. आत्मा हा ज्ञान आणि अज्ञान ह्या दोन्ही-पेक्षां भिन्न आणि साक्षीरूप आहे; अशा वृत्तीनें जेव्हां आपण अभ्यास करूं तेव्हां बुद्धि ईश्वरपरायण होऊं शकते.

अन्धं तमः प्रविशन्ति
येऽसंभूतिमुपासते।
ततो भूय इव ते तमो
य उ संभूत्यां रताः ॥ १२ ॥

जे असंभूतीची आराधना करतात ते गाढ अंधारांत शिरतात; आणि जे संभूतींत रमले ते जणुं त्याहीपेक्षां घोर अंधारांत शिरतात.

या मंत्रांतील 'संभूति' आणि 'असंभूति' ह्या दोन शब्दांच्या अर्थाबद्दल एकमत नाहीं. 'असंभूति' म्हणजे प्रकृति, माया, जें नाहीं तें आणि 'संभूति' म्हणजे 'जें आहे तें' किंवा ब्रह्माच्या प्रकटीकरणाची पहिली अवस्था, ज्याला 'हिरण्यगर्भ' म्हणतात असा कोणी अर्थ दिलेला आहे. विनोबांनीं 'असंभूति' म्हणजे निरोध आणि 'संभूति' म्हणजे विकास असा अर्थ दिलेला आहे.

ह्याच्या पूर्वीच्या तीन मंत्रांमध्यें बुद्धीचें शोधन कसें करावें हें सांगितलें आहे. ह्या नि ह्याच्या पुढच्या दोन मंत्रांत हृदयशोधन सांगितलें आहे. बुद्धीप्रमाणें हृदयाची शुद्धि व्हावयाला पाहिजे. आमच्या हृदयांत जसे गुण आहेत तसे दोषहि आहेत. अशा परिस्थितींत आपण काय करावें ? विनोबा म्हणतात, आपण गुणांची 'संभूति' म्हणजे विकास केला पाहिजे. त्याचप्रमाणें दोषांची 'असंभूति' करावयाला हवी. जे दोष आहेत ते नष्ट केले पाहिजेत. आणि नवीन दोष उत्पन्न होऊं न दिले पाहिजेत. आम्हीं कांहींहि केलें तरी आमचा कटाक्ष चित्तशुद्धीवर राहिला पाहिजे. केवळ दोषांच्याच निरोधांत गुंतून चालवयाचें नाहीं. कारण त्यामुळें त्याच वृत्ति बळावतात. दोषांच्या निरोधाबरोबर गुणांचा विकासहि करीत राहिलें पाहिजे. बरें, केवळ गुणांच्या विकासांच्या मागें लागूनहि भागत नाहीं. कारण त्यामुळें अनेक विषयांशीं माणूस जखडला जातो. कोणत्याहि एकाच मार्गाचा अंगिकार करण्यांत अंधार आहे असें ह्या मंत्रांत सांगितलें आहे.

अन्यदेवाहुः संभवात्
अन्यदाहुरसंभवात्।
इति शुश्रुम धीराणाम्
ये नस्तद् विचचक्षिरे ॥ १३ ॥

37354

(आत्मतत्त्व) जें आहे तें विकासाहून वेगळेंच (अन्यत्) आहे. आणि विरोधाहूनहि पण निराळेंच आहे. ज्यांनीं आम्हांला त्याचें दर्शन करविलें त्या ज्ञानी पुरुषाकडून आम्हीं असें ऐकलें आहे.

ह्या मंत्राचा अर्थ दुसऱ्या भाष्यकारांनीं निराळा दिला आहे. शंकराचार्य म्हणतात कीं, संभूतीची म्हणजे हिरण्यगर्भाची पूजा केल्यामुळें अष्टविध योगबल अंगीं येतें. आणि जो असंभूतीची पूजा करतो तो प्रकृतीमध्यें निमग्न राहातो. विनोबांनीं दिलेला अर्थ अधिक सुलभ आणि समर्पक वाटतो. आत्मतत्त्व हें निरोध आणि विकास ह्या दोहोंच्याहि पलीकडचें आहे. आत्मज्ञान हें निरोधापेक्षां भिन्न आहे हें सहज समजण्यासारखें आहे. पण विकासाची पराकाष्ठा म्हणजे आत्मज्ञान अशी सर्वसामान्य समजूत आहे. आत्मतत्त्व हें विकासाच्या पलीकडचें आहे हें ह्या मंत्रांत मुद्दाम सांगितलें आहे.

**संभूतिं च विनाशं च**
**यस्तद् वेदोभयं सह ।**
**विनाशेन मृत्युं तीर्त्वा**
**संभूत्यामृतमश्नुते ॥ १४ ॥**

संभूति म्हणजे विकास अन् विनाश म्हणजे निरोध ह्या दोहोंसह जे त्या आत्मतत्त्वाला जाणतात ते, विनाशानें म्हणजे निरोधानें मृत्यूस जिंकून संभूतीनें म्हणजे विकासानें अमृताचा आस्वाद घेतात.

१२, १३ नि १४ व्या मंत्राचा खरा अर्थ काय आहे हें कळणें फार कठीण आहे. शंकराचार्यांनीं त्याचा अर्थ असा केला आहे. प्रकृति आणि हिरण्यगर्भ ह्या दोहोंची उपासना केल्यानें कर्मानें प्राप्त होणारें सर्वोत्तम स्थान प्राप्त होतें. कर्म आणि ज्ञान ह्यांतील विरोध त्यांनीं गृहीत धरला आहे. दुसऱ्या एका आचार्यांनीं चौदाव्या मंत्राचा अर्थ असा सांगितला आहे. जो योगी पुरुष ब्रह्म जाणतो आणि देहाचें रहस्य ओळखतो तो ज्ञानपूर्वक कर्मानें मृत्यूला जिंकतो आणि ब्रह्मज्ञानानें अमर होतो. संभूति आणि असंभूति म्हणजे कर्म आणि ज्ञान असाहि कोणी अर्थ घेतात. विनोबा म्हणतात, "बाह्य दृष्टीनें एखाद्या कर्मामध्यें आम्हांला सिद्धी मिळाली आणि लोक आमचा जयजयकार करूं लागले आणि त्या कर्मानें आमचें गुणसंवर्धन झालें

नाहीं तर तें कर्म वाईट आहे. त्या कर्मानें आम्ही स्वतःची अवनति केली आहे आणि जगाचीहि होऊं दिली आहे. आम्हीं हें ओळखलें पाहिजे कीं, दोष आणि गुण ह्यांपेक्षां भिन्न, केवळ साक्षीरूप आपण आहोंत. ह्या तऱ्हेच्या अभ्यासानें हृदयशुद्धि होईल. बुद्धीची आणि हृदयाची शुद्धि कशी होणार? आत्मज्ञानानें. साधनशुद्धीनें आत्मज्ञान आणि आत्मज्ञानानें साधनशुद्धि हा पेंच कसा सोडवायचा? त्यासाठीं प्रार्थनातत्त्वाचा मार्ग पुढील मंत्रांत सांगितला आहे.

**हिरण्मयेन पात्रेण**
**सत्यस्यापिहितं मुखम्।**
**तत्त्वं पूषन्नपावृणु**
**सत्यधर्माय दृष्टये ॥ १५ ॥**

सत्याचें मुख सुवर्णपात्रानें झांकलेलें आहे. हे विश्वाचें पोषण करणाऱ्या (पूषन्) ईश्वरा, तें झांकण तूं काढून टाक (अपावृणु), म्हणजे सत्यधर्माचा उपासक जो मी त्या मला त्याचें दर्शन घडेल!

ह्या मंत्राला विनोबा महान् मंत्र म्हणतात. कारण ही वैदिक धर्माची सार्वभौम प्रार्थना आहे. हिच्यांत सर्व दर्शनांचें सार आलेलें आहे. ह्या सृष्टींत सत्य दडलेलें आहे. उघडें नाहीं. मोहाच्या आवरणाखालीं तें झांकलेलें आहे. हें मोहाचें आवरण दूर केल्यावांचून सत्याचें दर्शन होऊं शकत नाहीं. बुद्धीच्या अभावानें सत्याचें दर्शन होत नाहीं असें नाहीं. बुद्धीभोंवतीं अनेक मोहांचीं आवरणें पडलेलीं असतात. कांचनमोह हा एक मोह आहे. असे दुसरेहि आणखी अनेक मोह आहेत. 'हिरण्मय पात्र' हा शब्द लाक्षणिक अर्थी वापरलेला आहे. त्याचा शब्दशः अर्थ म्हणजे वित्तमोह असा घेतला तरी बिघडत नाहीं. पैशाच्या मोहामुळेंच माणूस सत्यापासून दुरावतो. जगांतल्या सत्यावर अनेक सोनेरी झांकणें पडलेलीं आहेत. 'तीं तूं दूर कर' अशी येथें ईश्वराची प्रार्थना केलेली आहे.

कुणी म्हणेल, सत्यापेक्षां परमेश्वर वेगळा आहे का? नाहीं. सत्य म्हणजेच ईश्वर. सत्याचें दर्शन व्हावें म्हणून सत्याचीच ही प्रार्थना आहे. सत्यांत सर्व नीतिधर्माचें सार येतें. 'सत्यधर्म' म्हणजे सत्याची उपासना

हा ज्याचा धर्म आहे तो.

**पूषन् एकर्षे यम सूर्य प्राजापत्य**
**व्यूह रश्मीन् समूह तेजो ।**
**यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि**
**योसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥ १६ ॥**

तूं ह्या विश्वाचें पोषण करणारा आहेस. तूंच एक पाहाणारा आहेस. तूं नियम करणारा आहेस, तूं सर्व शक्तीचा प्रेरक आहेस. सर्वांचें प्रजेप्रमाणें पालन करणारा आहेस. तुझे रश्मी उलगडून (व्यूह) आणि एकवटून (समूह) दाखव. म्हणजे तुझें तेजस्वी आणि अत्यंत कल्याणकारक रूप मला दिसेल. (आतां मला कळलें) कीं तो—तो—पार पलीकडचा परात्पर (असौ पुरुषः) म्हणजे मीच आहें (सोऽहमस्मि) !

ईश्वर हा आपलें पालनपोषण करतो. आपल्याला प्रेरणा देतो. आपलें नियमन करतो. सर्व गोष्टींचें नित्य निरीक्षण करतो. त्याच्यापुढें आपण किती क्षुद्र आहोंत. पण त्याच्यांत आणि आपल्यांत तात्त्विक भेद नाहीं. त्याचाच मी अंश आहें. नव्हे, तोच मी आहें. देह हें एक आवरण आहे. सुवर्ण-पात्रच म्हणा कीं. त्यांत मी लपलों आहें. हें देहाचें आवरण दूर केलें कीं त्या 'मी'चें दर्शन होतें. ईश्वर ज्या प्रकारें पूर्ण आहे, सुंदर आहे, तसा मीहि आहें. होऊं शकेन. 'सोऽहं' मंत्रानें हें आश्वासन आपल्याला दिलें आहे.

**वायुरनिलममृतम्**
**अथेदं भस्मान्तं शरीरम् ।**
**ॐ क्रतो स्मर कृतं स्मर**
**क्रतो स्मर कृतं स्मर ॥ १७ ॥**

हा वायु म्हणजे प्राण त्या अमृतवायूंत म्हणजे चैतन्यशक्तींत विलीन होवो आणि मग या शरिराचें खुशाल भस्म होवो. ईश्वराचें नांव घेऊन हें, दृढ संकल्पमय जीवा (क्रतो), आठव. त्याचें केलेलें आठव. हे माझ्या जीवा, आठव, त्याचें केलेलें आठव.

जगांत सर्व जे भेद आहेत, ते बाहेरचे आहेत. देहामुळें उत्पन्न झालेले आहेत. अंतर्यामीं 'तो'च आहे. त्याचें दर्शन करण्याचा जो आमरण प्रयत्न

करतो, तो जेव्हां मरण पावतो तेव्हां त्याची देहाची माती मातींत मिसळून जाते आणि आत्मा परमात्म्यांत मिळून जातो. तीच या मंत्रांत प्रार्थना केलेली आहे. 'माझा जीव परमात्म्यांत मिसळून जावो आणि मग देहाची राख होवो. जीवाकडून जन्मजन्मांतरीं अनेक शुभाशुभ संकल्प रचले गेलेले असतात. ते सर्व विसरले जावेत ह्यासाठीं ही अंतिम प्रार्थना आहे. म्हणून 'ॐ' हें देवाचें नांव घेऊन जीवाला सांगितलें आहे कीं, आतां त्याचें म्हणजे ईश्वराचें सर्व आठव. त्याची कृति, त्याचा महान् उपकार, त्याचें रूप, त्याचे गुण आठव. आठव, माझ्या जीवा, आठव.'

**अग्ने नय सुपथा राये अस्मान्**
**विश्वानि देव वयुनानि विद्वान्।**
**युयोध्यस्मद् जहुराणमेनो**
**भूयिष्ठां ते नम-उक्तिं विधेम ॥ १८ ॥**

हे तेजस्वी ईश्वरा (अग्ने), विश्वांत विणलेलीं (वयुनानि) सर्व तत्त्वें तूं जाणतोसच (विद्वान्). तेव्हां आम्हांला चांगल्या मार्गानें त्या परमानंदाकडे (राये) घेऊन जा (नय). कुटिल पाप (जहुराणमेनः) तूं आमच्यापासून पिटाळून लाव. तुला पुन्हा पुन्हा (भूयिष्ठां) आम्ही नम्र शब्दांनीं (नम-उक्तिं) विनवतों आहोंत.

हा ईशावास्याचा शेवटचा मंत्र आहे. ईश्वराची ही प्रार्थना आहे. ईश्वर हा अग्निरूप आहे म्हणून तो मार्ग दाखवितो. जो अग्नि आमच्यामध्यें राहातो आणि आम्हांला जिवंत ठेवतो, जो आमच्यांतून गेला कीं आमचीं शरिरें थंड पडतात, जो उष्णता निर्माण करतो तो चैतन्याचा संकेत झाला आहे. त्याच्यावरून आम्हांला चैतन्याची ओळख पटते. अग्निस्वरूप चैतन्यदायी ईश्वराला या मंत्रांत अशी प्रार्थना केली आहे कीं, हे देवा, जोंपर्यंत आमच्यामध्यें चेतना आहे, उष्णता आहे, तोंपर्यंत आम्हांला सरळ आणि चांगल्या मार्गानें ने. वांकड्या मार्गानें आम्हांला नेऊं नकोस. कोणत्याहि प्रकारची वक्रता आमच्या जीवनांत उत्पन्न होणार नाहीं अशी तूं काळजी घे. अगदीं सरळ रस्त्यानें आम्हांला घेऊन जा.

ह्या जगांत अनेक गुण आहेत. पण सरळपणा म्हणजें ऋजुता हा

सर्वांत मोठा सद्गुण आहे. जेथें ऋजुता आहे तेथें धर्म आहे, तेथें जीवन आहे. जेथें वक्रता आहे तेथें अधर्म आहे; तेथें मृत्यु आहे. कायावाचामनानें अंतर्बाह्य सरळ होण्याचें बळ आपल्याला मिळावें एवढ्यासाठीं ही प्रार्थना आहे.

११४८०

**शांतिमंत्र**

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं**
**पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय**
**पूर्णमेवावशिष्यते ॥**
**ॐ शांतिः शांतिः शांतिः ।**

तें पूर्ण आहे. हें पूर्ण आहे. पूर्णांतून पूर्ण निघतें. पूर्णांतून पूर्ण वजा केलें कीं, बाकी पूर्णच राहातें.

ईशावास्याच्या आरंभीं आणि शेवटीं हा शांतिमंत्र दिलेला आहे. सर्व पूर्ण आहे, या विचारानें आपण मनांत शांति राखली पाहिजे. अस्वस्थ होण्याचें कांहीं कारण नाहीं. जग सर्वत्र अपूर्ण आहे असा आपल्याला नेहमीं आभास होत असतो. ती अपूर्णता नाहींशी करून जग पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे अशी आपण आपली कल्पना करून घेतों आणि त्यामुळें जीवनांत अशांति निर्माण होते. म्हणून प्रत्येकानें हें आधीं नीट ध्यानीं धरावें कीं, जग हें पूर्णच आहे. त्यांत तुम्हांआम्हांला मध्येंच खेळायची संधी मिळालेली आहे. पाण्यावर लाटा उठत असतात. एक लाट येते. ती जाते. मग दुसरी येते. पण तें सगळें असतें पाणीच. तसें आपलें आहे. जीवन पूर्णच आहे. त्यावर क्षणैक उठणारे आपण तरंग आहोंत. अशा तऱ्हेनें आपण जीवनाचा विचार केला म्हणजे अशांतीचें कांहीं कारणच राहात नाहीं. म्हणूनच शेवटीं म्हटलें आहे कीं, 'ॐ शांतिः शांतिः शांतिः !'

विनोबांचें हें अत्यंत आवडतें उपनिषद् आहे. ह्या उपनिषदाच्या पठनानें त्यांच्या रोजच्या कार्यक्रमाला सुरुवात होत असते. त्यांच्याच प्रेरणेनें त्यांचेंच भाष्य मी माझ्या लेखणीनें फिरून लिहिलें आहे. चुका माझ्या, प्रकाश त्यांचा.

क्रमांक ३१३५५ ... वि. निबंध
नोंद १३७५५ ... नोंद दि. ३०।८
REFBK-0011480